रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९ ▌अंक २७३ ▌पृष्ठे १० ▌RGD/016/2026-28

www.krushival.in

## मुंबई बॉम्बने उडविण्याची धमकी

**मुंबई :** अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असतानाच मुंबईतील चार ठिकाणे बॉम्बने उडविण्याची धमकी प्राप्त झाल्यामुळे खळबळ उडाली आहे. यामध्ये मेट्रो, विधानभवन, शेअर बाजार आणि बँकेचा समावेश होता. पोलिसांनी तात्काळ विधानभवनाच्या इमारतीचा ताबा घेत तपासणी केली. बॉम्ब शोधक आणि श्वान पथकाद्वारे इमारतीची पाहणी केली. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी या वृत्ताला दुजोरा दिला. सुरक्षा दल पाहणी करत असताना इमारतीमधील सर्व कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्यात आले होते.



# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६

किंमत ४ ₹


## राजेश मपारा यांची हकालपट्टी

**पाली :** सुधागड तालुक्यातील भाजपमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. पक्षविरोधी कारवाया केल्याचा आणि संघटनेच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा ठपका ठेवत भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष व माजी खासदार धैर्यशिल पाटील यांनी माजी दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश शरद मपारा यांची पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वासह सर्व पदांवरून तात्काळ हकालपट्टी केली आहे. या कारवाईमुळे सुधागड भाजपमधील अंतर्गत गटबाजी चव्हाट्यावर आली असून, आगामी नगरपंचायत आणि ग्रामपंचायत निवडणुकांच्या •➤ पान २ वर

# जि. प. च्या सत्तेचा सौदा ठरला

- **भाजपचे मंगेश वाकडीकर अध्यक्ष**
- **राष्ट्रवादीचे मधुकर पाटील उपाध्यक्षपदी**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत एकमेकांवर चिखलफेक करणारे महायुतीतील नेते सत्तेच्या गणितासाठी आता एकाच मंचावर आल्याने जिल्ह्यात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. निवडणुकीनंतर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी कोण बसणार, याकडे गेले कित्येक दिवसांपासून लक्ष लागून राहिले होते. अखेर गुरुवारी याबाबत महायुतीच्या सर्व नेत्यांनी एकत्र येत अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवड जाहीर केली.

यावेळी रायगड जिल्हा परिषदेत सव्वा वर्षांचा सत्तेचा फॉर्म्युला ठरल्याची चर्चा असून पहिले सव्वा वर्ष भाजपचा अध्यक्ष असेल तर त्यानंतर राष्ट्रवादी व शिंदे गटाला संधी देण्याची आखणी झाल्याचे सांगण्यात आले. निवडणुकीत एकमेकांवर टीकेचे बाण सोडणारे महायुतीतील नेते सत्तेच्या समीकरणासाठी आता एकत्र आल्याने जिल्हा परिषदेत नवे राजकीय नाट्य रंगले आहे. प्रदिर्घ कालावधीनंतर रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवडणूक झाली. या निवडणुकीत भाजपचे मंगेश वाकडीकर यांची अध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी राष्ट्रवादीचे मधुकर पाटील यांची बिनविरोध निवड झाली. पिठासन अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांनी ही निवड जाहीर केली. मात्र या निवडीत शिंदे गट शिवसेनेला फक्त बघ्याची भूमिका घ्यावी लागली. अलिबागमधील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात निवड प्रक्रिया पार पडली. अध्यक्षपदासाठी मंगेश वाकडीकर आणि •➤ पान २ वर

### सत्ता स्थापनेत शिंदे गटावर नमते होण्याची आली वेळ

रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादीसह भाजपला आव्हान देत शिंदे गट शिवसेनेने निवडणूक एकला चलो रे या पध्दतीने लढविली. शिंदे गटाने प्रचारादरम्यान भाजपसह राष्ट्रवादीच्या नेत्यांचे धिंडवडे काढले. आपलाच अध्यक्ष असणार असा बतावण्या केल्या. मात्र बहुमत असतानादेखील त्यांना विरोधकाच्या बाकावर बसण्याची वेळ आली होती. भाजप राष्ट्रवादीसोबत सत्ता स्थापन करणार असल्याचे लक्षात आल्यावर शिंदे गटाची अवस्था दयनीय झाली. भाजप व राष्ट्रवादीला उध्दव ठाकरे व कॉंग्रेसनेदेखील पाठींबा दर्शविल्याची चर्चा झाल्यावर शिंदे गटाची अवस्था शेळीसारखी झाली होती. जास्त उमेदवार असूनही विरोधक म्हणून बसावे लागणार ही नामुष्की शिंदे गटाला सहन झाली नाही. अखेर नमतेपणा घेत जिल्ह्याच्या विकासासाठी एकत्र आलोची भूमिका शिंदे गटाने घेतली. मात्र हा निर्णय जनतेच्या विकासासाठी नसून स्वतःच्या विकासासाठी आहे, अशी टीका मतदारांकडून केली जात आहे.

### अर्थ व बांधकाम सभापतीपदाची आस

अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवडणूक गुरुवारी (दि.१२) दुपारी झाली. या निवडणुकीत भाजपचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष राष्ट्रवादीचे मधुकर पाटील बिनविरोध निवडून आले. आता विषय समितीच्या सभापतीपदाकडे लक्ष लागून राहिले आहे. अर्थ, बांधकाम, शिक्षण, आरोग्य, महिला व बालकल्याण, समाजकल्याण सभापतीपदाची निवडणूक येत्या २३ मार्चला होणार आहे. अलिबागमधील नियोजन भवन येथे दुपारी बारा वाजता बैठक होणार आहे. प्राधिकृत अधिकारी म्हणून अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीतही अर्थ व बांधकाम सभापतीपदाची आस शिंदे गटाला आहे. परंतू त्यांची ही अपेक्षा पूर्ण होणार नसल्याची चर्चा समोर येत आहे.



### पालकमंत्रीपदाचा तिढा सुटणार?

रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवड प्रक्रिया पूर्ण झाली आहे. भाजपचे मंगेश वाकडीकर, उपाध्यक्षपद राष्ट्रवादीचे मधुकर पाटील यांच्याकडे देण्यात आले आहे. महायुती एकत्र येऊन सत्ता स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये उध्दव ठाकरे गट शिवसेना व कॉंग्रेसचाही पाठिंबा आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर जिल्ह्यातील पालकमंत्रीपदाचा तिढा सुटणार आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व महायुतीच्या पक्षातील प्रदेशाध्यक्षांच्या मार्गदर्शनातून लवकरच जिल्ह्याला पालकमंत्रीपद मिळेल, असे राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

## वेधक

### शेळी फार्मच्या आडून ड्रग्जविक्री

**पनवेल :** शेळी फार्मच्या आडून ड्रग्जविक्री करणाऱ्या दोघांना अमलीपदार्थ विरोधी पथकाने अटक केली. पोलिसांनी त्यांच्याकडून सुमारे ५.३९ लाखांचे एमडी ड्रग्ज जप्त केले. कळंबोली येथील ठिकाणी छापा टाकून कारवाई करण्यात आली. न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे. एक व्यक्ती कळंबोली सेक्टर १३ येथे शेळी फार्म चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांच्या पथकाने त्या ठिकाणी छापा टाकला. मोहम्मद चौधरी उर्फ वसीम लुंगीवाला आणि अम्रान पटेल या दोघांना ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्यांच्याकडून १३ ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त केले. या ड्रग्जचे बाजारमूल्य सुमारे ५ लाख रुपये आहे.

### रस्त्यावर नोटा टाकून ५० हजार लुटले

**पनवेल :** रस्त्यावर नोटा पडल्याचे सांगून त्या उचलण्यासाठी गेलेल्या रिक्षाचालकाची ५० हजारांची रोकड चोरट्यांनी पळवली. लालचंद्र पाटील यांच्यासोबत हा प्रकार घडला. बँकेतून ५० हजारांची रोकड काढून ते रिक्षाने घराकडे चालले होते. यावेळी मोटारसायकलवरून आलेल्या दोघांनी त्यांना रस्त्यावर नोटा पडल्याचे सांगितले. त्यामुळे पाटील यांनी रिक्षा थांबवून मागे पाहिले असता काही अंतरावर १०, २० व ५०, १०० रुपयांच्या नोटा दिसून आल्या. रस्त्यावर पडलेल्या त्या नोटा आपल्याच असाव्यात असे समजून ते नोटा उचलायला गेले. त्याचवेळी त्यांनी बँकेतून काढलेली व रिक्षात ठेवलेली ५० हजारांची रोकड व त्यासोबत १० लाखांच्या एफडीचे पेपर व बँकेचे पासबुक, चेकबुक चोरट्यांनी पळवले.

## उपाध्यक्षपदी मधुकर पाटील यांच्या निवडीने रोह्यात उत्साह

**। रोहा । विशेष प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवडणूक गुरुवार पार पडली. यामध्ये रोहा तालुक्यातील भुवनेश्वर जिल्हा परिषद गटाचे विजयी उमेदवार मधुकर मारुती पाटील यांची जिल्हा परिषद उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याची घोषणा होताच रोहा शहर व तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि मधुकर पाटील यांच्या चाहत्यांनी मोठा जल्लोष साजरा केला.

मधुकर पाटील यांनी गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात निष्ठेने काम करत संघटन मजबूत करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पक्षाच्या तालुका अध्यक्ष, जिल्हा अध्यक्ष तसेच महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. त्यांच्या वडिलांचा राजकीय वारसा पुढे नेत त्यांनी सातत्याने पक्षासाठी आणि जनतेसाठी काम केले आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल घेत त्यांच्यावर रायगड जिल्हा परिषदेचा कारभार पाहण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

या निवडीबद्दल खासदार सुनील तटकरे, मंत्री अदिती तटकरे तसेच माजी आमदार अनिकेत तटकरे राष्ट्रवादीचे सरचिटणीस विजयराव मोरे, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, माजी सभापती अनिल भगत, रोहा नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांनी मधुकर पाटील यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

## डंपरने विद्यार्थ्याला चिरडले

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी ।**

पिंपरी चिंचवड शहरातील प्रेम लोक पार्क परिसरात आकुर्डीवरून चिंचवडगावकडे जाणाऱ्या रस्त्यावरती शाळकरी मुलाला आरएमसी ट्रक अर्थात डंपरने चिरडले. या घटनेत शाळकरी मुलाचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे. गुरुवारी (दि.१२) दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. या अपघातात फारुक तांबोळी या नववीत शिकणाऱ्या शाळकरी मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघाताचा सीसीटीव्ही व्हिडीओदेखील समोर आला असून, घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी ट्रक चालक आणि ट्रकदेखील ताब्यात घेतला आहे.

## आंबेनळी घाटात कार दरीत कोसळली

### ५ प्रवासी जखमी; महाबळेश्वर रुग्णालयात उपचार

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर-महाबळेश्वर-वाई राज्य मार्गावरील बावली टोक येथे आंबेनळी घाटात मारुती वॅगनआर कार सुमारे ३०० ते ४०० फूट खोल दरीत कोसळल्याची घटना गुरुवारी (दि.१२) सकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली. या अपघातात कारमधील ५ प्रवासी जखमी झाले. अपघातस्थळी महाबळेश्वर व प्रतापगड येथील रेस्क्यू टीमने धाव घेत सर्व जखमींना बाहेर काढून उपचारासाठी महाबळेश्वरला दाखल केले.



सातारा जिल्ह्यातील लाखवड गावचे काही ग्रामस्थ मुंबईहून गावी परतताना पहाटेच्या सुमारास आंबेनळी घाटातील •➤ पान २ वर

## उन्हाच्या झळानंतर अवकाळीचेही सावट

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

राज्यातील हवामानात सातत्याने मोठे बदल होत आहेत. कमाल तापमान ४१ अंश सेल्सिअसवर पोहचले असताना आता पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. राज्यात यंदा फेब्रुवारीच्या मध्यान्हपासूनच ऊन तापायला सुरुवात झाली. मार्च महिन्याच्या दुसऱ्याच आठवड्यात कमाल तापमानाने चाळीशी ओलांडली. विदर्भात अकोला जिल्ह्यात सर्वाधिक ४१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर हवामान खात्यानेही विदर्भातील काही जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला. मात्र, आता हवामानात पुन्हा एकदा बदल होत आहे.

भर उन्हाळ्यात आता हवामान खात्याने अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे. डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात कमी अधिक प्रमाणात पाऊस होताना दिसला. त्यामध्येच आता पुन्हा एकदा पावसाचा मोठा इशारा वर्तवण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वीच राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी पिकाचे मोठे नुकसान झाले होते. त्यामध्येच आता पुन्हा एकदा पावसाचा अंदाज वर्तवण्यात आल्याने शेतकरी चिंतेत आहे. शुक्रवार आणि शनिवारी (दि.१३, १४) विदर्भासह मराठवाड्यात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. १३ मार्च रोजी •➤ पान २ वर

## जम्मू ते कन्याकुमारी अंतर दुचाकीवर पार



- **माणगावच्या अपेक्षा शेट्टीचे कौतुकास्पद धाडस**
- **४००० किमीचा केला धाडसी सोलो प्रवास**

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

भारताच्या उत्तरेकडील हिमालयाच्या पायथ्यापासून ते दक्षिणेच्या अथांग समुद्र किनाऱ्यापर्यंतचा जम्मू ते कन्याकुमारी हा प्रवास अनेकांच्या स्वप्नात असतो. मात्र हे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याचे धाडस मोजक्याच जणांकडे असते. माणगावची कन्या अपेक्षा रायशेट्टी हिने तब्बल ४००० किलोमीटरपेक्षा अधिक अंतराचा सोलो प्रवास करून हे स्वप्न साकार केले असून तिच्या या धाडसी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

भारताच्या उत्तर ते दक्षिण कण्याला स्पर्श करणाऱ्या या प्रवासात अपेक्षाने प्रवासात संस्कृती जवळून अनुभवली. जम्मू, पंजाब, उत्तराखंड, दिल्ली, हरियाणा, मध्य •➤ पान २ वर

## पाचवे पुण्यस्मरण



**कै. अनंतराव गोटीराम देशमुख**

सहवास जरी सुटला,
स्मृती सुगंध देत राहील
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर
आठवण तुमची येत राहील
तुमच्या पवित्र स्मृतीस आम्हा सर्वांची

**भावपूर्ण श्रद्धांजली**

शोकाकुल

**समस्त देशमुख परिवार**




# अनधिकृत स्टॉलधारकांचे अतिक्रमण

## नगरपरिषद व वन विभागाकडून कारवाई नाही

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन शहर हे पर्यटकांच्या पसंतीचे एक नंबरचे ठिकाण बनले आहे. त्यामुळे या ठिकाणी पर्यटकांचा ओघ खूप मोठ्या प्रमाणात वाढलेला पाहायला मिळतो. येणारे पर्यटक श्रीवर्धनचा समुद्र किनारा पाहण्यासाठी व समुद्र स्नानाचा आनंद घेण्यासाठी श्रीवर्धनच्या समुद्रकिनारी येत असतात. परंतु या ठिकाणी वाढलेल्या पर्यटकांच्या संख्येमुळे अनधिकृत स्टॉल टाकण्याचे प्रमाण देखील खूप मोठ्या प्रमाणावर वाढले आहे.

सर्व अनधिकृत स्टॉल्स हे वनविभागाच्या जागेवरती किंवा नगर परिषदेच्या रस्त्याच्या कडेला आहेत. अनधिकृत स्टॉल्समुळे या ठिकाणी पर्यटकांना जाण्या येण्यासाठी अडचण निर्माण होते. तर अनेक वेळेला वाहने देखील उभी करण्यासाठी जागा नसते.

श्रीवर्धन येथील शासकीय विश्रामगृहाच्या बाजूला असलेल्या समुद्रकिनारी स्मशानभूमी आहे. या स्मशानभूमीचा बाहेरचा परिसर स्टॉल धारकांनी व्यापून टाकला आहे. तर फेस्टिवल बीचच्या साईडला रोज नवनवीन स्टॉल्स उभे करण्यात येत आहेत. या ठिकाणी नगर परिषदेने फलक लावून स्टॉल लावू नयेत. अशा सूचना लावलेल्या असताना देखील स्टॉल धारकांकडून त्या ठिकाणी अनधिकृतपणे स्टॉल्स लावले जात आहेत.

अनेक वेळा हे स्टॉल धारक जेवणाच्या मोठमोठ्या ऑर्डर्स घेऊन पर्यटकांना श्रीवर्धनच्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरती जेवायला वाढत असल्याचे देखील पाहायला मिळाले आहे.

श्रीवर्धन शहरात अनेक हॉटेल व्यवसायिक आहेत. ज्यांनी शासकीय सर्व परवाने घेऊन हॉटेल व्यवसाय सुरू केलेला आहे. तर अनेक हॉटेल व्यवसायिक हे भाड्याने जागा घेऊन त्या ठिकाणी व्यवसाय करत आहेत व शासनाच्या सर्व परवानग्या घेऊन व्यवसाय करत आहेत.

परंतु अनधिकृत पणे समुद्रकिनारी स्टॉल उभे करून चहा, नाश्ता, जेवण इत्यादी पदार्थ पुरवणारे स्टॉलधारक कोणत्याही प्रकारचे लायसन्स किंवा परवाना न काढता व्यवसाय करत आहेत. त्यामुळे हॉटेल व्यवसायिकांवरती मंदीचे सावट आल्याचे दिसत आहे.

समुद्र किनाऱ्यावर वनविभागाची देखील जागा आहे. त्या जागेमध्ये देखील अनेक अनधिकृत स्टॉल्स आहेत. त्याचप्रमाणे नगर परिषदेच्या व महाराष्ट्र शासनाच्या जागेमध्ये सुद्धा अनधिकृत स्टॉल्स आहेत.

मात्र संबंधित विभागाकडून हे अनधिकृत स्टॉल हटविण्यासाठी कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने हॉटेल व्यवसायिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

नगरपरिषद आणि वनविभागाचे दुर्लक्ष होत असल्याने अनधिकृत स्टॉलधारकांचे फावले आहे.

खाद्यपदार्थांचे स्टॉल चालविणाऱ्यांकडे अन्न व औषध प्रशासनाने देखील पहाणी करण्याची गरज आहे. तरी श्रीवर्धन नगरपरिषद व वनविभाग या अनधिकृत स्टॉलधारकांवरती कारवाई करणार का? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.



# स्त्री ही समाज घडवणारी शक्ती

● नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांचे प्रतिपादन

| आगरदांडा | प्रतिनिधी |

आजची स्त्री केवळ घर सांभाळणारी नाही तर समाज घडवणारी मोठी शक्ती आहे. महिलांना केवळ समान संधी नव्हे तर समान हक्क आणि सन्मान मिळणे आवश्यक आहे. महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडेही लक्ष दिले पाहिजे. एकदा स्त्रीने ठरविले तर ती कुटुंबासह संपूर्ण समाजाला प्रगतीच्या दिशेने नेऊ शकते, असे प्रतिपादन मुरूड-जंजिरा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी केले.

मुरूड-जंजिरा नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, मुख्याधिकारी सचिन बच्छाव, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती नगमाना खानजादे, सचिव दीप्ती एरंडे, तसेच नगरसेवक-नगरसेविका व अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. तसेच राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शहरातील कर्तृत्ववान महिलांचा श्रीफळ, शाल व सन्मानचिन्ह देऊन 'हिरकणी पुरस्कार' प्रदान करून गौरव करण्यात आला. मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी महिलांनी नियमित व्यायाम करून आरोग्याची काळजी घ्यावी, तसेच नगरपरिषदेने उभारलेल्या व्यायामशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी प्लास्टिकमुक्त मुरूड मोहिमेंतर्गत कापडी पिशव्यांचेही वाटप करण्यात आले. तसेच महिलांसाठी बलून ब्लास्टिंग, रिंग बॉल पासिंग, संगीत खुर्ची, रिळ सोडविणे, ग्लासाचा बंगला बनविणे आदी विविध फनिगेम्स स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धांना महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रत्येक खेळातील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. लकी ड्रॉमध्ये कोळीवाड्यातील मीना भगत या विजेत्या ठरल्या असून, त्यांना नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांच्या हस्ते पैठणी साडी देऊन सन्मानित करण्यात आले.

# महामार्गावरील ओव्हरलोड कोळसा वाहतूक बंद करा

| महाड | प्रतिनिधी |



मुंबई-गोवा महामार्गावर सुरू असलेल्या ओव्हरलोड कोळसा वाहतुकीमुळे वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर येत्या आठ दिवसांत ही वाहतूक बंद करण्यात यावी, अन्यथा चक्काजाम आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. याबाबत दक्षिण रायगड जिल्हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वाहतूक सेनेचे अध्यक्ष सुभाष मोरे यांनी पेण येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात जाऊन अंतिम निवेदन सादर केले.

पेणचे उपप्रादेशिक परिवहन प्रभारी अधिकारी माधव सूर्यवंशी यांची भेट घेऊन हे निवेदन देण्यात आले. महामार्गावर ओव्हरलोड कोळसा वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असल्यामुळे दुचाकी व चारचाकी वाहनांचे अनेक अपघात घडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या अपघातांमध्ये अनेकांना जीव गमवावा लागला असून, अनेकजण कायमस्वरूपी जखमी झाले आहेत. तरीदेखील अवैधरीत्या ओव्हरलोड

# गॅस सिलिंडरच्या तुटवड्यामुळे हॉटेल बंद होण्याची शक्यता

## हॉटेल व्यावसायिकांची नाराजी

| आगरदांडा | प्रतिनिधी |

इराण-इस्त्रायल संघर्षाचे पडसाद आता भारतातही उमटू लागल्याचे चित्र दिसत असून, त्याचा परिणाम एलपीजी गॅसच्या पुरवठ्यावर होत आहे. केंद्र सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलिंडरचा पुरवठा तात्पुरता थांबवल्याने मुरूडमधील हॉटेल व्यावसायिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

मुरूड शहरासह पंचक्रोशीतील कामगार, विद्यार्थी आणि नागरिक सकाळ-संध्याकाळ नाश्त्यासाठी हॉटेलांवर अवलंबून असतात. मात्र, सध्या गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे




अनेक हॉटेलांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिस्थिती अशीच राहिल्यास काही दिवसांत हॉटेल बंद करण्याची वेळ येऊ शकते, अशी भीती व्यावसायिकांनी व्यक्त केली आहे. सध्या काही ठिकाणी सकाळच्या नाश्त्याचे पदार्थही बंद करण्यात आले आहेत.

मुरूड बाजारपेठेतील कृष्णा हॉटेलचे मालक संजय सिंग यांनी सांगितले की, पुढील दोन दिवसांत व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरू झाला नाही तर हॉटेल आणि हॉटेल बंद करण्याची वेळ येईल. याचा थेट परिणाम हॉटेलमधील कामगारांवर होणार आहे. सरकारने तातडीने या प्रश्नावर तोडगा काढून व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणीही हॉटेल व्यावसायिकांकडून करण्यात येत आहे. गॅसच्या तुटवड्यामुळे हॉटेल व्यवसायासह ग्राहकांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# 'सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडवावेत'

| खरोशी | प्रतिनिधी |



सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांचे विविध प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, या मागणीसाठी शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी दहितुले मॅडम यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमरचंद पाटील, सरचिटणीस गुरुनाथ पाटील तसेच पेण तालुका अध्यक्ष राजाराम गावंड उपस्थित होते.

बैठकीदरम्यान निवड श्रेणी, उपादान अंशदान रक्कम, गटविमा, भविष्यनिर्वाह निधी तसेच सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रलंबित प्रस्ताव या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रस्ताव वेळेत सादर न करणाऱ्या गटशिक्षणाधिकाऱ्यांना याबाबत सूचना देण्यात येणार असल्याचे शिक्षणाधिकाऱ्यांनी सांगितले. तसेच जुलै २०२४ ते जानेवारी २०२५ या कालावधीतील वाढीव घरभाडे भत्त्याबाबत शालार्थ आयडीद्वारे मागणी करण्यात आली असून, संबंधित लिपिकांशी चर्चा करून तो प्रश्न सोडविण्याचे आश्वासन देण्यात आले. दुय्यम सेवा पुस्तकांबाबतही चर्चा झाली असून, हरिश्चंद्र काळू गायकवाड यांच्या दुय्यम सेवा पुस्तकाची चौकशी करण्यात आली. ज्या शिक्षकांनी दुय्यम सेवा पुस्तकांची मागणी केली आहे, त्यांचे प्रश्न लवकरच निकाली काढण्याचे आश्वासन शिक्षणाधिकाऱ्यांनी दिले. ही भेट आणि चर्चा सकारात्मक झाल्याचे सांगत सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी संघटना सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचे अमरचंद पाटील यांनी यावेळी सांगितले.

# अमृत पेठ- थेट स्वदेशी बाजारपेठ उपक्रम खोपोली येथे संपन्न

| रायगड | प्रतिनिधी |



महाराष्ट्र संशोधन, उन्नती प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या संस्थेचा अमृत पेठ थेट स्वदेशी बाजारपेठ उपक्रम खोपोली येथे ६ मार्च ते ८ मार्च २०२६ या कालावधीत संपन्न झाला. अमृतच्या अमृत पेठ-थेट बाजारपेठ संकल्पनेचा लघु उद्योजकांनी लाभ घेतला.

अमृत या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण, लघुउद्योगाला चालना आणि स्वयंरोजगार निर्मिती याकरिता स्थानिक लघु उद्योजक, अमृत लक्षित गटातील वीविध व्यवसायिक प्रशिक्षणे घेतलेल्या लाभार्थ्यांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी, विक्री कौशल्य वाढावे याकरिता व्यवस्थापकीय संचालक यांची संकल्पना असलेली अमृत पेठ-थेट बाजारपेठ काम करते.

खोपोली येथे भरलेल्या अमृत पेठ स्थानिक उद्योजकांचे ४० हून अधिक स्टॉल होते. प्रत्येक दिवशी लकी ड्रॉ कुपन काढून त्यातून तीन विजेते निवडून त्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली. अमृत पेठ शैलेश मराठे, मंगेश ढेबे या अमृत कर्मचाऱ्यांच्या नियोजनातून सुरु झाली आहे याकरिता उद्योजक संजय तन्ना, अमित कुलकर्णी, भारती शहा, महर्षी यांचे विशेष मदत आणि योगदान लाभले आहे.

पान १ वरून

## जि. प. च्या सत्तेचा सौदा ठरला

उपाध्यक्षपदासाठी मधुकर पाटील यांनी उमेदवारी अर्ज भरला. या दोन्ही पदासाठी एकमेव अर्ज दाखल झाले. दुपारी दोननंतर निवडीच्या बैठकीत अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची घोषणा करण्यात आली. यावेळी भाजपसह राष्ट्रवादीने जल्लोष साजरा केला. आनंदोत्सव साजरा होत असताना मात्र अर्ज भरताना शिंदे गटातील काही सदस्य गैरहजर असल्याचे दिसून आले. अध्यक्ष व उपाध्यक्षपद सव्वा वर्षाच्या बोलीवर असणार आहे. त्यानंतर राष्ट्रवादी व शिंदे गटाला संधी मिळणार आहे. मात्र या कालावधीत शिंदे गटाची काय अवस्था होणार हे लवकरच दिसून येणार असल्याची चर्चा आहे.

**शिंदे गटाच्या सदस्यांची बैठकीत पाठ**

रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या निमित्ताने अलिबागमधील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत भाजपसह राष्ट्रवादीचे सर्व सदस्य उपस्थित होते. मात्र शिंदे गटातील २१ सदस्यांपैकी फक्त सहा सदस्यांनी या बैठकीत हजेरी लावली. त्यामुळे शिंदे गटाच्या सदस्यांची बैठकीत पाठ असे चित्र दिसून आले आहे.

**शिंदे गटाचे वांदे**

रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाची धुरा भाजपकडे आणि उपाध्यक्षपदाची धुरा राष्ट्रवादीकडे सोपविण्यात आली आहे. भाजप, राष्ट्रवादीसोबत आता शिंदे गटाने देखील सत्तेत येण्याचे मान्य केले आहे. त्यामुळे सध्याचे अध्यक्षपद हे सव्वा वर्षाचे असणार आहे. त्यानंतर राष्ट्रवादीकडे सव्वा वर्षे अध्यक्षपद देण्याचे ठरले आहे. परंतु या राजकीय खेळीत शिंदे गटाची मोठी गोची होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. सत्तेत जाऊनही शिंदे गटाचे वांदे झाले असल्याचे बोलले जात आहे.

## उन्हाच्या झळानंतर अवकाळीचेही सावट

यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्याला पावसाचा येलो अलर्ट दिला आहे. तर १४ मार्च रोजी, नागपूर, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर या जिल्ह्यांना पावसाचे येलो अलर्ट देण्यात आला आहे. तर पुणे, नांदेड, बीड, परभणी येथे अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. शनिवारी लातूर धाराशिवमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याचा अंदाज आहे. यासोबतच जोरदार वारेही यादरम्यान वाहण्याची शक्यता आहे. मराठवाड्याच्या दक्षिण भागात लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. कोकणात उष्णता अधिक वाढेल आणि उष्ण वातावरण अधिक राहण्याचा अंदाज आहे. काही भागात आजही पारा ४० च्या पार जाण्याची शक्यता आहे.

## आंबेनळी घाटात कार दरीत कोसळली

बावली टोक-चिरेखिंड दरम्यान वाहनाचा ताबा सुटल्याने कार रस्त्याच्या कडेला जाऊन खोल दरीत कोसळली. अपघातानंतर वाहन थेट सुमारे ३०० ते ४०० फूट खोल दरीत जाऊन अडकले. या कार अपघातात अजय सुनील संकपाळ, तुकाराम संकपाळ, सुनील संकपाळ, पार्थ संकपाळ आणि संगीता संकपाळ हे प्रवासी जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी महाबळेश्वर येथील रुग्णालयात हलवण्यात आले. प्रतापगड सर्च एंड रेस्क्यू टीम चे सदस्य संकेत सावंत व ऋषिकेश जाधव यांना या अपघाताची माहिती मिळताच त्यांनी इतर सदस्यांना संपर्क साधून रेस्क्यू वर्कला सुरवात केली.

प्रतापगड सर्च एंड रेस्क्यू टीमचे सदस्य अजित जाधव, अनिकेत वागदरे, संकेत सावंत, ऋषिकेश जाधव यांनी घटनास्थळी धाव घेत महाबळेश्वर ट्रेकर्सच्या सदस्यांना देखील अपघाताची माहिती दिली. स्पॉटवर पोहोचल्यानंतर दोरीच्या मदतीने रेस्क्यू टीमचे सदस्य दरीमध्ये उतरले. जी व्यक्ती जास्त जखमी आहे, त्याला स्ट्रेचरवरून दोरीच्या सहाय्याने घाट रस्त्यावर काढण्यात आले. याप्रकारे उर्वरित सर्व जखमींना सुखरूप वर काढून कारमधील सर्व ५ जखमी प्रवाशांना महाबळेश्वर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.या मोहिमेत प्रतापगड सर्च एंड रेस्क्यू टीमचे अनिकेत वागदरे, अजित जाधव, ऋषिकेश जाधव, आशिष बिरामने, संकेत सावंत तसेच महाबळेश्वर ट्रेकर्सचे सुनीलबाबा भाटिया, अमित कोळी, सुजित कोळी, सोमनाथ वागदरे यांच्या मदतीसाठी वाडा कुंभरोशी व चिरेखिंड ग्रामस्थ तसेच पोलादपूर पोलीस ठाण्याचे कर्मचारी उपस्थित होते.

## जम्मू ते कन्याकुमारी अंतर दुचाकीवर पार

प्रदेश, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळ या राज्यांमधून प्रवास करत ती अखेर कन्याकुमारीपर्यंत पोहोचली. या संपूर्ण प्रवासाने तिच्यासाठी आयुष्यातील एक अविस्मरणीय अध्याय निर्माण केला. हा प्रवास केवळ अंतर कापण्यापुरता मर्यादित नव्हता, तर तो जिद्द, सुरक्षितता आणि जबाबदारी यांचा खरा अनुभव देणारा ठरला. एकटीने इतक्या लांबचा प्रवास करताना रस्त्यावरील अनिश्चितता, हवामानातील अचानक बदल, शारीरिक थकवा आणि विविध अडचणींचा सामना करत तिने धैर्याने प्रत्येक टप्पा पार केला. प्रत्येक अनुभवाने तिचा आत्मविश्वास अधिक बळकट केला. या प्रवासातून अपेक्षा शेट्टीला एक महत्त्वाची जाणीव झाली. मर्यादा आपणच आखतो आणि धाडस केले तर त्या मोडून पुढे जाता येते. रस्त्यावर असलेल्या प्रत्येक व्यक्तीबद्दलची जबाबदारी, सुरक्षिततेचे भान आणि सतत पुढे जाण्याची जिद्द या तीन मूल्यांनी हा प्रवास अधिक अर्थपूर्ण बनवला. विशेष म्हणजे, अपेक्षा शेट्टीचे बालपण माणगाव शहरातच गेले. तिचे शिक्षण माणगाव कनिष्ठ महाविद्यालयात पूर्ण झाले. ती माणगावातील श्रद्धा इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका हेगडे यांची सुकन्या आहे. त्यामुळे तिच्या या यशामुळे माणगाव शहरातही अभिमानाची भावना व्यक्त केली जात आहे. सध्या अपेक्षा शेट्टी या के. रहेजा कॉर्प, बीकेसी या प्रतिष्ठित संस्थेत लर्निंग अँड डेव्हलपमेंट स्पेशालिस्ट म्हणून कार्यरत आहेत. व्यावसायिक आयुष्यातील जबाबदाऱ्या सांभाळत त्यांनी केलेला हा साहसी प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. भारताच्या कण्यावरून केलेली ही ४००० किलोमीटरची सोलो राईड तिच्यासाठी केवळ एक साहसी राईड नव्हती, तर स्वतःला पुन्हा शोधण्याचा, स्वतःवर विश्वास ठेवण्याचा आणि आयुष्याकडे नव्या नजरेने पाहण्याचा प्रेरणादायी प्रवास ठरला आहे. अपेक्षा शेट्टीच्या या धाडसी उपक्रमामुळे आज अनेक तरुण-तरुणींना एक संदेश मिळतो, स्वप्न मोठे असावे, धाडस मोठे असावे आणि स्वतःवर विश्वास असेल तर कोणताही प्रवास अशक्य राहत नाही.

## राजेश मपारा यांची हकालपट्टी

पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळात या निर्णयाची मोठी चर्चा रंगली आहे. नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीदरम्यान राजेश मपारा यांनी पक्षाच्या अधिकृत धोरणांविरुद्ध काम केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. भाजपने या निवडणुकांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत युती करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, मपारा यांनी या निर्णयाला विरोध दर्शवत, पक्षाच्या मान्यतेशिवाय स्थानिक संघर्ष आघाडी स्थापन केली आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांना सोबत घेऊन अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता.या शिस्तभंगाच्या प्रकरणाची दखल घेत जिल्हाध्यक्ष कार्यालयाकडून २४ जानेवारी २०२६ रोजी त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्या अनुषंगाने मपारा यांनी जिल्हाध्यक्षांची प्रत्यक्ष भेट घेऊन आपले स्पष्टीकरण दिले होते.

मात्र, त्यानंतरही त्यांनी पुन्हा पक्षविरोधी कारवाया सुरूच ठेवल्याचे निदर्शनास आले.सुधागड तालुक्यातील भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मपारा यांच्या विरोधात लेखी तक्रार केली होती. मपारा हे सातत्याने पक्षाचे नुकसान होईल असे वर्तन करत असून, त्यांनी महाविकास आघाडीसोबत हातमिळवणी करून भाजप उमेदवारांचा पराभव करण्यासाठी प्रयत्न केले, असा आरोप निवेदनात करण्यात आला होता.



# 'सावित्रीबाई फुले यांचे कार्य जोपासा'

| आगरदांडा | प्रतिनिधी |

क्रांतिज्योती, आद्य शिक्षिका, समाजसेविका सावित्रीबाई जोतिराव फुले यांनी पहिली पुण्यात मुलींसाठी शाळा काढली त्यावेळी समाजाने सावित्रीबाई विरोधात गेल्या त्या विरोधात सावित्री बाई घाबरल्या नाहीत त्यांनी पुढे जाऊन मुलींना शिक्षाणात उभे गेले आज मी जे आहे ते सावित्री बाई फुले यांच्यामुळेच आहे.भारताच्या प्रथम महिला शिक्षिका ही एवढीच ओळख सावित्रीबाई फुलेंच्या कर्तृत्वाची करून देण्यासाठी पुरेशी नाही, तर उत्तम कवयित्री, आध्यापिका, समाजसेविका असून त्यांनी देशासाठी केलेले कार्य प्रत्येकांनी जोपासले पाहिजे तर सावित्रीबाई यांना खरी आदरांजली होईल असे प्रतिपादन शिक्षिका तनुजा गोबरे यांनी वीर कोंडाजी फर्जंद शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये आज सावित्रीबाई फुले पुण्यतिथी दिन निमित्त कार्यक्रमावेळी बोलत होते.

प्रथम कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस तनुजा गोबरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नज अकॅडमी हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज सायन्स अँड कॉमर्स संस्कृत विषयाचे शिक्षिका- तनुजा गोबरे ,स्वप्नील गुंजाळ, हरिश्चंद्र नाक्ती, गणेश पालकर, स्वप्निल गुंजाळ, संकेत पालवणकर, पूजा माळी, कृष्ण भुरे, विजय चव्हाण आदिंसह मान्यवर उपस्थित होते.

# मोटारीतील महिलेची सोनसाखळी चोरी

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल, खांदेश्वर, करंजाडे व कळंबोली या परिसरांत महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या हिसकावण्याच्या घटनांनंतर आता मोटारीत बसलेल्या महिलांनाही चोरट्यांनी लक्ष्य करण्यास सुरुवात केल्याचे समोर आले आहे. कळंबोलीत मोटारीत बसलेल्या एका गृहिणीच्या गळ्यातील सुमारे सव्वा लाख रुपयांची सोनसाखळी चोरट्याने हिसकावून नेली. रात्री सुमारे पावणेनऊ वाजण्याच्या सुमारास संबंधित महिला आपल्या मोटारीत बसून मोबाइलवर व्हिडिओ पाहत होती. त्यावेळी एक अनोळखी तरुण त्यांच्या मोटारीजवळ आला. या तरुणाने महिलेचा मोबाइल क्रमांक मागितला. संशय आल्याने संबंधित महिलेने पतीला फोन करण्याचे सांगत मोटारीच्या काचावर करण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी तरुणाने महिलेच्या गळ्यातील सुमारे सव्वा लाख रुपये किमतीची सोनसाखळी हिसकावून घेतली आणि तेथून पळ काढला. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून पोलीस तपास करीत आहेत.

# गॅस दरवाढी विरोधात काँग्रेसने काढला मोर्चा

| पनवेल | वार्ताहर |

राज्य शासनाने केलेल्या गॅस दरवाढी विरोधात आज पनवेल मध्ये काँग्रेस पक्षा तर्फे पायी मोर्चा काढण्यात आला. यावेळी प्रतीकात्मक सिलेंडरची अंत्ययात्रा काढून केंद्र व राज्य शासनाचा निषेध करण्यात आला.

पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटती जिल्हा अध्यक्ष सुदाम पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज हा मोर्चा काढण्यात आला.



## निवडक



### महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा मेगा ब्लॉक

**पनवेल :** पनवेल परिसरात पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वतीने जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर मुख्य जलवाहिनीच्या दुरुस्ती व पाईपलाईन जोडणीच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. या कामासाठी तब्बल ३६ तासांचा मेगा ब्लॉक घेण्यात आला असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. या कालावधीत पनवेल शहरासह काही भागातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी पाणी जपून वापरावे व आवश्यक तेवढाच साठा करून ठेवावा, असे आवाहन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केले आहे. जुन्या मुंबई-पुणे महामार्गालगत सुरू असलेल्या या कामामुळे भविष्यात पाणीपुरवठा अधिक सुरळीत आणि दाबाने होण्यास मदत होणार असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.



### पनवेल-कर्जत रेल्वे मार्गाचे काम वेगात

**पनवेल :** पनवेल ते कर्जत दरम्यान सुरू असलेल्या नव्या रेल्वे मार्गाच्या कामाला सध्या चांगलाच वेग आला आहे. पनवेल रेल्वे स्थानक परिसरात रेल्वे रुळ टाकणे, प्लॅटफॉर्म दुरुस्ती तसेच इतर तांत्रिक कामे जोरात सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. कामासाठी विशेष यंत्रसामग्री आणि रेल्वे कर्मचारी दिवस-रात्र मेहनत घेत आहेत. या मार्गामुळे पनवेल, कर्जत आणि परिसरातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. भविष्यात या मार्गावरून उपनगरी रेल्वे सेवा सुरू झाल्यास प्रवास अधिक जलद आणि सोयीस्कर होणार आहे. सध्या काम अंतिम टप्प्याकडे जात असल्याचे सांगितले जात असून, येत्या पावसाळ्यापूर्वी काही भागांवर रेल्वे सेवा सुरू होईल अशी प्रवाशांमध्ये अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यामुळे पहिल्याच पावसात हिरव्यागार निसर्गातून रेल्वे प्रवासाचा आनंद घेण्याची संधी मिळेल, अशी आशा प्रवासी व्यक्त करत आहेत. या प्रकल्पामुळे पनवेल ते कर्जत दरम्यानचा विकास अधिक वेगाने होण्याची शक्यता असून स्थानिक नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# औद्योगिक क्षेत्रात इंधन टंचाई

- उत्पादन प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता
- उद्योगपतींमध्ये चिंतेचे वातावरण

**| पनवेल | प्रतिनिधी |**

मध्यपूर्वेत सुरू असलेल्या आखाती संघर्षाचे पडसाद आता औद्योगिक क्षेत्रावर उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर इंधन पुरवठा साखळीवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाल्याने तळोजा औद्योगिक क्षेत्रातील उद्योगपतींमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः फर्नेस ऑइल आणि व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्यास कारखान्यांच्या उत्पादन प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता उद्योग क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे.

रायगड जिल्ह्यातील तळोजा औद्योगिक क्षेत्र हे नवी मुंबई परिसरातील अत्यंत महत्त्वाचे औद्योगिक केंद्र मानले जाते. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) माध्यमातून विकसित करण्यात आलेल्या या औद्योगिक वसाहतीत रसायन, औषधनिर्मिती, रंग-रसायने, प्लास्टिक तसेच इंजिनिअरिंग क्षेत्रातील साडेनऊशे लहान मोठे, मध्यम व लघुउद्योग कार्यरत आहेत. या उद्योगांमध्ये हजारो कामगार व कर्मचारी कार्यरत असून या औद्योगिक क्षेत्राचा स्थानिक अर्थव्यवस्थेत मोठा वाटा आहे.



> कारखान्यातील उत्पादन क्षमतेवर अद्याप तरी परिणाम झालेला नाही मात्र युद्ध सुरु राहिल्यास परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.
>
> – शेखर श्रींगारे. अध्यक्ष टी एम ए

> इंजिनियरिंग झोनमधील कारखान्याना व्यावसायिक सिलेंडरची आवश्यकता असते. सिलेंडर उपलब्ध होत नसल्याने इंजिनियरिंग झोन मधील कारखान्यानंमधील कामावर परिणाम होत आहे.
>
> – सतीश शेट्टी.अध्यक्ष तळोजा इंडस्ट्रिअल असोशियन

औद्योगिक वसाहतीतील अनेक रासायनिक व उत्पादन करणाऱ्या कारखान्यांमध्ये बॉयलर, औद्योगिक भट्ट्यातसेच उष्णता निर्माण करणाऱ्या विविध प्रक्रियांसाठी फर्नेस ऑइलचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. फर्नेस ऑइलच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्यास उत्पादन प्रक्रियेत अडथळे निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

#### कारखान्यांमध्ये ऑइलचा वापर कशासाठी?

तळोजा औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक, औषधनिर्मिती, रंग-रसायने, प्लास्टिक व अभियांत्रिकी कारखान्यांमध्ये फर्नेस ऑइलचा वापर विविध औद्योगिक प्रक्रियांसाठी केला जातो.

- बॉयलर चालवण्यासाठी – वाफ (डींशरा) तयार करण्यासाठी.
- भट्ट्या व हीटर्स – उत्पादन प्रक्रियेसाठी आवश्यक उष्णता निर्माण करण्यासाठी.
- ड्रायिंग प्रक्रिया – रसायन, पावडर किंवा कच्चा माल वाळवण्यासाठी
- ऊर्जा निर्मिती – काही औद्योगिक यंत्रणा व प्रक्रियांसाठी उष्णता-ऊर्जा पुरवण्यासाठी.
- कटिंग आणि वेल्डिंग – लोखंड, स्टील व इतर धातू कापणे व जोडण्यासाठी.

दुसरीकडे, तळोजा औद्योगिक क्षेत्रातील इंजिनिअरिंग झोनमध्ये धातू प्रक्रिया, फॅब्रिकेशन तसेच औद्योगिक उपकरणांच्या निर्मितीशी संबंधित अनेक कारखाने कार्यरत आहेत. या कारखान्यांमध्ये धातू कटिंग, वेल्डिंग, फॅब्रिकेशन तसेच विविध यांत्रिक प्रक्रियांसाठी व्यावसायिक गॅस सिलेंडरचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. व्यावसायिक सिलेंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्यास या कारखान्यांच्या कामकाजावर व उत्पादन क्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तळोजा औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर स्थानिक तसेच बाहेरील कामगार कार्यरत असल्याने उत्पादनात घट झाल्यास त्याचा परिणाम रोजगारावरही होऊ शकतो. त्यामुळे परिस्थिती लक्षात घेऊन संबंधित यंत्रणांनी फर्नेस ऑइल व व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा उद्योग क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे.

### स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीर

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जतमधील शतकोत्सवी श्री लक्ष्मीकांत सार्वजनिक वाचनालय व ग्रंथसंग्रहालयाच्या वतीने शनिवार, (दि. २१) मार्च रोजी सकाळी ९:३० ते ४:३० या कालावधीत स्पर्धा परीक्षांच्या संदर्भात, रॉयल गार्डन, कर्जत येथे नि:शुल्क स्वरूपाच्या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक अभ्यासकांनी आपल्या नावाची नोंद करावी असे आवाहन संदीप भोसले यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क दिनेश रणदिवे (९८२३९३८६३९) व रामदास गायकवाड (९०९६३५१८२८) यांच्याशी साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### मुक्या जनावरांची पाण्यासाठी धाव

**| उरण | प्रतिनिधी |**

दिवसेंदिवस वाढत चाललेल्या प्रचंड उष्णतेचा फटका केवळ माणसांनाच नव्हे तर मुक्या जनावरांनाही बसताना दिसत आहे. वाढत्या तापमानामुळे परिसरातील पाण्याचे स्रोत आटत चालल्याने मुक्या जनावरांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे.



पिण्याच्या पाण्यासाठी या जनावरांना अक्षरशः वणवण भटकण्याची वेळ आली आहे. अनेक ठिकाणी पाणी मिळत नसल्याने ही जनावरे ओढे, हौद किंवा पाण्याच्या जागांकडे येत असून कोणीतरी पाणी पाजेल या आशेने तिथेच थांबत असल्याचे चित्र दिसत आहे. गुरुवारी द्रोणागिरी गडावरील हौदाजवळ अशीच हृदयस्पर्शी घटना घडली. दोन मुक्या जनावरांनी तहानेने व्याकुळ होऊन हौदाजवळ धाव घेतली. त्यांना हौदातून पाणी काढून देण्यात आल्यानंतर त्यांनी अक्षरशः गटागटा पाणी पिऊन आपली तहान भागवली.

तहान भागल्यानंतर त्या मुक्या जनावरांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधानाचे हावभाव पाहून उपस्थितांनाही मन विषण्ण झाले. वाढत्या उष्णतेमुळे मुक्या प्राण्यांची होणारी ही परवड पाहता नागरिकांनी शक्य त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था करून मानवतेचा हात पुढे करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### माथेरानमध्ये स्मार्ट वीज मीटरला विरोध

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान शहरामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या वतीने जुन्या मीटर ऐवजी नवीन स्मार्ट विद्युत मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरु आहे. स्मार्ट मीटर बसू अशा मागणीचे निवेदन माथेरान वीज ग्राहक संघर्ष समितीने माथेरान येथील महावितरणचे सहायक अभियंता यांना दिले.



माथेरानमध्ये वीज मीटर बसवताना विद्युत ग्राहकांना पूर्वकल्पना देणे अपेक्षित आहे. कारण हे मीटर बसविल्यास अवाजवी विद्युत बिल येईल अशी विद्युत ग्राहकांची धारणा झाली आहे. मीटर बसविल्यास ते कसे काम करते त्याचे फायदे काय आहेत त्याचा रिचार्ज संपल्यास त्याचा पुढील किती दिवसांचा कालावधी राहील या सर्व शंकांचे निरसन होणे तितकेच महत्वाचे आहे, त्यासाठी वीज वितरण कंपनीतर्फे शहरातील विद्युत ग्राहकांसाठी लघु चर्चासत्र आयोजित करण्यात यावी तोपर्यंत स्मार्ट विद्युत मीटर बसविण्यात येऊ नये. तसेच माथेरान वीज वितरण संघर्ष समितीतर्फे निवेदन सादर केले असता सहायक अभियंता सचिन आटपाडे यांनी हे मान्य केले आहे.

एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात ग्राहकांसाठी लघुचर्चा सत्र आयोजित करण्यात येईल तत्पूर्वी संबंधित कर्मचारी स्मार्ट मीटर बसविण्यास सक्ती करत असेल तर आपण याची माहिती निवेदनात नमूद असलेल्या कोणत्याही पदाधिकाऱ्याला द्यावी असे समितीच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.




छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान

सत्यमेव जयते

महसूल विभाग, महाराष्ट्र शासन



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

सेवा आणि प्रबोधनाचा अभूतपूर्व महोत्सव

- ✔ प्रलंबित फेरफार मंजुरी
- ✔ ७/१२ उताऱ्यांमधील दुरुस्ती
- ✔ डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ आणि ८ अ उताऱ्यांचे वाटप
- ✔ उत्पन्न, रहिवासी व जातीचे प्रमाणपत्र
- ✔ नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र
- ✔ विद्यार्थ्यांसाठी सर्व प्रकारचे दाखले
- ✔ 'कमी- जास्त पत्रके' तयार करून गावनोंदणी दप्तर अद्ययावत करणे
- ✔ ॲग्रीस्टॅक व पीएम किसान नोंदणी
- ✔ मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना
- ✔ अकृषिक(NA) परवानगी व सनद रद्द करण्याबाबतचे मार्गदर्शन
- ✔ जमिन तुकड्यांच्या नियमितीकरणाची माहिती
- ✔ विविध योजनांचे लाभ मंजूर करणे
- ✔ ई मोजणी अर्ज
- ✔ जलद मोजणीसाठी खासगी सर्व्हेयरची मदत
- ✔ कृत्रिम वाळू धोरणाबाबत माहिती
- ✔ घरांसाठी पट्टे वाटप

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाचा लोकोत्सव!

शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि सर्वसामान्य जनतेचे दैनंदिन जीवन सुकर करण्यासाठीचे महाअभियान

७ मार्चच्या अभूतपूर्व प्रतिसादानंतर आता पुन्हा, एकाच दिवशी... संपूर्ण महाराष्ट्रात..!

पुढील दोन महिन्यांचे शिबिरांचे वेळापत्रक

शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ / शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ – ही शिबिरे महसूल मंडळ स्तरावर घेतली जातील.

शुक्रवार, दि. ८ मे २०२६ / शुक्रवार, दि. १५ मे २०२६ – ही शिबिरे नगरपरिषद/ नगरपंचायत स्तरावर घेतली जातील.

शनिवार, दि. १४ मार्च २०२६

महाराष्ट्रातील सर्व तालुक्यातील एका महसूल मंडळात

या! आपले स्वागत आहे!



देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री | एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री | सुनेत्रा अजित पवार, उपमुख्यमंत्री | चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री | योगेश कदम, महसूल राज्यमंत्री

# विकास भुताची खा-खा

या राज्यातल्या अनेक गोष्टी खड्ड्यात गेल्या आहेत वा चालल्या आहेत. राज्याची तिजोरी, राज्याचे राजकारण, राजकीय पक्षांची नीतीमत्ता, माध्यमांमध्ये वापरली जाणारी भाषा, दिल्या जाणाऱ्या बातम्या सगळे काही खड्ड्याच्या दिशेने चालले आहे. आता त्यात पर्यावरण नावाच्या नाजूक महत्वाच्या विषयाचाही समावेश करायला हवा. राज्याचे पर्यावरण खड्ड्यात घालायचा सध्याच्या सरकारने जणू चंगच बांधला आहे. प्रत्येक गोष्टीचे राजकारण करणे आणि महायुती जे करेल ते बरोबर आणि विरोधक करतील ते चूक असे म्हणणे एवढेच आता भाजपवाल्यांचे राजकारण उरले आहे. विकास नावाच्या भुताला सध्या खा खा सुटली असून ते भाजपच्या मानगुटीवर आणि पर्यायाने आपल्या सर्वांच्या डोक्यावर बसले आहे. हे खाऊ की ते खाऊ अशी त्याची अवस्था आहे. चंद्रपूरमध्ये ताडोबाच्या जंगलात वाघांची संख्या प्रचंड वाढली आहे. हे वाघ अनेकदा नागरी वस्तीत येतात व सामान्य गावकऱ्यांवर हल्ला करतात. पण याबद्दल कोणीही वाघांना दोष देत नाही. या वाघांना जाण्यासाठी आपण इतरत्र जंगलेच शिल्लक ठेवलेली नाहीत आणि ताडोबाच्या जंगल परिसरातही मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे केलेलली आहेत हे सर्वांना ठाऊक आहे. वाघ हा खरे तर एकांतप्रिय प्राणी असतो. मानवी वस्ती व गडबड यापासून तो दूर राहतो. पण आता त्याचाही नाईलाज होऊ लागला आहे. पूर्वी एखाद्या जंगलात किती वाघ आहेत त्यावरून ते जंगल किती समृध्द आहे याची परीक्षा होत असे. आता ही परिमाणे बदलली आहेत. मध्यंतरी ताडोबा व यवतमाळ परिसरातल्या वाघिणींना सह्याद्रीच्या जंगलात आणून सोडण्यात आले. पण सह्याद्रीमध्येही हीच अवस्था आहे. महाबळेश्वर ते कोल्हापूर व पुढे या सह्याद्रीच्या पट्ट्यात एकेकाळी घनदाट जंगल होते. त्यामुळे ते वाघांची नैसर्गिक वस्ती होती. पण आता नवीन महाबळेश्वर, पर्यटनाचा विकास अशा नावाखाली बेसुमार जंगलतोड करण्यात आली. रिझॉर्ट्स, घरे, हॉटेले यांना मनमर्जी परवानग्या दिल्या गेल्या. यामुळे तिकडे चांद्यात जी अवस्था झाली आहे त्याहून कंगाल स्थिती इकडे बांद्याकडच्या परिसरावर आली आहे.

## फडणवीसांचाच दबाव?

दुर्दैवाने याला कोणत्याच स्तरावर अटकाव होणे अशक्य झाले आहे. चंद्रपूरमधील ब्रह्मपुरी तालुक्यातील लोहारडोंगरी खाण प्रकल्प अनेक वर्षांपासून वादात आहे. यापूर्वी राज्य वन्यजीव मंडळाने या भागात खाण प्रकल्प करण्यास ठाम नकार दिला होता. मात्र फडणवीसांनी गडचिरोलीचे पालकमंत्रिपद घेतल्यापासून सगळी सूत्रे स्वतःच्या ताब्यात घेतली आहेत. त्यानुसार यंदाच्या जानेवारीत राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत हा प्रस्ताव संमत करण्यात आला. ब्रम्हपुरी परिसरात २००४ च्या सर्वेक्षणानुसार सुमारे ६६ वाघ होते. सध्या निव्वळ लोहारडोंगरीमध्ये ५ ते ६ वाघ आहेत. ही खाण अस्तित्वात आली तर तब्बल १८ हजार झाडे कापावी लागतील. म्हणजेच हे वाघ उघड्यावर पडतील. साहजिकच मग ते मानवी वस्त्यांवर हल्ले करू लागतील. ही धोकादायक स्थिती आहे. वनखाते सध्या भाजपकडे आहे. या खात्याचे मंत्री गणेश नाईक यांच्या नवी मुंबईतील दगडांच्या खाणीवरून एकेकाळी खुद्द बाळासाहेब ठाकऱ्यांनी त्यांना ठोकले होते. आता तेच नाईक जंगल व वाघ वाचवण्याची भूमिका घेत आहेत. काल विधानपरिषदेत त्यांनी खाण प्रकल्पांना मान्यता नाही अशी स्पष्ट भूमिका घेतली. चांगले आहे. पण फडणवीस त्यांना ते करू देतील का हा खरा प्रश्न आहे. कारण ज्या बैठकीत वन्यजीव मंडळाने लोहारडोंगरी खाणीला मान्यता देण्याचा प्रस्ताव संमत करून केंद्राकडे पाठवला तिचे अध्यक्षस्थान खुद्द फडणवीसांनीच भूषवले होते. फडणवीसांशी आपली चर्चा झाली असून आपण हीच भूमिका न्यायालयात मांडू असेही नाईक काल विधिमंडळात म्हणाले. पण सरकार आपल्याच या भूमिकेला दुसऱ्या बाजूने कधी सुरुंग लावेल हे कदाचित नाईकांनाही कळणार नाही. सनफ्लॅग आयर्न अँड स्टील या कंपनीने इथे खाण सुरु करण्याची परवानगी मागितलेली आहे. दरवर्षी दहा लाख टन लोखंड यातून निघणार आहे. हे अत्यंत उच्च दर्जाचे लोहखनिज राहणार असून शक्तीपीठ नावाच्या तथाकथित हायवे मार्गे ते परदेशांना विकण्याचा परवाना उद्योगधंदेवाल्यांना हवा आहे. सध्या या कंपनीमागे अदानी नसला तरी योग्य वेळ येताच या कंपनीमागचा बोलवता धनी कोण आहे हे उघड होईलच.

## वाघ आणि आदिवासी

ब्रह्मपुरी हा वाघांसाठी संरक्षित प्रदेश आहे. तेथे अशा कोणत्याही प्रकल्पांना ठाम विरोध करायला हवा. खाणी किंवा प्रकल्पांमध्ये पर्यावरणाचे रक्षण करण्याबाबतचा आपला इतिहास अत्यंत खराब आहे. मोदी व फडणवीस सरकारांना तर विकास नावाच्या भुताने इतके झपाटले आहे की, त्या नावाखाली ते कशाचेही समर्थन करू शकतात. यापूर्वी मुंबईच्या आरेच्या जंगलात मेट्रो रेल्वेची कारशेड उभारायला स्थानिकांनी व पर्यावरण कार्यकर्त्यांनी विरोध केला होता. पण फडणवीस सरकारने तो मोडून काढला होता. इतकेच नव्हे तर न्यायालयाचे आदेश प्रतिकूल येणार असल्याची भनक लागल्यावर त्यांनी रातोरात इथली हजारो झाडे कापून काढली होती. त्यावेळी ही मेट्रो कारशेड भांडुपला मिठागरांच्या जागेत करावी असा उद्धव ठाकरे सरकारचा प्रस्ताव होता. पण मिठागरांचा ताबा मोदींच्या केंद्र सरकारकडे (बीपीटी) येत असल्याचा फायदा घेऊन त्यात खोडे घालण्यात आले. ठाकरे यांच्या प्रस्तावाला न्यायालयातही विरोध करण्यात आला. आता काहीच दिवसांपूर्वी याच केंद्र सरकारने हा प्रश्न तडजोडीने मिटवणार असल्याचे सांगून न्यायालयातून आपला आक्षेप मागे घेतला. आता ही जमीन अदानीला धारावी विकासाच्या बदल्यात दिली जायची आहे अशा बातम्या आहेत. हेच तिकडे गडचिरोलीमध्ये घडते आहे. तिथे दणादण लोखंडाच्या खाणी आणि पोलाद प्रकल्पांना मान्यता दिली जात आहे. पर्यावरणाचे काय होईल याची चिंता नगण्य आहे. विरोधी पक्ष दुबळे आहेत. स्थानिक लोक आंदोलनात उतरताना दहा वेळा विचार करू लागले आहेत. बंडू धोत्रे नावाच्या स्थानिक कार्यकर्ते लोहारडोंगरी खाणीला विरोध करण्यासाठी उपोषणाला बसले असता त्यांना जबरदस्तीने इस्पितळात टाकण्यात आले. याच धोत्रे यांचा गौरव पंतप्रधान मोदी यांनी मन की बात या आपल्या रेडियो कार्यक्रमातून कधी काळी केला होता. आता त्यांनाच राज्याचे व विकासाचे शत्रू ठरवले जात आहे. इतके दिवस या भागात नक्षलवाद्यांचे भय होते. त्यांचा दबाव होता. पण आता तो संपला आहे. उद्योगपतींच्या फायद्यासाठीच नक्षलवाद्यांना फटाफट ठार मारून त्यांची चळवळ चिरडण्यात आली असावी असे मानायला भरपूर जागा आहे. या भागातील आदिवासी हा आजवर नक्षल, सरकार, पोलिस यांना कायम घाबरून राहिला. पण त्यांच्यावर अन्याय झाला तर त्यांना किमान नक्षलवाद्यांचा छुपा पाठिंबा मिळत होता. आता तो गेल्याने आदिवासी इथल्या वाघांसारखेच उघड्यावर पडू लागले आहेत. त्यांना या नागरी जीवनातील राजकारण व फसवणूक यांच्याशी लढण्याची कला ठाऊक नाही.

---

**विचार**

# गरज मनाच्या सीमा विस्तारण्याची

*अलिकडेच त्रिपुरातील विद्यार्थी अंजेल चकमा याची वंशवादातून हत्या करण्यात आली. त्यानंतर दिल्लीमध्ये अरुणाचल प्रदेशातील तीन महिलांबद्दल शेजाऱ्यांनी 'धंदेवाली' असा घृणास्पद शब्द वापरला. पूर्वोत्तर भारतातील लोकांना उंची, अंगकाठी आणि संस्कृतीच्या आधारावर आजही अभद्र वागणूक दिली जाते. या प्रदेशाला वारंवार कलंकित केले जात आहे. या राज्यांमधील लोक वांशिक भेदभावाला सतत का बळी पडत आहेत?*

### लक्ष्मीप्रिया देवींमुळे मणिपूरचे जगभर कौतुक

*मणिपूर ही रत्नांची भूमी. महाभारतापासून उल्लेख असलेले हे राज्य देशातील 'सेव्हन सिस्टर्स'पैकी एक महत्त्वाचे राज्य. निसर्गाप्रमाणेच इथल्या लोकांना कलेचा वारसा भरभरून मिळाला आहे. लक्ष्मीप्रिया देवी हे असेच एक नाव. सध्या जगभरातील चित्रपट क्षेत्रात गाजत असलेल्या लक्ष्मीप्रिया देवी त्यांना मिळालेल्या पहिल्या 'बाफ्ता' पुरस्कारासाठी चर्चेत आहेतच; पण पुरस्कार सोहळ्याप्रसंगी त्यांनी केलेले भाषण अधिक गाजत आहे. लक्ष्मीप्रिया देवी यांना 'बुंग' या पहिल्यावहिल्या मणिपुरी चित्रपटासाठी 'बाफ्ता' (ब्रिटिश ॲकेडमी फॉर फिल्म अँड टेलिव्हिजन आर्टस) हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला. असा पुरस्कार मिळवणारा हा पहिलाच भारतीय चित्रपट आणि लक्ष्मीप्रिया देवी या ईशान्येकडील राज्यामधील पहिल्याच भारतीय दिग्दर्शिका. प्रसिद्ध निर्माता अभिनेता फरहान अख्तर यांच्या 'एक्सेल एंटरटेनमेंट' या संस्थेने या चित्रपटाची निर्मिती केली असून प्रादेशिक वास्तव मांडणारा हा चित्रपट जागतिक स्तरावर नेऊन त्याची दखल घ्यायला लावण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले आहे. गेल्या पाच वर्षांपासून मणिपूर सतत धगधगत आहे. वांशिक मतभेद, हिंसाचार आणि निर्वासितांच्या समस्या असे अनेक प्रश्न इथे आहेत. या प्रश्नांचा इथल्या रहिवाशांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे. सतत तणावाखाली राहत असताना त्यांची अगदी छोटी छोटी स्वप्नेही अपूर्ण राहत आहेत. आपल्या कलेच्या माध्यमातून हे वास्तव मांडत असताना लक्ष्मीप्रिया देवी यांनी इथे शांतता परत नांदावी, अशी मनापासून इच्छा व्यक्त केली. 'बुंग'मध्येही त्यांनी मणिपूरमधील समस्या, तिथल्या मुलांचे विश्व आणि त्यांची भावनिक आंदोलने प्रभावीपणे मांडली आहेत. येथील वांशिक तणाव आणि रोजच्या आयुष्यावर होणारा परिणाम या सगळ्याला सामोरे जाणाऱ्या बूंग नावाच्या मुलाची ही कथा आहे. जन्मापासूनच त्याने हिंसाचार, वांशिक मतभेद, त्याचे होणारे परिणाम हे सगळे खूप जवळून पाहिले. एकल मातेसोबत राहणारा बूंग वडिलांच्या शोधासाठी जीवलग मित्रासोबत निघतो. आपल्या कुटुंबाला पुन्हा एकत्र आणण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या छोट्या मुलाभोवतीच ही कथा फिरते. 'बुंग'ला याआधीही आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक ठिकाणी नावाजण्यात आले आहे. २०२४ मध्ये टोरांटो इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलमध्ये 'डिस्कव्हरी' विभागात या चित्रपटाचा प्रीमियर झाला होता. तसेच वॉर्सा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल, फिफ्थ इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडिया आणि इंडियन फिल्म फेस्टिव्हल ऑफ मेलबर्न, २०२५ या ठिकाणी तो प्रदर्शित करण्यात आला तेव्हा खूप कौतुक झाले.*

काही काळापूर्वी डेहराडून येथे त्रिपुरातील विद्यार्थी अंजेल चकमा याची हत्या करण्यात आली. या घटनेनंतर दोन महिन्यांपेक्षा कमी कालावधीत दिल्लीमध्ये अरुणाचल प्रदेशातील तीन महिलांना त्यांच्या शेजाऱ्यांनी 'धंदेवाली' असा घृणास्पद शब्द वापरून संबोधले आणि मोमो विकण्याचा अवमानकारक सल्ला दिला. आपल्या देशात, राष्ट्रीय राजधानीत त्यांना परके ठरविण्यात आले, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. जे काश्मिरच्या बाबतीत घडत होते, तेच आता पूर्वोत्तरातील लोकांबाबत घडते आहे. अनेक पूर्वोत्तर वा काश्मिरींना देशाचे घटक मानले जात नाही. ते आणि आपण असा भेद केला जातो. त्यामुळे पूर्वोत्तर आणि काश्मिरी लोकांमध्येही एक प्रकारे देशापासून अलिप्ततेची भावना निर्माण होते. दिल्लीतील अभद्रता कोणत्याही भांडणाची किंवा आवेशाची प्रतिक्रिया नव्हती, तर ती थेट ओळख आणि जातीयतेवर केंद्रित केलेला हल्ला होता. या प्रकरणात धर्म, जात आणि जन्मस्थानाच्या आधारे वैरभाव पसरवल्याच्या आरोपांवर एक व्यक्ती आणि त्याच्या पत्नीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला. इतरही आरोप लावण्यात आले. निःसंशयपणे, या दांपत्याच्या आक्षेपार्ह वर्तनाने 'सबका साथ, सबका विकास' या संकल्पनेला छेद देणारी मानसिकता उघडी पाडली. २०१४ मधील नीदो तानिया यांच्या हत्येपासून २०२५ मधील अंजेल चकमा यांच्या हत्येपर्यंत पूर्वग्रहांची ही साखळी स्पष्टपणे दिसून येते. पूर्वोत्तरातील विद्यार्थी आणि कामगारांना त्यांच्या शारीरिक वैशिष्ट्यांवर, आहार संस्कृतीवर आणि भाषेवरून सतत लक्ष्य केले जात आहे. भारताच्या समृद्ध विविधतेचा खरा अर्थ काही संकुचित प्रवृत्तीचे लोक ओळखू शकत नाहीत, हीच खरी चिंता आहे.

एखाद्या राज्याची भौगोलिक स्थिती, हवामान आणि शतकानुशतके चालत आलेली संस्कृती यांचा प्रभाव व्यक्तीच्या रूपावर, भाषेवर आणि वर्तनावर पडत असतो. कोसागणिक भाषा आणि पाणी बदलणाऱ्या देशाची ही विविधता त्याचे सौंदर्य आहे. या विविधतेचा सन्मान आणि स्वीकार करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. पर्वतीय प्रदेशातील वातावरण आणि हवामान व्यक्तीच्या साधेपणा, सौम्यता आणि उंची, अंगकाठीवर परिणाम करतात. पूर्वोत्तर समाजातील स्त्रीप्रधान कुटुंबव्यवस्था आणि सार्वजनिक जीवनातील स्त्रीची महत्त्वपूर्ण भूमिका इतर भागांमधील लोकांकडून अनेकदा दुषित नजरेने पडताळली जाते. परिणामी, परस्पर विश्वासावर आधारलेल्या या सामाजिक रचनेत स्त्रीच्या भूमिकेबाबत नकारात्मक समजुती निर्माण केल्या जातात. म्हणूनच पूर्वोत्तरातील लोक वारंवार तक्रार करतात, की त्यांच्या महिलांकडे संशयाने पाहिले जाते आणि कोणताही आधार नसताना त्यांच्यावर अनैतिक वर्तनाचे आरोप केले जातात. देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने प्रादेशिक ओळखीच्या आधारे होणाऱ्या भेदभावाबाबत वेळोवेळी इशारा दिला आहे. कालांतराने निर्माण होणारी वांशिक शत्रुता हा त्याच प्रवाहाचा विद्रूप अवतार आहे. दिल्लीतील अलीकडील प्रकरणात सामाजिक श्रेष्ठत्वाचा दावा, एखाद्या मोठ्या राजकीय नेत्याशी संबंध असल्याचा आव आणणे आणि दुसऱ्याला कमी लेखत 'औकात' या शब्दाने हिणवणेही बाब अत्यंत चिंताजनक आहे. काही भारतीय स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजण्याचा भ्रम बाळगतात, याचे हे द्योतक आहे. सिक्कीममधील एका वकिलांनी म्हटले आहे, की आम्हीही तितकेच भारतीय आहोत, जितके इतर कोणी. प्रत्येक भारतीयाला देशात कुठेही सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा अधिकार आहे. शासन-प्रशासनाने हा अधिकार अबाधित राहील, याची खात्री करणे ही भारतातील विविधतेतील एकतेची खरी कसोटी आहे. २०१४ मध्ये केंद्र सरकारने एक समिती स्थापन केली. निवृत्त वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी एम. पी. बेजबरुआ यांच्या अध्यक्षतेखालील या समितीचे उद्दिष्ट देशाच्या इतर भागांमध्ये राहणाऱ्या पूर्वोत्तरातील लोकांच्या चिंता तपासणे हे होते. दिल्लीसारख्या महानगरात वांशिक आधारावर होणाऱ्या हल्ल्यांना आळा घालण्यासाठी ही समिती नेमण्यात आली होती. 'वंश' हा शब्द टाळत सरकारने जाणूनबुजून प्रदीर्घ वळणदार शब्दप्रयोग केला. तो योगायोग नव्हता. अनेक भारतीयांना वाटते, की वांशिक भेदभाव फक्त अमेरिका, ऑस्ट्रेलिया किंवा युरोपमध्येच असतो आणि भारतीय हे नेहमी गोऱ्या लोकांच्या भेदभावाचे बळी ठरतात. म्हणूनच २००९ मध्ये ऑस्ट्रेलियातील भारतीयांवरील वांशिक अत्याचारांच्या बातम्या झळकत असताना मिझोरामचे तत्कालीन मुख्यमंत्री पी. लालथानवाला यांनी सिंगापूर येथील परिषदेत भारतातही वांशिक भेदभाव अस्तित्वात असल्याचे विधान केले होते. 'लोक मला विचारतात, तुम्ही भारतीय आहात का? तुम्ही नेपाळमधून आला आहात का? ते विसरतात की पूर्वोत्तर भारताचा भाग आहे.' त्यानंतर पंधरा वर्षांनंतर डेहराडूनमध्ये 'मीही भारतीय आहे' असे सांगणाऱ्या अंजेल चकमा या तरुणाला जीव गमवावा लागला. त्रिपुरातील अंजेल चकमाला डेहराडूनमध्ये 'विदेशी' म्हणून शिवीगाळ करण्यात आली, तेव्हा त्याने प्रत्युत्तर दिले, की आम्ही चीनी नाही, आम्ही भारतीय आहोत. ते सिद्ध करण्यासाठी कोणते प्रमाणपत्र दाखवावे? बेजबरुआ समितीने मात्र 'वंश' हा शब्द वापरण्यास टाळाटाळ केली नाही. मध्यंतरी 'पूर्वोत्तरातील लोकांना 'चिंकी' म्हणाल तर तुरुंगात जावे लागेल,' असे मथळे झळकले होते. समितीची मुख्य शिफारस म्हणजे वांशिक शिवीगाळ आणि हिंसाचार यांना गुन्हा मानणे. काही शिफारशी अमलात आणल्या गेल्या; पण समस्या कायम राहिली. मानववंशशास्त्रज्ञ जेले जे. पी. वूटर्स आणि टंका बी. सुब्बा यांनी निदर्शनास आणले आहे की अनेक भारतीयांच्या कल्पनेतील 'भारतीय चेहरा' या संकल्पनेत पूर्वोत्तर भारतात सामान्यपणे आढळणाऱ्या 'मंगोलियन फेनोटाइप'ला स्थान नाही. 'मंगोलॉइड' हा शब्द जर्मन प्रकृतीवेत्ता जॉन फ्रेडरिक ब्लूमेनबाच यांनी १७९५ मध्ये जैविक आधारावरील पाच वंशांच्या सिद्धांतात वापरला होता. आधुनिक जनुकशास्त्राच्या प्रकाशात हा सिद्धांत कालबाह्य ठरला आहे. तथापि 'भारतीय चेहरा' ही कल्पना आजही फेनोटाइपिक निकषांवर आकार घेताना दिसते. भारतातील ब्रिटिश परराष्ट्र सचिव ओल्फ कॅरो यांनी वापरलेला 'मंगोलियन फ्रिंज' हा शब्दही वसाहतवादी दृष्टिकोन दर्शवतो. आपल्या मनातील चेहऱ्याच्या प्रतिमांवर वसाहतवादी भू-राजकारणाचे अवशेष कायम रहावेत का, हा मूलभूत प्रश्न आहे. या विचारसरणीला आव्हान देणारी सुरुवात भाषातज्ज्ञ आणि लेखक सुनीती कुमार चटर्जी यांनी 'किरात-जन-कृति' या ग्रंथातून केली. भारताची सभ्यता आर्य, द्रविड, ऑस्ट्रिक आणि मंगोलियन घटकांच्या एकत्रित योगदानातून निर्माण झाली, असे त्यांनी नमूद केले. आर्य परंपरेवर अधिक भर देण्यात आला असला, तरी मंगोलियन योगदानाचा पुरेसा अभ्यास झालेला नाही, अशी त्यांची खंत होती. संस्कृतमधील 'किरात' हा शब्द हिमालयीन आणि उत्तर-पूर्वेकडील पर्वतीय समुदायांना उद्देशून वापरला जात असे. विविधतेचा अभिमान बाळगणाऱ्या राष्ट्रात, चेहऱ्याची ठेवण, त्वचेचा रंग, खानपान किंवा भाषा यांवरून एखाद्याच्या भारतीयत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाणे ही अत्यंत वेदनादायक विसंगती आहे. त्यामुळे गरज आहे ती मनाच्या सीमा विस्तारण्याची आणि ईशान्येकडील नागरिकांना 'मुख्य प्रवाहात सामावून घेण्याची.' त्यांच्या ओळखीचा सन्मान करणे, त्यांच्या संस्कृतीकडे समजुतीने पाहणे आणि सार्वजनिक जीवनात त्यांना समान संधी देणेही केवळ सहानुभूतीची बाब नाही, तर ती संविधानिक कर्तव्य आहे.

---

**चर्चा आजची**

# दीर्घकाळ जाणवणार युद्धाच्या दुष्परिणामाचे चटके

इस्रायल आणि अमेरिकेच्या इराणवरील हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर होर्मुझ जलमार्ग चर्चेत आहे. हे नैसर्गिक आहे, कारण जगातील सुमारे २० टक्के तेल आणि वायूचा पुरवठा याद्वारे केला जातो. इराण आणि ओमान दरम्यान एका ठिकाणी फक्त ३३ किलोमीटर अरुंद असलेला हा जलमार्ग पश्चिम आशियामध्ये सुरू झालेल्या महायुद्धापासून रखडलेला आहे. या महत्त्वाच्या जलमार्गाच्या अडथळ्याचे परिणाम संपूर्ण जग भोगत आहेत, ज्यापासून भारतही अस्पर्शित नाही. युद्धाच्या आगीचा परिणाम तेलाच्या किमतीवर होऊ लागला आहे. या वर्षाच्या सुरुवातीला आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल ६० डॉलरच्या पातळीवर होत्या. सोमवारी एका वेळी या किमती सुमारे १२० प्रति बॅरलपर्यंत पोहोचल्या. म्हणजेच दोन महिन्यांत भाव जवळपास दुप्पट झाले आहेत. यापूर्वी, रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर काही महिन्यांनी जून २०२२ मध्ये तेलाच्या किमतीत अशी वाढ दिसून आली होती. तेलाच्या किमती नुकत्याच वाढण्याचे स्पष्ट कारण म्हणजे होर्मुझच्या आसपासची परिस्थिती, कारण दररोज सुमारे १ ते ११ दशलक्ष बॅरल कच्चे तेल येथून जाते. इराक, कुवेत आणि संयुक्त अरब अमिराती म्हणजेच यूएईने त्यांचे उत्पादन बंद केले आहे कारण ते त्यांची उत्पादने बाहेर पाठवू शकत नाहीत. त्यामुळे जगातील सर्वात मोठी तेल कंपनी आरामकोलाही आपली रणनीती बदलावी लागली आहे. या सौदी अरेबियाच्या कंपनीने आपल्या तेलाच्या विक्रीसाठी लाल समुद्रातील यान्बू बंदराचा सहारा घेतला आहे. असे असूनही, ते केवळ ५० लाख बॅरल तेल पुरवण्यास सक्षम आहे, तर सामान्य दिवशी ते ७० लाख बॅरल तेल पुरवते. एकूणच, २० टक्के जागतिक तेलाचा पुरवठा सध्या अडथळ्यात आहे. सध्याच्या परिस्थितीत, विश्लेषकांना दोन परिस्थिती दिसतात. जर हे युद्ध लवकरच संपले तर तेलाच्या किमती ६५ प्रति बॅरलच्या श्रेणीत



येऊ शकतात. याउलट, जर युद्ध सुरू झाले आणि ऊर्जा पायाभूत सुविधांचे गंभीर नुकसान झाले, तर कच्च्या तेलाच्या किमती पुढील सहा महिन्यांत प्रति बॅरल १५० पर्यंत पोहोचू शकतात. अगदी आशावादी दृष्टिकोनही असे सांगतो की या वर्षभरात कच्च्या तेलाचा दर प्रति बॅरल ७५ ते ८० डॉलरच्या दरम्यान दिसू शकतो, जो या वर्षाच्या

**सुयोग आंग्रे**

सुरुवातीपासूनचा उच्चांक असेल. भारतासाठी ही अत्यंत अस्वस्थ स्थिती असेल, कारण भारताला आवश्यक असलेल्या ८५ टक्के तेल आयात करावे लागते. कच्च्या तेलात प्रति बॅरल १० डॉलरची वाढ म्हणजे १२ ते १५ अब्ज डॉलर्सचा आयात खर्चाचा बोजा पडेल. त्यामुळे पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या किमती वाढतील. याचा परिणाम वाहतूक, उत्पादन आणि अन्न व्यवस्थेवर होईल. महागाई वाढेल आणि रिझर्व्ह बँकेला व्याजदर कमी करण्याची संधी कमी होईल. तेलाच्या चर्चेदरम्यान, एलएनजी गॅसच्या मुद्द्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही, ज्याबद्दल धोक्याचे आवाज ऐकू येत आहेत. जगातील एलएनजी निर्यातीचे सर्वात मोठे केंद्र असलेल्या कतारचा रास लफान प्लांट ड्रोन हल्ल्यानंतर ठप्प झाला आहे. जगाच्या २० टक्के एलएनजीचा पुरवठा एकटा कतार करतो. जर अबुधाबीमधील स्टँडऑफचाही यात समावेश असेल तर एलएनजीची मोठी खेप जागतिक बाजारपेठेतून गायब झाली. त्याचा परिणामही दिसून येत आहे. हिवाळा संपल्यानंतर युरोपला एनएलजी स्टोरेजची मोठी गरज भासते, तर आशियामध्ये उन्हाळा सुरू झाल्यावर एअर कंडिशनरची मागणी वाढणार आहे. बदललेल्या परिस्थितीमुळे आठवडाभरात गॅसच्या आयातीत २६ टक्के कपात झाली आहे. आता प्रश्न उपस्थित होत आहे की अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया गॅसच्या आघाडीवर ही टंचाई दूर करण्याच्या स्थितीत आहेत का? हे दोन्ही देश त्यांच्या पूर्ण क्षमतेने पुरवठा करण्यात गुंतलेले आहेत, परंतु तो उपाय असू शकत नाही. मॉर्गन स्टॅनलीच्या मते, कतारमधील गतिरोध महिनाभरात सोडवला नाही तर जागतिक गॅस पुरवठा कोलमडणार आहे. ही दिलासा देणारी बाब आहे की भूतकाळातही युद्ध, महामारी आणि आर्थिक मंदी यांसारख्या संकटानंतर बाजाराने उसळी घेतली आहे. घाईघाईने गुंतवणूक संपत्तीतून बाहेर न पडण्याचा सल्लाही विश्लेषक देतात. एसआयपीमधील गुंतवणुकीचा प्रवाह दर महिन्याला २०,००० कोटी रुपये शिल्लक आहे हे देखील दर्शविते की थोडा संयम दाखवला जात आहे. या संकटातही बँकिंग, फार्मा, संरक्षण आणि दूरसंचार ही क्षेत्रे चमकू शकतील. हा लढा किती काळ चालेल हे आत्ताच सांगणे कठीण आहे. लढाई लवकर थांबली तरी त्याचे दुष्परिणाम काही काळ टिकून राहतात. होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये याआधीही संघर्ष झाला आहे, परंतु तो इतका काळ टिकला नाही. ते लवकरात लवकर उघडण्यासाठी कोणता दबाव निर्माण होऊ शकतो याकडे जगाच्या नजरा खिळल्या आहेत.

---

**लोकसंसद**

## महाराष्ट्र साखर उत्पादनात देशात अव्वल!

गेल्या वर्षी राज्यात समाधानकारक पाऊस पडल्याने ऊसाचे उदंड पीक आले. परिणामी ग्रामीण महाराष्ट्रातील शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकासामध्ये हातभार लावणाऱ्या साखर उद्योगाला यंदा सुगीचे दिवस आले आहेत. इंडियन शुगर अँड बायो-एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (इस्मा) च्या अंदाजानुसार महाराष्ट्र २०२५-२६ च्या हंगामात साखर उत्पादनात देशात अव्वल ठरला असून महाराष्ट्रात अंदाजे ११८ लाख टन साखरेचे उत्पादन अपेक्षित आहे जे दुसऱ्या क्रमांकावरील उत्तर प्रदेशापेक्षा (९८.५ लाख टन) अधिक आहे. देशात यंदा एकूण ३२४ लाख टन साखरेचे उत्पादन अपेक्षित आहे. एकूण उत्पादनापैकी ३१ लाख टन साखर इथेनॉल उत्पादनासाठी वापरण्यात येणार असल्यामुळे निव्वळ साखर उत्पादन २९३ लाख टन इतके असणार आहे. विशेष म्हणजे उत्तर प्रदेशचे साखर उत्पादन घटले असून गेल्या हंगामात ते १०१.१६ लाख टन इतके होते. ते यंदा ९८.५ लाख टनावर आले आहे. तर तिसऱ्या स्थानावरील कर्नाटकचे साखर उत्पादन गेल्या हंगामात ५४.८८ लाख टन होते. त्यात वाढ होऊन यंदा ते ६१.०४ लाख टन राहण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. या निमित्ताने देशात सर्वाधिक ३६.४१ टक्के साखरेचे उत्पादन करणाऱ्या राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आणि सुमारे दोन लाख ऊस कामगारांच्या तोंडात आनंदाची आणि सुखाची साखर पडली आहे.

– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

---

**दिनविशेष**

# प्राच्यविद्या संशोधक डॉ. वासुदेव विष्णू मिराशी

डॉ. वासुदेव विष्णू मिराशी हे भारतातील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्राच्यविद्या संशोधक होते. त्यांचा जन्म १३ मार्च १८९३ रोजी कुवळे (जि. रत्नागिरी, महाराष्ट्र) या गावी मध्यम वर्गीय कुटुंबात झाला. वडिलांचे नाव विष्णू धोंडदेव आणि मातेचे राधाबाई. त्यांचे शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूल व राजाराम कॉलेजमध्ये तसेच पुण्याच्या डेक्कन कॉलेजात झाले. मॅट्रिक (१९१०), बी.ए. (१९१४) व एम ए. (१९१६) यात पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. त्यानंतर शासकीय एल्फिन्स्टन महाविद्यालयात (मुंबई) प्राध्यापक म्हणून काम केले (१९१७-१९१९).

या काळात एलएल.बी. पदवी मिळविली आणि अद्वैतब्रह्मसिद्धि या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर केले. त्याबद्दल त्यांना गोकुळदासजी झाला वेदान्त पारितोषिक मिळाले. पुढे नागपूरच्या मॉरिस कॉलेजात (विद्यमान नागपूर महाविद्यालय) व अमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेजात प्राध्यापक व प्राचार्य (१९४७ ते १९५०) म्हणून सेवानिवृत्तीपर्यंत त्यांनी काम केले. त्यानंतर त्यांनी नागपूर विद्यापीठात सन्मान्य व गुणश्री प्राध्यापक म्हणून काम केले (१९५८ ते १९६६).

मिराशींचा मूळ पिंड शिक्षकाचा होता आणि त्यांचा अध्ययन-अध्यापनाचा विषय संस्कृत वाङ्मय असला; तरी हिरालाल आणि का. ना. दीक्षितांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे ते भारतीय इतिहासाच्या पुराभिलेख, नाणकशास्त्र इ. शास्त्रांकडे वळले. एपिग्राफिया इंडिका(खंड २१-१९३१) यात त्यांचा पुराभिलेखासंबंधीचा पहिला शोधनिबंध प्रसिद्ध झाला. त्यानंतरच त्यांनी कालिदास हे अभ्यासपूर्ण पुस्तक लिहिले (१९३४). सातवाहन, वाकाटक, कलचुरी-चेदी, शिलाहार इ. प्राचीन राजवंशांचे पुराभिलेख त्यांनी संकलित आणि संपादित करून ग्रंथरूपाने प्रसिद्ध केले. यासाठी त्यांनी विविध भौगोलिक प्रदेशांचा कसून शोध घेतला.

कोरीव लेखांच्या आधारे त्यांनी सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख (१९७९), वाकाटक नृपति आणि त्यांचा काल (१९५७), कलचुरी नृपति आणि त्यांचा काल (१९५६), शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख (१९७४) हे चार प्रमुख ग्रंथ लिहिले आणि संस्कृत साहित्याच्या संशोधनपूर्वक अभ्यासातून कालिदास (१९३४), मेघदूतातील रामगिरी अर्थात रामटेक (१९५८), व भवभूति (१९६८) ही तीन पुस्तके प्रसिद्ध केली. या सर्वच ग्रंथांतून प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती यांसंबंधीचे मौलिक संशोधनही आले आहे. पुराभिलेखाइतकाच नाणकशास्त्राचा त्यांचा व्यासंग मोठा व सखोल होता. या विषयातील त्यांचे चाळीसहून अधिक संशोधनात्मक लेख प्रसिद्ध आहेत. त्यांना संशोधनात्मक कार्याबद्दल अनेक मानसन्मान लाभले. विविध संस्थांनी विविध प्रसंगी त्यांच्या कार्याचा गौरव केला.

१९४१ मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांना ङ्गमहामहोपाध्यायफ ही उपाधी दिली. १९५६ मध्ये राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद आणि १९६१ मध्ये राष्ट्रपती राधाकृष्णन यांच्या हस्ते त्यांना ताम्रपट देण्यात आले. इतिहासाविषयक संशोधन करणाऱ्या विविध संस्थांशी सदस्य, अध्यक्ष इ. नात्यांनी त्यांचा निकटचा संबंध आला. मिराशी यांनी आपले संशोधनकार्य जीवनभर अत्यंत निरलसपणे आणि व्रतस्थपणे चालविले. सांसारिक आपत्तींतही त्या कार्यात कधी खंड पडू दिला नाही. एक आदर्श संशोधक म्हणून त्यांना विश्वमान्यता मिळाली. संशोधन महर्षी म्हणून त्यांचा रास्तपणे गौरव करण्यात येतो. अशा या महान संशोधकाचे ३ एप्रिल १९८५ रोजी निधन झाले.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ मार्च
१) श्री. रमेश गणपत म्हात्रे
कुरूळ, अलिबाग
१३-३-१९५२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**अनिल लक्ष्मण ढिवरे, स्मरणार्थ अलिबाग**

# अतिक्रमणाविरोधात बेघरकर आक्रमक

## •नगरपंचायत कार्यालयाखाली साखळी उपोषण

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

पाली नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्रमांक २ मधील बेघरआळी येथे समाजमंदिराच्या जागेवर झालेल्या कथित अनधिकृत अतिक्रमणाविरोधात ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. वारंवार तक्रार करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करत, ग्रामस्थांनी मंगळवारी (दि. १०) दुपारी तीन वाजल्यापासून नगरपंचायत कार्यालयाखाली साखळी उपोषणाला सुरुवात केली.

बेघरआळी येथील होळीमाळ परिसरात सुमारे ४० वर्षांपासून जुने समाजमंदिर आहे. या मंदिराच्या लगत असलेल्या मोकळ्या जागेवर एका लाभार्थ्याने घरकुल योजनेंतर्गत बांधकाम सुरू केले आहे. मात्र, हे बांधकाम करताना समाजमंदिराच्या राखीव जागेवर आणि सार्वजनिक वावराच्या जागेवर अतिक्रमण करण्यात आल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.




ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, डिसेंबर २०२५ पासून या अतिक्रमणाबाबत नगरपंचायतीचे मुख्याधिकारी आणि इंजिनिअरकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला. संबंधित इंजिनिअरनी पाच ते सहा वेळा जागेची पाहणी केली, परंतु केवळ नोटिसा बजावण्यापलीकडे कोणतीही कारवाई केली नाही. प्रशासन केवळ वेळकाढूपणा करत असून, अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांना पाठबळ दिले जात आहे का? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

यावेळी सागर मिसाळ, ललित ठोंबरे, अमित निंबाळकर, संजय वझरकर, आकाश दळवी, संतोष परब, सूर्यकांत शिंदे, रवींद्र कोळंबेकर, संजय कोळंबेकर, सचिन कोळंबेकर, चिंतू काटकर, नंदकुमार गोलीपकर, दिनेश कुलाड, अनिकेत कटके, निलेश पिंडे, नितीन वझरकर, सुधीर यशवंत भगत, दिपक कोळंबेकर, महेश भगत, राजेंद्र थळे आदी स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उपोषणकर्त्यांचा इशारा

जोपर्यंत आमच्या सर्व मागण्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत हे आमरण साखळी उपोषण सुरूच राहील, असा पवित्रा बेघरआळी ग्रामस्थांनी घेतला आहे. या आंदोलनादरम्यान उपोषणकर्त्यांच्या प्रकृतीला काही इजा झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी नगरपंचायत प्रशासन आणि तहसील कार्यालयाची असेल, असा इशाराही लेखी निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. आता प्रशासन यावर काय पाऊल उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या

१. समाज मंदिराच्या जागेवरील अनधिकृत अतिक्रमण तात्काळ हटविण्यात यावे. २. संबंधित लाभार्थ्याच्या जागेच्या कागदपत्रांची सखोल चौकशी व्हावी आणि पुरावे नसल्यास घरकुल नामंजूर करावे. ३. अतिक्रमणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या जबाबदार अधिकारी व इंजिनिअरची चौकशी करून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी. ४. नियमांचे उल्लंघन झाले असल्यास लाभार्थ्याला दंड आकारून रक्कम वसूल करावी.

## गुटखा साठा जप्त

**म्हसळा :** म्हसळा परिसरात एका व्यक्तीकडे मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित तंबाखूजन्य गुटखा बेकायदेशीररीत्या साठवून ठेवलेला आढळून आला. पोलिसांनी छापा टाकून हा साठा जप्त केला. गुटखा व तत्सम तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी घातली असतानाही आरोपी विक्रीसाठी साठा ठेवत असल्याचे आढळले. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, अधिक चौकशी सुरू आहे.

## महाड क्रांती शताब्दी वर्षाचा प्रारंभ

### चवदार तळ्याचे 'ओंजळभर पाणी' पत्रकार भवनात

**| मुंबई | प्रतिनिधी |**

महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त एक विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे. चवदार तळ्याचे प्रतीकात्मक 'ओंजळभर पाणी' मुंबईतील आझाद मैदानाजवळील पत्रकार भवनात आणण्यात आले असून, ते शुक्रवारी तिथे उभारण्यात आलेल्या तळ्याच्या प्रतिकृतीला अर्पण करण्यात येणार आहे. याप्रसंगी संविधानाच्या सरनाम्याचे सामूहिक वाचनही करण्यात येणार असल्याची माहिती मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण आणि 'समान संधी अभियान'चे अध्यक्ष सुनील कदम यांनी दिली.

महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाला सामाजिक समतेच्या लढ्यातील ऐतिहासिक टप्पा मानले जाते. जगातील लोकशाहीची जननी मानल्या जाणाऱ्या फ्रेंच राज्यक्रांतीशी या क्रांतीची तुलना केली जाते. त्यामुळे २० मार्च १९२७ रोजी झालेल्या या ऐतिहासिक घटनेच्या शताब्दी वर्षाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. १८६८ साली महात्मा ज्योतिराव फुले यांनी दुष्काळाच्या काळात पुण्यातील आपल्या घरचा पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला केला होता. त्यानंतर चार दशकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे चवदार तळ्यावर समतेसाठी सत्याग्रह उभारून दलितांना सार्वजनिक पाण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी ऐतिहासिक लढा दिला.

या ऐतिहासिक घटनेला पुढील वर्षी १०० वर्षे पूर्ण होत असून, त्यानिमित्त शताब्दी वर्षाचा प्रारंभिक समारंभ 'समान संधी अभियान' आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी १३ मार्च रोजी पत्रकार भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम सायंकाळी ४ ते ९ या वेळेत आझाद मैदानाजवळील पत्रकार भवनात पार पडणार आहे.

## धुतुममध्ये अनधिकृत पार्किंगचा धंदा?

### राजकीय पदाधिकाऱ्यांच्या चौकशीची मागणी

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील धुतुम गावात सिडकोच्या मोकळ्या जागेवर सुमारे ३ ते ४ एकर क्षेत्रावर खारफुटीची कत्तल करून भराव टाकत अनधिकृत पार्किंगचा व्यवसाय सुरू केल्याचा गंभीर आरोप होत असून, या प्रकरणात माजी सरपंच व उपसरपंच असलेल्या राजकीय पदाधिकाऱ्यांची सखोल चौकशी करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. काही राजकीय नेतेच सिडको अधिकाऱ्यांची दलाली करून त्यांना लाखोंचा मलिंदा देत असल्याचीही चर्चा परिसरात रंगू लागली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, सिडकोच्या मालकीच्या अनेक मोकळ्या जागांवर काही भूमाफियांकडून बेकायदेशीर कब्जा करण्यात आला आहे. या जागांवर खारफुटीची कत्तल करून मोठ्या प्रमाणात भराव टाकण्यात आला असून त्यावर अनधिकृत पार्किंग तसेच इतर गैरधंदे सुरू करून त्या जागा भाड्याने दिल्या जात असल्याची माहिती समोर येत आहे. या पार्किंगच्या माध्यमातून संबंधितांना दरमहा लाखो रुपयांचे उत्पन्न मिळत असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

या सर्व प्रकाराकडे सिडकोच्या अतिक्रमण विभागाकडून आर्थिक साटेलोटामुळे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.धुतुम येथील माजी सरपंच व उपसरपंच असलेल्या काही राजकीय पदाधिकाऱ्यांनीही सुमारे ३ ते ४ एकर जागेवर खारफुटीची कत्तल करून भराव टाकत ती जागा पार्किंगसाठी भाड्याने दिल्याचा आरोप केला जात आहे. विशेष म्हणजे, एकीकडे सिडकोविरोधात ग्रामस्थांना भडकावून आंदोलने उभी करायची आणि दुसरीकडे सिडकोच्याच जागेवर अतिक्रमण करून स्वतःचा स्वार्थ साधायचा, असा दुहेरी डाव काही राजकीय पदाधिकारी खेळत असल्याची चर्चा रंगू लागली आहे. स्थानिकांच्या मते, गेल्या १० ते १५ वर्षांपासून या जागेवर अनधिकृत पार्किंगचा व्यवसाय सुरू असूनही सिडकोच्या अतिक्रमण विभागाने याकडे दुर्लक्ष केले आहे.




(छायाचित्र : नंदकुमार मरवडे)

## कोलाड येथे जागतिक महिला दिन उत्साहात

**| खांब | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील जीवनधारा संस्था कोलाड येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महिला दिनाची थीम स्त्री सौंदर्याचे प्रतीक ही होती.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून एकात्मिक आदिवासी प्रकल्प विकास पेण येथील तेजस्विनी गलांडे, पं.स. बालविकास अधिकारी शरयू शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्षा प्रीतम पाटील, डॉ. नेहा पडवळ प्रतिभा शिंदे, प्राथ. शिक्षिका अमिता बामणे, शोभा खांडेकर, विनायक महाडिक, शामराव शेळके, निमेश वाघमारे, संतोष वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते सेवा केंद्र संस्थेचे संचालक फादर फ्रान्सिस एसव्हीआरएसएस टीम मेंबर श्वेता विश्वकर्मा, जीवनधारा संस्थेच्या संचालिका हिल्डा फर्नांडिस, पॅटसी खान व ग्रेसी गोम्स आदी उपस्थित होते.तर, कार्यक्रमासाठी ३६ आदिवासी वाड्यांतून सुमारे ५०० महिला उपस्थित होत्या. या मेळाव्यात विविध फनीगेम्स तसेच अन्य खेळ घेण्यात आले. त्याचप्रमाणे विविधांगी स्पर्धाही घेण्यात आल्या. या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्वांना बक्षिसे देऊन उपस्थित मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यानंतर उपस्थितीतांचे आभार व्यक्त करून स्नेहभोजनाने मेळाव्याची सांगता करण्यात आली.

## मुरावाडीत होळी पंचमी उत्साहात साजरी

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

नागोठण्याजवळील मुरावाडी येथील ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळ तसेच कानिफनाथ उत्सव मंडळ यांच्यावतीने मुरावाडी येथील हनुमान मंदिरात दरवर्षीप्रमाणे यावर्षी मंगळवार, दि. १० मार्च रोजी आयोजित केलेला कानिफनाथ महाराजांचा होळी पंचमी उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



(छायाचित्र : महेश पवार)

मुरावाडी येथील हनुमान मंदिरात या होळी पंचमी उत्सवाच्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सकाळी ७ वा. कानिफनाथ संप्रदायातील भक्तगणांच्या हस्ते झालेल्या दुग्धाभिषेकाने या धार्मिक सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर सकाळी ११.३० वाजता सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी ५ वा. मुरावाडी ग्रामस्थांकडून होमहवन करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी ६ वा. कंदुरीचा महानैव मिरवणूक व ध्वजारोहण करण्यात आले. तर सायंकाळी ७ वाजता मुरावाडी ग्रामस्थ कानिफनाथ भक्तांकडून कानिफनाथ महाराजांचे भजन, आरती व ओव्या घेण्यात आल्या. यामध्ये ग्रामस्थ मंडळ, मुरवाडी, के.एम.जी. विभाग व नागोठणे पंचक्रोशीतील भक्तगण व नागरिक सहभागी झाले होते.

हा सोहळा यशस्वी होण्यासाठी उत्सव समितीचे गजानन ताडकर, रमेश ताडकर, शिवराम वाघमारे, विनायक ताडकर, प्रवीण ताडकर, काशिनाथ दाभाडे, नयन चोगले, जयेश ताडकर, ग्रामस्थ चंद्रकांत ताडकर, प्रमोद चोगले, प्रकाश ताडकर, सुरेश ताडकर, राहुल ताडकर, नामदेव ताडकर, जनार्दन चोगले, नवनाथ ग्रामस्थ मंडळ मुरावाडी, मुरावाडीचे इतर ग्रामस्थ, मिरानगर, कोंडगाव, नागोठणे उपस्थित होते.

## वीज ग्राहकांना प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याची संधी

**| कल्याण | प्रतिनिधी |**

महावितरणच्या कल्याण परिमंडलातील वीज ग्राहकांना प्रलंबित प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित प्रकरणे, वीज बिलाबाबतचे वाद तसेच वीज चोरीसंदर्भातील दाखलपूर्व आणि प्रलंबित प्रकरणे लोक अदालतीच्या माध्यमातून सामोपचाराने सोडविण्यात येणार आहेत. यासाठी संबंधित ग्राहकांनी शनिवार, १४ मार्च रोजी तालुका न्यायालय स्तरावर आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीत सहभागी व्हावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये १४ मार्च रोजी सकाळपासून राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात येणार आहे. या माध्यमातून वीज ग्राहकांना थकबाकी आणि वादग्रस्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्याची संधी मिळणार आहे.

महावितरणच्या माहितीनुसार, कल्याण मंडळ-१ अंतर्गत सुमारे २,५०० वीज ग्राहकांकडे ७.५८ कोटी रुपयांची थकबाकी आहे. तर कल्याण मंडळ-२ अंतर्गत १ लाख १८ हजार २२७ ग्राहकांकडे तब्बल १५४ कोटी रुपये थकीत आहेत. वसई मंडळातील १ लाख १० हजार ३५९ ग्राहकांकडे १११ कोटी रुपये तर पालघर मंडळातील ७,६५९ ग्राहकांकडे ४७ कोटी रुपयांची थकबाकी आहे. अशाप्रकारे या परिमंडलात एकूण सुमारे ३२० कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. या परिमंडलातील कल्याण मंडळ-१, कल्याण मंडळ-२, वसई आणि पालघर मंडळातील सुमारे २ लाख ३८ हजार वीज ग्राहकांना लोक अदालतीत सहभागी होण्यासाठी विधी विभागामार्फत नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. ज्यांना नोटिस मिळाली नसेल त्यांनीही संबंधित तालुका न्यायालयात हजर राहून आपल्या प्रकरणांचा निपटारा करून घेता येणार आहे.

### लहान मुलगा गंभीर जखमी | प्रशासनाविरोधात नागरिकांचा संताप

## श्रीवर्धनमध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

शहरात भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या आणि त्यांचा आक्रमक स्वभाव यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांत कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून, नुकत्याच घडलेल्या एका धक्कादायक घटनेत भटक्या कुत्र्याने एका लहान मुलावर हल्ला करून त्याला गंभीर जखमी केले. या घटनेमुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून, स्थानिक प्रशासनाच्या कामकाजावर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, शहरातील विविध भागांमध्ये भटक्या कुत्र्यांचे मोठे टोळके फिरताना दिसतात. काही दिवसांपूर्वीच एका महिलेवर कुत्र्यांच्या टोळीने हल्ला करून तिला जखमी केले होते. ही घटना ताजी असतानाच लहान मुलावर झालेल्या हल्ल्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड भीती निर्माण झाली आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शहरातील प्रत्येक नाका, चौक आणि गल्लीमध्ये कुत्र्यांचे टोळके दिसून येतात. विशेषतः संध्याकाळच्या वेळी घराबाहेर पडणे धोकादायक झाले आहे. काही वेळा हे कुत्रे लोकांच्या हातातील अन्नपदार्थ किंवा वस्तू हिसकावून नेण्याचे प्रकारही घडत आहेत. यामुळे विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे. भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक असलेली निर्बीजीकरण (स्टेरिलायझेशन) मोहीम अनेक वर्षांपासून प्रभावीपणे राबवली जात नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. नगरपरिषदेने यासाठी निविदा काढली होती, मात्र कोणत्याही संस्थेकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे ही प्रक्रिया रखडल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा काही नागरिकांनी दिला आहे. तोपर्यंत पालकांनी लहान मुलांवर विशेष लक्ष ठेवावे, असे आवाहनही करण्यात येत आहे.

> **मोकाट कुत्रे पकडण्यासाठी तसेच त्यांच्या निर्बीजीकरण आणि रेबीज लसीकरणासाठी लवकरच नवीन निविदा काढण्यात येणार आहेत. प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत ही मोहीम लवकरात लवकर राबवली जाईल.**
> **- अनंत गुरव, उपनगराध्यक्ष, श्रीवर्धन**

## निवडक



### आगरी समाज संस्थेतर्फे महिला दिन

**अलिबाग :** आगरी समाज संस्था, अलिबाग यांच्यावतीने जागतिक महिला दिन अथर्व फिटनेस सेंटर, आनंद नगर, अलिबाग येथे साजरा करण्यात आला. समाजातील महिलांना एकत्र आणून त्यांना प्रोत्साहन देणे, सन्मान करणे आणि त्यांच्या कार्याची दखल घेणे हा या कार्यक्रमामागील मुख्य उद्देश होता. कार्यक्रमात मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या खेळांमध्ये महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. निलेश पाटील यांनी प्रायोजित केलेली बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व महिलांना सुनील तांबडकर यांच्यातर्फे आकर्षक आणि गृहोपयोगी चॉपर भेटवस्तू म्हणून देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनामध्ये दिपश्री पाटील, ज्योती मिठागरी, प्रमिला शेळके, तृप्ती म्हात्रे, दिप्ती पाटील, सुप्रिया ठाकूर, रेश्मा म्हात्रे, दर्शना पाटील, सई पाटील यांनी परिश्रम घेतले.

### हरेश तांडेल यांचे निधन



**उरण :** उरण येथील सामाजिक कार्यकर्ते हरेश धाकल्या तांडेल यांचे शनिवार, दि. ७ मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. मृत्यूसमयी ते ६५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, मुलगा, जावई, नातू, भाऊ असा मोठा परिवार आहे. हरेश धाकल्या तांडेल यांचा दशक्रिया विधी सोमवार, दि. १६ मार्च रोजी सकाळी ७.३० वाजता श्रीक्षेत्र माणकेश्वर उरण येथे, तर दिवसकार्य बुधवार, दि. १८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता बालई येथील राहत्या घरी होणार आहे.

### अल-अनॉन ग्रुपची होणार स्थापना

**उरण :** दारूच्या व्यसनामुळे अनेक कुटुंबांचे जीवन प्रभावित होते. अशा परिस्थितीत कुटुंबातील सदस्यांना मानसिक आधार, समज आणि मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने अल-अनॉन साधना ग्रुप, उरण या नवीन गटाची स्थापना उरणमध्ये करण्यात येणार आहे.या गटाचा उद्घाटन सोहळा रविवार, दिनांक १५ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता उरण नगरपरिषद कन्या शाळा, ग्राऊंड फ्लोअर, पेंशनर्स पार्क समोर, एनएमएमटी बस स्टॉपजवळ, उरण येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्षा भावना घाणेकर यांच्या हस्ते होणार आहे.अल-अनॉन ही एक जागतिक स्वयंसेवी संघटना आहे जी दारूच्या व्यसनामुळे प्रभावित झालेल्या कुटुंबीय आणि मित्रांना आधार देण्यासाठी कार्य करते. येथे सदस्य एकमेकांशी आपले अनुभव, ताकद आणि आशा शेअर करून मानसिक शांतता आणि सकारात्मक जीवनाचा मार्ग शोधण्यास मदत करतात. या बैठका पूर्णपणे गोपनीय, विनामूल्य आणि सर्वांसाठी खुल्या असतात.उद्घाटन कार्यक्रमानंतर अल-अनॉन साधना ग्रुपच्या नियमित सभा प्रत्येक रविवारी सायंकाळी ७ ते ८.३० या वेळेत उरण नगर परिषद कन्या शाळा, पेन्शनर्स पार्कसमोर, उरण शहर येथे आयोजित करण्यात येतील. दारूच्या व्यसनामुळे प्रभावित झालेल्या सर्व कुटुंबीय व मित्रांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अल-अनॉन साधना ग्रुप, उरणच्या वतीने करण्यात आले आहे




### माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**महाड :** औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) महाड येथील इलेक्ट्रिशियन बॅच क्र. ६५ (२००७-०९) मधील माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. अनेक वर्षांनंतर एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून तत्कालीन आयटीआयमधील प्रशिक्षक मंगेश भुतकर उपस्थित होते.

हे स्नेहसंमेलन ८ मार्च रोजी महाड येथील अंबा फार्म रिसॉर्ट येथे आयोजित करण्यात आले होते. २००७ बॅचचे स्नेहसंमेलन 'पुन्हा एकदा जुन्या आठवणींना उजाळा' या संकल्पनेवर आधारित होते. या कार्यक्रमात त्या बॅचमधील अनेक विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. दीर्घ काळानंतर मित्रांची भेट झाल्यामुळे कार्यक्रमाला भावनिक आणि आनंददायी स्वरूप प्राप्त झाले.

यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांनी आयटीआयमधील शिक्षणकाळातील अनुभव, आठवणी आणि मजेशीर किस्से एकमेकांशी शेअर केले. काहींनी आपल्या आयुष्यातील प्रवास आणि आजच्या घडीला विविध क्षेत्रांमध्ये मिळवलेल्या यशाची माहितीदेखील दिली. या भेटीत जुन्या मैत्रीचे बंध पुन्हा घट्ट झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भूषण गोरेगावकर, देवेंद्र चोरगे, चैतन्य मोरे, अमित देशमुख, प्रसाद पाटील यांच्यासह आदींनी मोठ्या प्रमाणात मेहनत घेतली. शेवटी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद पाटील यांनी केले.




### सरपंच, महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान

**रसायनी :** रायगड जिल्ह्यात स्वच्छ भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी होत असून, या अभियानामुळे अनेक ग्रामपंचायतींना संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात मानांकन प्राप्त झाले आहे. महिला दिनाचे औचित्य साधत जिल्हा परिषदेत विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने खालापूर तालुक्यात स्वच्छतेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दोन महिला सरपंच तसेच दोन महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. 'कॉफी विथ विनर' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन ११ मार्च रोजी जिल्हा परिषदेत करण्यात आले होते. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे उपस्थित होत्या. त्यांनी स्वच्छता अभियानातील महिलांच्या योगदानाचे कौतुक करत स्वच्छतेच्या चळवळीत महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. यावेळी खालापूर तालुक्यातील वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीच्या सरपंच उमा संदीप मुंढे आणि माजगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच दिपाली पाटील यांना उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. तसेच वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीतील सफाई कर्मचारी तारा चिंतामण खारकर आणि सुनीता अनंत घाटे या दोन महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचाही विशेष गौरव करण्यात आला.

## निवडक



### गायकवाड कुटुंबाला पत्रकारांकडून मदत

**रसायनी :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पत्रकार कै. बिपिनराव गायकवाड यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या कुटुंबाला संघटनेच्यावतीने आर्थिकमदत करण्यात आली. संघाचेराज्यसरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी गायकवाड यांच्या निवासस्थानी भेट देत कुटुंबीयांचे सांत्वन केले आणि मदतीचा धनादेश तसेच एक महिन्याचे घरगुती किराणा साहित्य त्यांच्या पत्नी कविता गायकवाड यांच्याकडे सुपूर्द केले.पत्रकार बिपिनराव गायकवाड यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनामुळे पत्रकार क्षेत्रात शोककळा पसरली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे आणि प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमाणी यांच्या सूचनेनुसार ही मदत करण्यात आली.यावेळी 'दैनिक समर्थ गांवकरी'च्या वतीनेही गायकवाड कुटुंबाला सहकार्य करण्यात आले. डॉ. विश्वासराव आरोटे यांनी यावेळी बोलताना कै. बिपिनराव गायकवाड हे मनमिळावू, शांत स्वभावाचे आणि अभ्यासू पत्रकार होते. अल्पावधीतच त्यांनी आपल्या कार्यातून वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या अचानक जाण्यामुळे पत्रकार क्षेत्राची मोठी हानी झाली असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.याप्रसंगी पत्रकार संजय फुलसुंदर, रायगड जिल्हाध्यक्ष राकेश खराडे, कोपरगाव तालुका अध्यक्ष जनार्दन जगताप, सचिव विजय कापसे, ज्येष्ठ मार्गदर्शक फकीरराव टेके, किसनराव पवार आदी उपस्थित होते. तसेच गायकवाड कुटुंबातील कविता गायकवाड, महेश गायकवाड, कल्याणी गायकवाड, जागृती गायकवाड आणि प्रकाश बन्सी गायकवाड हेही उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी कै. बिपिनराव गायकवाड यांना श्रद्धांजली अर्पण करत कुटुंबियांना धीर दिला.




### विद्यार्थ्यांना स्थानिक कार्यालयांची ओळख

**पाली :** विद्यार्थ्यांना स्थानिक परिसरातील शासकीय कार्यालये व संस्थांची माहिती मिळावी या उद्देशाने दर्यागाव शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी परिसर भेट उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी पाच्छापूर गावातील विविध शासकीय कार्यालयांना भेट देत त्यांच्या कामकाजाची प्रत्यक्ष माहिती घेतली. मंगळवारी (दि.११) आयोजित या भेटीत विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत पाच्छापूर कार्यालय, पोस्ट कार्यालय, उच्च प्राथमिक (पी. एम. श्री) शाळा तसेच माध्यमिक शाळेला भेट दिली. यावेळी शिक्षक कोकाटे सर आणि बांगारे सर यांनी विद्यार्थ्यांना ग्रामपंचायतीची रचना, कामकाज आणि गावाच्या विकासातील तिची भूमिका याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पाच्छापूर येथील उच्च प्राथमिक पी. एम. श्री शाळेला भेट दिली. येथे श्री. हंबीर आणि चोबे मॅडम यांनी शाळेतील विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांना परसबाग आणि इतर उपक्रम दाखवून दिले. यामुळे विद्यार्थ्यांना शाळेतील उपक्रमांची प्रत्यक्ष ओळख झाली. पोस्ट ऑफिस उपकेंद्र पाच्छापूर येथेही विद्यार्थ्यांनी भेट दिली. यावेळी पोस्टमास्तर नेहा मॅडम यांनी पोस्ट कार्यालयातील कामकाजाची माहिती दिली. तसेच मुला-मुलींसाठी असलेल्या विविध बचत योजना, पोस्टकार्ड, अंतरदेशीय पत्र याबाबत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवून माहिती दिली.

### माथेरानमध्ये सिलिंडरचे नियोजन करा

**नेरळ :** माथेरान हे केवळ पर्यटनावर आधारित असलेले शहर आहे. त्यामुळे येथील पर्यटन व्यवसाय येथील जनतेचे उदरनिर्वाहाचे साधन आहे. हे लक्षात घेऊन शासनाने गॅस सिलिंडरचा तुटवडा होणार नाही याची काळजी घेण्याची मागणी माथेरानमधील हॉटेल व्यावसायिक आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने केली आहे. माथेरान हे जागतिक दर्जाच पर्यटन स्थळ असून, माथेरानचे आर्थिक व्यवहार हे १०० टक्के पर्यटनावर अवलंबून असल्या कारणाने माथेरानचे पर्यटन हेच सर्वसामान्य माथेरानकरांचे उपजीविकेचे



साधन असून, माथेरान मधील छोटे-मोठे हॉटेल व्यावसायिक तसेच घरघुती लॉजधारक आणि येणाऱ्या पर्यटकांना सुविधा देणारे रेस्टॉरंटधारक आणि विविध पॉईंट तसेच इतर ठिकाणी असलेले छोटे स्टॉलधारक यांचा १०० टक्के व्यवसाय हा पर्यटनावर अवलंबून आहे. परंतु, कालपासून माथेरानमध्ये कमर्शियल गॅस पुरवठा हा गॅस पुरवठादारांकडून पूर्णपणे बंद करण्यात आला असून, घरघुती गॅसचा पुरवठादेखील कमी करण्यात आला आहे. दरम्यान, गॅस पुरवठा बंद करण्यात आला तर त्याचा विपरीत परिणाम इथल्या पर्यटनावर होणार असून, छोटी मोठी हॉटेल्स, रेस्टॉरंट, धाबे, स्टॉल बंद करायला लागतील, त्यामुळे सर्वसामान्य माथेरानच्या नागरिकांना नाहक आर्थिक भुर्दंड भोगावा लागून सर्व व्यवसाय ठप्प होऊन जातील. तरी माथेरानसाठी विशेष बाब म्हणून कमर्शिअल तसेच घरघुती गॅस सिलिंडरचा नियमित पुरवठा होणेकामी गॅसपुरवठा धारकाला नियमित गॅस पुरवठा करण्याबाबत आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबाग-कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- ओम साई टेक्निशियन इलेक्ट्रिक, वेल्डर, फ्रिज व एसी टेक्निशियन पाहिजे. संपर्क : ७०६६१३८३६८
- घरकामासाठी बाई पाहिजे. ७३७८४८०१५१
- बागायती वाडी विक्री १३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२३ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग मो. ८७७९८०५३५३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# पोलीस भरतीदरम्यान उत्तेजक इंजेक्शन जप्त

## चार उमेदवारांविरोधात गुन्हा दाखल

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबईतील पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान चार उमेदवारांकडे उत्तेजक द्रव्याचे इंजेक्शन जप्त करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी चारही उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून, कळंबोली पोलीस ठाण्यात त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही घटना कळंबोली येथील पोलीस मुख्यालयात उघडकीस आली.

पोलीस बनण्याचे स्वप्न घेऊन भरती प्रक्रियेत सहभागी झालेल्या उमेदवारांनीच कायद्याचा भंग केल्याने अखेर त्यांनाच पोलीस ठाण्याच्या कारवाईला सामोरे जावे लागले. मुंबईसह राज्यभरात पोलीस शिपाई आणि चालक पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. उमेदवारांना उन्हाळ्याचा



त्रास होऊ नये यासाठी नवी मुंबई पोलिसांनी पहाटेपासूनच भरती प्रक्रियेची सुरुवात करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे उमेदवारांना उन्हाच्या झळा कमी सहन कराव्या लागल्या. तसेच नवी मुंबई पोलिसांनी केलेल्या उत्तम नियोजनामुळे उमेदवारांना शारीरिक चाचणीदरम्यान चांगले मैदान आणि इतर आवश्यक सुविधा कळंबोली (रोडपाली) येथील पोलीस मुख्यालयात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.२०२४-२०२५ या वर्षासाठी पोलीस शिपाई, चालक पोलीस शिपाई आणि बँड्समन अशा एकूण ५२७ विविध पदांचा समावेश या भरती प्रक्रियेत आहे. या भरतीसाठी सुमारे ५४ हजार उमेदवारांनी अर्ज नोंदवले आहेत.

दररोज सुमारे दीड ते दोन हजार उमेदवार शारीरिक चाचणी देणार असल्याचे नियोजन नवी मुंबई पोलिसांनी केले आहे. १७ मार्चपर्यंत शारीरिक चाचणी पूर्ण करण्याची आखणी पोलिसांकडून करण्यात आली आहे. दरम्यान, पोलीस शिपायांच्या सतर्कतेमुळे चार संशयित उमेदवारांकडे उत्तेजक द्रव्याचे इंजेक्शन आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. विशेष म्हणजे भरती प्रक्रियेदरम्यान अशा प्रकारची घटना प्रथमच उघडकीस आली आहे. या घटनेनंतर इतर उमेदवारांचीही तपासणी अधिक काटेकोरपणे करण्यात आली.

> **शॉर्टकटचा मोह टाळावा**
>
> शारीरिक चाचणीदरम्यान शरीरावर परिणाम करणारे उत्तेजक द्रव्याचे इंजेक्शन उमेदवारांनी घेऊ नये. कारण अशा इंजेक्शनचा दूरगामी परिणाम संबंधित उमेदवाराच्या मनावर आणि शरीरावर होऊ शकतो. जे उमेदवार करिअरच्या सुरुवातीलाच शॉर्टकट वापरण्याचा प्रयत्न करतील, ते पोलीस खात्यात दाखल झाले तरी टिकणार नाहीत. उज्वल भविष्य घडवण्यासाठी असे शॉर्टकट कोणीही वापरू नयेत. असे यश कायम टिकत नाही.
>
> – संजय ऐनपुरे, पोलीस सहआयुक्त, नवी मुंबई

इंजेक्शन जप्त केलेल्या उमेदवारांचे वय अनुक्रमे २१, २६, २९ आणि ३० वर्षे असे आहे. त्यापैकी तीन उमेदवार आहिल्यानगर जिल्ह्यातील तर एक उमेदवार पुणे जिल्ह्यातील असल्याची माहिती समोर आली आहे. या उमेदवारांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे उत्तेजक द्रव्याचे इंजेक्शन आणि इंजेक्शन देण्यासाठी वापरली जाणारी सुई आढळून आली. पोलीस मुख्यालयातच त्यांना रंगेहाथ पकडण्यात आल्याने त्यांना तात्काळ कळंबोली पोलीस ठाण्यात नेण्यात आले. कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी या चारही उमेदवारांवर गुन्हा नोंदविण्याच्या सूचना दिल्या.

## कर्जतमध्ये महाराजस्व अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

### ६०० हून अधिक अर्ज

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

राज्यात राबविण्यात येत असलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत कर्जत तालुक्यातील चिंचवली महसूल मंडळ क्षेत्रात आयोजित शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात ६०० हून अधिक अर्ज प्राप्त झाले असून, विविध दाखल्यांचे वाटप केले.

डिकसल येथील प्रतीक्षा लॉन्स येथे आयोजित या शिबिराचे उद्घाटन प्रांतअधिकारीप्रकाशसंकपाळयांच्या हस्ते झाले. यावेळी तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, जिल्हा परिषद सदस्या सुवर्णा ठाकरे, पंचायत समिती सदस्या नमिता श्रीखंडे, माजी सभापती प्रदीप




ठाकरे, मनसेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील तसेच नायब तहसीलदार सचिन राऊत, गोविंद कोटुंबे, भूमी अभिलेखचे उपअधीक्षक नितीन आटोळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.


या शिबिरात नागरिकांना जातीचे, उत्पन्नाचे व रहिवासी दाखले, सातबारा व ८अ उतारे, वारस नोंदी, आधार कार्ड दुरुस्ती, मतदार ओळखपत्र दुरुस्ती, संजय गांधी निराधार योजना, लक्ष्मी मुक्ती योजना तसेच रेशन कार्ड आदी सेवांचा लाभ देण्यात आला. शिबिरात रेशन कार्ड १७९, संजय गांधी योजनेचे २८ लाभ, डोमिसाईल, उत्पन्न व जात दाखले १८१, सातबारा व ८अ उतारे २९८, आयुष्यमान कार्ड १२ तसेच आधार कार्ड १० नागरिकांना देण्यात आले.

यावेळी प्रांताधिकारी प्रकाश संकपाळ यांनी सांगितले की, महसूल विभागाच्या विविध सेवा ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत पोहोचाव्यात आणि त्यांच्या दैनंदिन समस्या तात्काळ सोडवाव्यात यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. महसूल विभागासोबत कृषी, आरोग्य, भूमी अभिलेख आणि आदिवासी विभागही या शिबिरात सहभागी झाले होते.

## ॲड. जास्वंदी ठाकूर एलएलएम परीक्षा उत्तीर्ण

**। हमरापूर । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील काळेश्री गावच्या ॲड. जास्वंदी शशांक ठाकूर यांनी एल.एल.एम. परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवले आहे. नुकताच त्या कायद्याचे क्षेत्रातील उच्च मास्टर ऑफ लॉ ही परीक्षा मुंबई विद्यापीठातून विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झाल्या आहेत.



वढाव येथील डॉ. हनुमान म्हात्रे व प्रभावती म्हात्रे यांच्या त्या कन्या व नुकताच भारत सरकारने गौरविलेले शेतीनिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रियांक म्हात्रे यांच्या भगिनी आहेत.

लहानपणापासून हुशार असणाऱ्या ॲड. जास्वंदी ठाकूर यांनी एल.एल.एम. म्हणजेच मास्टर ऑफ लॉ ही विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण होऊन बहुमान पटकावल्याबद्दल त्यांचे वढाव गावासह वाशी पंचक्रोशीत तसेच तालुक्यातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## धुक्याच्या दाट चादरीने उरण ठप्प!

- **रस्ते अंधारले**
- **बंदरातील कामकाजावरही लागला ब्रेक**

**। उरण । प्रतिनिधी ।**

गुरुवार पहाटेपासून उरण परिसरावर दाट धुक्याची चादर पसरल्याने संपूर्ण परिसर काही काळ अक्षरशः ठप्प झाला. इतके दाट धुके होते की काही ठिकाणी समोरचे वाहनही दिसत नसल्याने वाहनचालकांची अक्षरशः धावपळ उडाली. रस्त्यांवरील दृश्यता अत्यंत कमी झाल्याने वाहन चालविणे धोकादायक ठरले.

उरणमधील मुख्य रस्त्यांवर वाहनांची गती मंदावली होती. काही ठिकाणी चालकांना वाहनांचे हेडलाईट लावून सावधगिरीने प्रवास करावा लागला. धुक्यामुळे बंदर परिसरातील हालचालींनाही मोठा फटका बसला. वाहनचालकांनी दिलेल्या माहितीनुसार, दाट धुक्यामुळे उरण परिसरातील बंदराचे कामकाज काही काळासाठी ठप्प झाले होते. दृश्यता कमी झाल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव काही हालचाली थांबविण्यात आल्या. मात्र, कालांतराने धुक्याची तीव्रता कमी होत गेल्यानंतर परिस्थिती हळूहळू सुरळीत होऊ लागली. त्यानंतर रस्त्यांवरील वाहतूक तसेच बंदरातील कामकाज पुन्हा पूर्ववत सुरू झाले. तथापि अचानक पसरलेल्या या धुक्यामुळे उरणकरांना काही काळ अडचणींचा सामना करावा लागला.

## हॉटेलमध्ये महिलेशी गैरवर्तन

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर येथील हॉटेल गोल्डन पॅलेस येथे काम करणाऱ्या महिलेबरोबर गैरवर्तन केल्याची घटना घडली. तीन आरोपी हॉटेलमध्ये येऊन खोलीची मागणी करत होते. खोली उपलब्ध नसल्याचे सांगितल्यावर आरोपींनी अश्लील टिप्पणी करत महिलेबरोबर अयोग्य वर्तन केले. यावेळी उपस्थित साक्षीदारांनाही धक्काबुक्की करत दमदाटी करण्यात आली. या प्रकारामुळे परिसरात संताप व्यक्त करण्यात येत आहे. याप्रकरणी पोलादपूर पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास सुरू आहे.

## ॲनिमिया आजाराबाबत पथनाट्यातून जनजागृती

**। खांब । प्रतिनिधी ।**

सध्या सर्वत्र हळूहळू पसरत चाललेल्या ॲनिमिया आजाराबाबत पथनाट्यातून जनजागृतीचा कार्यक्रम रोहा तालुक्यातील श्रमिक विद्यालय चिल्हे येथे संपन्न करण्यात आला.

धाटाव औद्योगिक वसाहतीतील दिपक नायट्रेट कं.व दिपक फाऊंडेशन रोहा यांच्यावतीने सदरील प्रबोधनात्मक पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्याध्यापक दिपक जगताप व दिपक फाऊंडेशनचे पदाधिकारी अजय आवाडे, डॉ. प्रियांका धनावडे, अश्विनी म्हसकर, उत्कर्षा सार्ले कर, मारूती निगडे, अंकिता ठाकूर व पथनाट्य सादर करणारे



> ॲनिमियाचा आजार कमी करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून, या कामी दिपक फाऊंडेशन फिरत्या दवाखान्याच्या माध्यमातून जनजागृतीचे काम अतिशय चांगले पद्धतीने चालले आहे.
>
> – रणजीत घरत, पथनाट्य कलाकार

कलाकार देवेश्री नागवेकर, पूनम म्हात्रे, प्रकाश सप्रे, रणजित घरत, संजोग पाटील, संचित पानसरे, अंनिस पानसरे, हिमालया चोरघे आदी उपस्थित होते.

या पथनाट्यातून ॲनिमिया का होतो? कसा होतो? त्यावरील उपाय व घ्यावयाची काळजी याबाबत पथनाट्यातून जनजागृती केली. दरम्यान, या पथनाट्याचा विद्यार्थ्यांनी आनंद लुटला.

## मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर बैठक

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या वतीने मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत जिल्हा परिषद रायगडचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या दालनात बुधवार, ११ मार्च रोजी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. ८ डिसेंबर २०२५ रोजी सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने ही बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रशासकीय व सेवा विषयक मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.

या बैठकीत अनुकंपा भरती, अधिसंख्य पदे, निलंबन प्रकरणे, मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या, अश्वासित प्रगती योजना, 'अ' प्रमाणपत्र देणे तसेच एकदर्थ मंडळाच्या हिंदी/मराठी भाषा सूट यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. याशिवाय दर महिन्याच्या एक तारखेला वेतन देण्याबाबत, ३ डिसेंबर १९८० च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी, प्रलंबित वैद्यकीय बिले आणि पेंशन प्रकरणे यांवरही सविस्तर विचारविनिमय करण्यात आला.

बैठकीदरम्यान प्रलंबित असलेले विविध प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी दिले. कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रशासन सकारात्मक भूमिका घेईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

या बैठकीस कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे रायगड जिल्हाध्यक्ष संजीव मोरे, कास्ट्राईब जि.प. अध्यक्ष के. सी. बागुल, सरचिटणीस संतोष साळावकर, उपाध्यक्ष अंजली वर्तक, कोषाध्यक्ष विकास बडे, उपाध्यक्ष प्रसाद पवार, कार्यकारी सदस्य संजय चोपडे, संजय पवार, अमोल डुकरे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. तसेच कार्यालयीन कर्मचारी टी. एन. नरूटे, मनीषा चायनाखवा, विजया वसंत, देवेंद्र झेंडेकर, संतोष झावरे, सुजाता कांबळे, विलास पाटील, राजेंद्र भिसे, ज्योती थळकर, आकाश टापरे आदी कर्मचारीही बैठकीला उपस्थित होते. बैठकीच्या शेवटी के.सी. बागुल यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## माळरानात दारू पिण्यावरून वाद

**खालापूर :** खालापूर तालुक्यातील धारणी गावाजवळील माळरानावर दारू पिण्यावरून झालेल्या वादातून एका तरुणाला मारहाण करण्यात आली. जखमी व्यक्ती आपल्या मित्रासोबत दारू पिण्यासाठी गेली असताना दोघांमध्ये वाद झाला. वाद वाढल्यानंतर आरोपीने हाताबुक्क्यांनी तसेच दगडाने पाठीवर, कंबरेवर व चेहऱ्यावर वार करत मारहाण केली. यात संबंधित व्यक्ती जखमी झाली असून, त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास पोलीस उपनिरीक्षक केतन सांगळे करीत आहेत.



## 'महिलांनी तंत्रज्ञान आत्मसात करावे'

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

महिलांनी आधुनिक तंत्रज्ञान शिकून त्याचा योग्य उपयोग केल्यास त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतात, असे प्रतिपादन रोहा-अष्टमी नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी केले. पंचक्रोशी जंगम समाज रोहा महिला मंडळाच्या वतीने रोहा येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित 'सन्मान नारी शक्तीचा' कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

यावेळी गटविकास अधिकारी शुभदा पाटील, डॉ. अपूर्वा क्षिरसागर तसेच पंचक्रोशी जंगम समाजाचे अध्यक्ष लक्ष्मण जंगम आणि महिला मंडळाच्या अध्यक्षा प्रिया जंगम यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी वक्त्यांनी महिलांनी शिक्षण घेऊन स्वावलंबी बनावे, आरोग्याची काळजी घ्यावी आणि समाजाच्या प्रगतीत सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाला पंचक्रोशी जंगम समाजातील महिला व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**उरणमध्ये आढावा बैठक** आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेसे तहसीलदारांचे मार्गदर्शन

# नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करणे ही जबाबदारी

**। उरण । प्रतिनिधी ।**

पावसाळ्यात नागरिकांच्या समस्या सोडवणे आणि संभाव्य नुकसान टाळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने सज्ज राहणे आवश्यक आहे. या केंद्रात नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे तसेच पुढील बैठकीसाठी प्रत्येक विभागातील सक्षम अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून नागरिकांच्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे निर्देश उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी दिले.



उरण पंचायत समिती कार्यालयाच्या सभागृहात गुरुवारी (दि.१२) नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत ते बोलत होते.

बैठकीस उरण नगर परिषदेच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर, पंचायत समितीचे उपसभापती परेश ठाकूर, गटविकास अधिकारी सजैराव पाटील, नायब तहसीलदार महेश पाटील, महावितरणचे उपअभियंता विकास गायकवाड, सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, दीपक मढवी, सरपंच बळीराम ठाकूर, प्रेमनाथ ठाकूर, ग्रामविकास अधिकारी अनिरुद्ध पाटील तसेच विविध ग्रामपंचायतींचे सरपंच व पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान तालुक्यासाठी धोकादायक ठरू पाहणाऱ्या डेब्रिजच्या भरावाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. गटविकास अधिकारी सजैराव पाटील आणि सामाजिक कार्यकर्ते दीपक मढवी यांनी हा मुद्दा मांडत नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने संबंधित भरावावर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली.

दरम्यान, या महत्त्वाच्या बैठकीस अनेक विभागांचे वरिष्ठ अधिकारी अनुपस्थित राहिल्याचेही निदर्शनास आले. नॅशनल हायवे प्राधिकरण, वन विभाग, सिडको, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस विभाग, खारलँड विभाग तसेच इतर संबंधित खात्यांचे अधिकारी उपस्थित नसल्याने महावितरणशी संबंधित मुद्दे वगळता इतर अनेक प्रश्नांवर चर्चा होऊ शकली नाही.

एकूणच, या बैठकीत नागरिकांच्या विविध समस्या मांडण्यात आल्या. त्यामुळे पुढील नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाच्या बैठकीस सर्व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना कराव्यात, असे निर्देश तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी दिले.

# निवडक




## हेदुटणे येथील दगडखाणी बंद करा

**आदिवासी बांधवांची तहसीलदारांकडे मागणी**

**नवीन पनवेल** : पनवेल तालुक्यातील हेदुटणे परिसरातील दगडखाणी बंद करण्याच्या मागणीसाठी आदिवासी नागरिकांनी ११ मार्चपासून पनवेल तहसील कार्यालय, साईनगर येथे साखळी उपोषण सुरू केले आहे. दगडखाणीतील स्फोटक ब्लास्टिंगमुळे गावकऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.हेदुटणे परिसरात सुरू असलेल्या दगडखाणीच्या कामामुळे गावातील घरांच्या भिंतींना तडे गेले असून काही घरे पडण्याच्या अवस्थेत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. खाणीतील स्फोटांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ व प्रदूषण निर्माण होत असून, त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. तसेच पिण्याचे पाणी दूषित झाल्याची आणि शेती पिकांचे नुकसान होत असल्याची तक्रारही ग्रामस्थांनी केली आहे. खाणीजवळच प्राथमिक शाळा असल्याने लहान मुलांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. याशिवाय दगडखाणीतून ये-जा करणारे ट्रक, डंपर आणि इतर अवजड वाहने गावातून जात असल्याने अपघाताचा धोका वाढला असल्याचेही नागरिकांनी नमूद केले. यासंदर्भात महसूल प्रशासन, पोलीस विभाग तसेच संबंधित कार्यालयांकडे अनेक वेळा लेखी तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने अखेर आदिवासी बांधवांनी साखळी उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. दगडखाणी तात्काळ बंद कराव्यात, गावकऱ्यांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी पोलीस सुरक्षा द्यावी तसेच खाण मालक आणि संबंधितांवर ॲट्रॉसिटी, पर्यावरण व महसूल कायद्यांनुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

## खोट्या जात प्रमाणपत्राचा आरोप

**जेएनपीएतील अधिकाऱ्यांच्या चौकशीची मागणी**

**उरण** : जेएनपीएतील जी.एम.ए. पदावर कार्यरत असलेल्या मनिषा उमाकांत जाधव यांनी खोट्या जात प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी मिळवल्याचा आरोप करत त्यांच्या निलंबनासह जात प्रमाणपत्राची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागणीसाठी ॲड. सिद्धार्थ इंगळे यांनी लाक्षणिक उपोषणाचा इशारा दिला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मनिषा जाधव यांनी १९९४ साली जेएनपीएमध्ये अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गासाठी राखीव असलेल्या महिला कल्याण अधिकारी पदावर नियुक्ती मिळवली. मात्र त्यांच्या कुटुंबीयांची जात अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातील 'हिंदू भील' असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यासंदर्भातील विविध कागदपत्रे जोडून ॲड. इंगळे यांनी जेएनपीए प्रशासनाकडे तक्रार दाखल केल्याचे सांगितले जाते.याप्रकरणी जेएनपीए प्रशासनाने आवश्यक चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र अद्याप कोणतीही कारवाई न झाल्याने उपोषणाचा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतल्याचे ॲड. सिद्धार्थ इंगळे यांनी सांगितले. दरम्यान, या संदर्भात मनिषा जाधव यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नसल्याची माहिती मिळाली आहे.

## कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वयोमान ६० वर्षे करा

**स्थायी समितीसमोर मांडला प्रस्ताव**

**नवी मुंबई** : नवी मुंबई महापालिकेतील कर्मचारी व अधिकाऱ्यांचे निवृत्ती वय ५८ वर्षांवरून ६० वर्षे करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर मांडण्यात आला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत तयार करण्यात आलेल्या 'नवी मुंबई महानगरपालिका सेवा विनिमय २०२६'ला आज झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत काही सुधारणा व सूचनांसह मंजुरी देण्यात आली. सभागृह नेते तथा स्थायी समिती सदस्य सागर नाईक यांनी यासंदर्भातील ठराव मांडला. स्थायी समितीचे सभापती अशोक पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा प्रस्ताव चर्चिला गेला. समिती सदस्यांच्या सूचनांसह हा ठराव अंतिम मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेपुढे मांडला जाणार आहे.

नवीन सेवा विनिमयानुसार प्रशासनातील शिस्त, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कार्यक्षमता यांवर भर देण्यात आला आहे. तसेच सुरक्षा ठेव, आर्थिक उत्तरदायित्व, रजा नियम, शिस्त व विभागीय चौकशी प्रक्रिया, प्रवास भत्ता, भविष्य निर्वाह निधी व्यवस्था, आचारसंहिता आणि प्रशासनिक निरीक्षण प्रणाली यांसारख्या बाबींचा या विनिमयात समावेश करण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांत महापालिकेतील अनेक अनुभवी अधिकारी व कर्मचारी निवृत्त झाल्याने त्यांच्या अनुभवाचा शहराच्या विकासासाठी पुरेसा उपयोग होत नसल्याचे सागर नाईक यांनी सांगितले. ही पोकळी भरून काढण्यासाठी आणि प्रशासनाचा अनुभव टिकवून ठेवण्यासाठी निवृत्ती वय ६० वर्षे करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, ठोक मानधन पद्धतीने कार्यरत कर्मचाऱ्यांच्या हितासाठीही स्वतंत्र प्रस्ताव लवकरच मांडण्यात येईल, अशी माहिती नाईक यांनी दिली. तसेच भविष्यातील नोकरभरतीत नवी मुंबईतील स्थानिक रहिवाशांना प्राधान्य देण्याचे धोरण राहील, असेही त्यांनी नमूद केले.बैठकीत अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी सन २०२५-२६ चे सुधारित आणि २०२६-२७ या वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे मूळ अंदाज सादर केले. या अंदाजांच्या आधारे स्थायी समिती अर्थसंकल्प तयार करून तो सर्वसाधारण सभेसमोर मांडणार असल्याची माहिती सभापती अशोक पाटील यांनी दिली.

# सात महिन्यांपासून पगार थकीत

## धाटावमधील 'साधना' कंपनीत कामगारांचा संताप; अर्ध्याहून अधिकांनी दिला राजीनामा

| धाटाव | प्रतिनिधी |

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील 'साधना' कंपनीत कामगारांच्या पगाराचा प्रश्न चिघळला असून, तब्बल सात महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने कामगार हवालदिल झाले आहेत. थकीत पगारामुळे अर्ध्याहून अधिक कामगारांनी नोकरी सोडल्याची माहिती समोर आली असून, उरलेल्या कामगारांमध्येही तीव्र नाराजीचे वातावरण आहे. पगाराचा प्रश्न तात्काळ निकाली काढावा, अन्यथा आंदोलनाचा इशारा कामगारांकडून देण्यात आला आहे.




धाटाव औद्योगिक क्षेत्रातील प्रख्यात 'साधना' कंपनीत गेल्या सात महिन्यांपासून कामगारांचे पगार थकीत असल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. हक्काचा पगार वेळेवर मिळण्याऐवजी किती महिन्यांचा पगार बाकी आहे याची मोजदाद करण्याची वेळ कामगारांवर आली आहे. त्यामुळे अनेक कामगारांच्या कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कंपनीत पूर्वी सुमारे ५० ते ६० कामगार व कर्मचारी कार्यरत होते. मात्र, पगाराच्या सततच्या विलंबामुळे त्यापैकी निम्म्याहून अधिक कामगारांनी राजीनामा दिला आहे. सध्या कंपनीत केवळ २५ ते ३० कामगार उरले असून, उत्पादन प्रक्रियेवर त्याचा परिणाम होत असल्याचे सांगितले जात आहे.

पगार न मिळाल्यामुळे काही कामगारांनी इतर कंपन्यांकडे नोकरी धरली आहे, तर काहींनी छोटा व्यवसाय सुरू करण्याचा मार्ग निवडला आहे. अनेक कामगार रोजगाराच्या शोधात महाड एमआयडीसीसह इतर औद्योगिक क्षेत्रांकडे वळले आहेत. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी कंपनी प्रशासन, मालक आणि कामगार यांच्यात अनेक वेळा बैठका झाल्या. स्थानिक लोकप्रतिनिधींनीही मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यानंतरही कामगारांच्या हातात अद्याप पगार पडलेला नाही. कामगारांचे म्हणणे आहे की कंपनी प्रशासनाकडून वारंवार आश्वासने दिली जात आहेत, मात्र प्रत्यक्षात पगाराचा प्रश्न कायम आहे. त्यामुळे थकीत पगार तात्काळ द्यावा, अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा कामगारांनी दिला आहे.

> “सुमारे दीड वर्षांपूर्वी कंपनीत झालेल्या अपघातामुळे काही काळ कारखाना बंद होता आणि त्यामुळे आर्थिक अडचणी निर्माण झाल्या. मात्र, आता पंधरा दिवसांपूर्वी कारखाना पुन्हा सुरू झाला आहे. त्यामुळे टप्प्या-टप्प्याने कामगारांचे थकीत पगार देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या महिन्यात किमान दोन महिन्यांचे वेतन देण्याचा आमचा प्रयत्न आहे.
> – विद्याधर बेडेकर, वरिष्ठ अधिकारी, साधना कंपनी”

## वाजेकर महाविद्यालयात मुलींसाठी आरोग्य जागृती

| उरण | प्रतिनिधी |

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय फुंडेच्या हेल्थ क्लब व तु.ह. वाजेकर माध्यमिक व उच्च माध्यमिक हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने मुलींच्या विविध आरोग्य समस्यांसंदर्भात जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्र. प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर, प्रा. बी.बी. साळुंखे, थोरात मॅडम, श्री. पाटोळे तसेच प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रणाली नामदेव दांडेकर, एम.डी. (स्त्रीरोग व प्रसूती आयुर्वेद), सहाय्यक प्राध्यापक, प्रसूती तंत्र व स्त्री रोग विभाग, डॉ.जी.डी. पोल फाउंडेशन, आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, खारघर, नवी मुंबई हे उपस्थित होते.



प्रा. डॉ.आमोद ठक्कर यांनी मुलींच्या समस्या महत्त्वाच्या आहेत, त्याकडे दुर्लक्ष करू नये व जनजागृती वाढवणे गरजेचे असल्याचे मत मांडले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. प्रणाली दांडेकर यांनीही पुनरुत्पादक वयातील महिलांमध्ये आढळणारी एक सामान्य हार्मोनल स्थितीबद्दल माहिती दिली. अनियमित मासिक पाळी, चेहऱ्यावर केस येणे, मुरुमे येणे, केस गळणे, वजन वाढणे आणि वंध्यत्व या प्रकारची लक्षणे आढळतात असे नमूद केले. तसेच कॅन्सरसारखे गंभीर आजार आणि त्यांची लक्षणे, कारणे, प्रतिबंध, उपचार याबद्दल सखोल माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संतोष देसाई यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. योगेश कुलकर्णी यांनी केले.

## रायगडमध्ये सरासरी पारा ३५ अंशांवर...




● रायगड जिल्ह्यात तापमान वाढल्याने पारा सरासरी ३५ अंशांवर गेला आहे. अलिबागमध्ये उन्हापासून वाचण्यासाठी महिलांनी छत्री आणि चेहऱ्यावर स्कार्फ बांधून तर काहींनी शीतपेय पिऊन उन्हाची काहीली कमी करण्याचा प्रयत्न केला. (छायाचित्र : समीर मालोदे)

## उरण शहरातील मंगळवारचा पाणीपुरवठा सुरळीत करा

**● शेतकरी कामगार पक्षाची मागणी**

| उरण | प्रतिनिधी |

उरण शहरात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असून, मंगळवारी होणारा पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाचे शहरचिटणीस शेखर पाटील यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नगराध्यक्ष भावना घाणेकर यांना निवेदन दिले.

उरण शहरात दर शुक्रवारी कायमस्वरूपी पाणीपुरवठा बंद असतो. त्यातच गेल्या चार महिन्यांपासून मंगळवारीही पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आठवड्यातून दोन वेळा पाणी न मिळाल्याने नागरिकांच्या दैनंदिन गरजांवर परिणाम होत आहे. यावेळी शहरातील पाणीटंचाईवर तातडीने उपाययोजना कराव्यात, मंगळवारचा पाणीपुरवठा पूर्ववत सुरू करावा, तसेच शहरातील आणि आनंदनगर परिसरातील बंद असलेले स्ट्रीटलाईट सुरू करावेत, अशी मागणीही करण्यात आली. शहरात भटक्या कुत्र्यांचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन त्यावरही उपाययोजना कराव्यात, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, नगराध्यक्ष घाणेकर यांनी पाणीटंचाईच्या प्रश्नावर सकारात्मक पावले उचलली जातील तसेच स्ट्रीटलाईट बसवण्याची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

## आधी भूमीपुत्रांच्या मागण्यांवर चर्चा करा

**● पोलीस उपायुक्त अमित काळेंचे आदेश; हिंद टर्मिनल्समध्ये भरतीला स्थगिती**

| चिरनेर | प्रतिनिधी |

चिरनेर येथील हिंद टर्मिनल्स सीएफएस कंपनीमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना डावलून परप्रांतीय कामगारांची भरती केल्याचा आरोप करत ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिकांच्या मागण्यांवर कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा होईपर्यंत कोणतीही नवीन नोकरभरती न करण्याचे निर्देश नवी मुंबईचे पोलीस उपायुक्त अमित काळे यांनी कंपनी व्यवस्थापनाला दिले आहेत. त्यामुळे प्रस्तावित मोर्चा २५ मार्चपर्यंत स्थगित करण्यात आल्याची माहिती चिरनेर ग्रामपंचायतीचे सरपंच भास्कर मोकल यांनी दिली.

दरम्यान, ग्रामस्थांनी मोर्चा काढू नये यासाठी हिंद टर्मिनल्स कंपनी व्यवस्थापनाने मोर्चापूर्वीच सर्वपक्षीय नेत्यांविरोधात कारवाईची मागणी करत उरण न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, न्यायालयाने कंपनीची मागणी फेटाळून लावत ग्रामस्थांना मोर्चा काढण्याची परवानगी दिली होती. परिस्थिती तणावपूर्ण होऊ नये यासाठी पोलिस उपायुक्त अमित काळे आणि न्हावा-शेवा बंदर विभागाचे सहाय्यक पोलिस आयुक्त किशोर गायके यांनी मध्यस्थी करत ग्रामस्थांना शांत केले. तसेच ग्रामस्थांचे शिष्टमंडळ आणि हिंद टर्मिनल्स कंपनी व्यवस्थापन यांच्यात तातडीने बैठक घेण्याचे आश्वासन देण्यात आले. यानुसार मंगळवारी (दि. १०) एसीपी किशोर गायके यांच्या कार्यालयात बैठक पार पडली. या बैठकीस कंपनी व्यवस्थापनाकडून कॅप्टन अफान कापडे व विवेक वाघोडे उपस्थित होते. तर ग्रामस्थांच्या शिष्टमंडळात सरपंच भास्कर मोकल, राजेंद्र खारपाटील, शिवसेना उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, उपसरपंच अरुण पाटील आणि अलंकार परदेशी आदींचा समावेश होता. चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील शेतकऱ्यांच्या जमिनीवर उभारलेल्या हिंद टर्मिनल्स सीएफएस कंपनीने सुमारे २०० परप्रांतीय कामगारांची भरती केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे, अशी मागणी करत ग्रामस्थांनी कंपनीकडे जाब विचारला होता. मात्र कंपनी व्यवस्थापनाने याबाबत निर्णय घेण्यासाठी वरिष्ठांशी चर्चा करावी लागेल, अशी भूमिका मांडली.

या बैठकीत ग्रामस्थांनी विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा करून ठोस निर्णय घेण्याची मागणी केली. अखेर स्थानिकांच्या मागण्यांवर कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा होईपर्यंत कोणतीही नवीन भरती न करण्याचे निर्देश पोलिस उपायुक्त अमित काळे यांनी दिले. त्यामुळे ग्रामस्थांनी प्रस्तावित मोर्चा २५ मार्चपर्यंत स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

## ढाब्यावर मारहाण

**कर्जत** : कर्जत तालुक्यातील छोटे वेणगाव येथील खोत ढाब्यावर जेवणासाठी गेलेल्या व्यक्तीवर काचेच्या बाटलीने हल्ला केल्याची घटना घडली. फिर्यादी आपल्या मित्रासोबत बांधकाम साईटच्या कामाबाबत चर्चा करत असताना शेजारी बसलेल्या दोन जणांशी वाद झाला. वाद वाढल्यानंतर आरोपींनी शिवीगाळ करत हाताबुक्क्यांनी मारहाण सुरू केली. भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या फिर्यादीच्या कपाळावर काचेच्या बाटलीने वार केल्याने तो जखमी झाला. त्यानंतर आरोपींनी धमकी देत घटनास्थळावरून पळ काढला. या प्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चालू गाड्यांवर ई-चलनाची कारवाई

**● नेरुळ-उरण फाटा मार्गावरील वाहनचालक संभ्रमात**

| उरण | प्रतिनिधी |

नेरुळ-उरण फाटा मार्गावर वाहतूक पोलिसांकडून चालू वाहनांवरच ई-चलन काढण्याची कारवाई होत असल्याचा प्रकार समोर आल्याने वाहनचालकांमध्ये संभ्रम आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. अपोलो हॉस्पिटल ते उरण फाटा मार्गावर ही कारवाई सुरू असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.



वाहन चालकांनी दिलेल्या माहितीनुसार, काही वाहतूक पोलीस कर्मचारी वाहन थांबवण्याऐवजी वेगात धावणाऱ्या दुचाकी आणि चारचाकी वाहनांवर थेट ई-चलन जारी करत असल्याचे दिसून आले. त्यामुळे ही कारवाई वाहतूक नियमांची अंमलबजावणी आहे की वाहनचालकांना धाक दाखवण्याचा प्रकार, असा सवाल उपस्थित केला जात आहे. या पद्धतीमुळे अपघाताचा धोका वाढू शकतो, अशी भीतीही काही वाहनचालकांनी व्यक्त केली आहे. काहींनी या प्रकाराचे मोबाईलवर चित्रीकरण केल्याचेही सांगितले जात आहे. नेरुळ-उरण हा रायगड जिल्ह्यातील महत्त्वाचा व्यावसायिक मार्ग असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करून कारवाईची पद्धत स्पष्ट करावी, अशी मागणी नागरिक आणि व्यापारी संघटनांकडून करण्यात येत आहे.

## द्रोणागिरी नोडमध्ये सिडकोचा हातोडा

**● निवडक कारवाईमुळे प्रशासनावर प्रश्नचिन्ह**

| उरण | प्रतिनिधी |

उरणमधील द्रोणागिरी नोड परिसरात सिडकोच्या जमिनीवर आणि रस्त्यांच्या कडेला फोफावलेल्या अतिक्रमणांवर अखेर सिडकोच्या अतिक्रमण विरोधी पथकाने धडक कारवाई केली. या मोहिमेत अनेक अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यात आली असली, तरी काही विशिष्ट अनधिकृत टपऱ्या आणि बांधकामे वाचवल्याने सिडकोच्या दुटप्पी भूमिकेवर नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.



द्रोणागिरी नोड परिसरात गेल्या काही काळापासून मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे वाढली होती. रस्त्यांच्या दुभाजकावर आणि रस्त्याच्या बाजूच्या फुटपाथवर अनेक अनधिकृत बांधकामे केली आहेत. यामुळे रस्ते अरुंद होऊन वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता. या तक्रारींची दखल घेत सिडकोचे अतिक्रमण विरोधी पथकाचे अधिकारी अमित रजपुत यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबवण्यात आली. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सिडकोचे विशेष सुरक्षा पथक आणि स्थानिक पोलिसांचा मोठा ताफा तैनात करण्यात आला होता.

सिडकोने एका बाजूला काही कच्ची आणि पक्की बांधकामे पाडली असतानाच, दुसरीकडे रस्त्याच्या कडेला असलेल्या अनेक मोठ्या अनधिकृत टपऱ्या, कॅन्टीन आणि झोपड्यांवर कोणतीही कारवाई केली नाही. पथकाने या बांधकानांकडे सोयीस्कर दुर्लक्ष केल्याने ही कारवाई नेमकी कोणासाठी, असा सवाल स्थानिक रहिवासी उपस्थित करत आहेत. सर्वसामान्यांच्या अतिक्रमणांवर हातोडा चालवणाऱ्या प्रशासनाने बड्या हितसंबंधांच्या टपऱ्या आणि कँटीनला सिडकोने ही मोहीम केवळ एका दिवसापुरती मर्यादित न ठेवता, संपूर्ण परिसरातील सर्वच अनधिकृत बांधकामे हटवावीत, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा, अशा अर्धवट कारवाईमुळे सिडको प्रशासनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह कायम राहील, अशी भीती व्यक्त होत आहे. याविषयी सिडकोचे अतिक्रमण पथकाचे अमित रजपुत यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क झाला नाही.

**फळे, वर्णमाला तोंडपाठ | विलक्षण स्मरणशक्तीचे सर्वत्र कौतुक**

# चिमुकली मायरा विक्रमवीर

| रसायनी | प्रतिनिधी |

**अवघ्या २१ महिन्यांच्या मायरा नरेंद्र पाटील या चिमुकलीने आपल्या विलक्षण बुद्धिमत्तेची झलक दाखवत विविध पुरस्कारांवर नाव कोरले आहे. अवघ्या एक वर्ष नऊ महिन्यांच्या वयात तिने अनेक विषयांवरील प्रश्नांची अचूक तोंडी उत्तरे देत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

मायराला 'प्राइड ऑफ महाराष्ट्र अवॉर्ड २०२६' अंतर्गत 'यंग प्रॉडिजी ऑफ महाराष्ट्र' हा सन्मान अभिनेत्री प्रार्थना बेहरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच तिची नोंद




इंडिया बुक रेकॉर्डमध्ये करण्यात आली असून, तिला आयबीआर पदवी बहाल करण्यात आली आहे.

याशिवाय अवघ्या सात महिन्यांची असतानाच 'इन्फ्लुएन्सर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'कडूनही तिचा गौरव करण्यात आला होता. फ्लॅशकार्ड ओळखणारी सर्वात लहान मुलगी म्हणूनही मायराची नोंद झाली आहे.

मायराने १५ फळे, १५ भाज्या, शरीराचे ९ अवयव, बुद्धिबळातील ५ सोंगट्या, ११ पक्षी, १५ समाजसेवकांची नावे, १८ वाहने, १२ पाळीव प्राणी आणि २४ जंगली प्राणी ओळखून दाखवले आहेत. तसेच इंग्रजी वर्णमालेतील सर्व अक्षरे आणि एक इंग्रजी कविता तिने सहज म्हणून दाखवली. एवढ्या कमी वयात दाखवलेल्या तिच्या विलक्षण स्मरणशक्तीमुळे मायराचे सर्वत्र कौतुक होत आहे. एवढ्याशा वयात तिने विक्रमाला गवसणी घातल्याबद्दल तिच्या नावाची सर्वत्र चर्चा आहे.

## घरफोडीत १९ हजारांचा ऐवज लंपास

**पोलादपूर** : तालुक्यातील एका घरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून १९ हजार १०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली. फिर्यादी यांच्या मालकीच्या घराचे कुलूप तोडून आरोपींनी घरात प्रवेश केला. घरातील विविध वस्तूंची उलथापालथ करून रोख रक्कम व इतर साहित्य चोरून नेण्यात आले. या प्रकाराची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली. चोरीबाबत विचारणा केल्यावर एका आरोपीने लोखंडी सळई घेऊन धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, पुढील तपास पोलीस हवालदार सुतार करीत आहेत.




## राशीभविष्य

- **मेष** : कार्यसिद्धीसाठी अधिक परिश्रम घ्यावे लागतील. उत्साहाने रहावं. भावंडांबद्दल चिंता संभवते.
- **वृषभ** : दुर्गुण त्यागावे. शारीरिक तक्रारी वाढतील. वाद टाळावे. अडचणी कमी होतील.
- **मिथुन** : सुखस्वास्थ्य लाभणार असून मनावरील दडपण कमी होणार आहे. रेंगाळलेले प्रश्न सुटतील.
- **कर्क** : आर्थिक समस्या कमी होतील. धडाडी वाढणार आहे. महत्त्वाच्या कामात अधिक लक्ष घालावे.
- **सिंह** : देणेकऱ्यांना चुकवू नका. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. शिक्षणात समस्या संभवतात.
- **कन्या** : कार्यक्षेत्रात संघर्ष करावा लागेल. ठाम विचाराने रहावं. स्थावर प्रश्न वाढवू नका. प्रवास टाळा.
- **तूळ** : जुनी येणी वसुल होतील. व्यर्थ चिंता करु नका. घाईने घेतलेले निर्णय नुकसानीचे ठरतील.
- **वृश्चिक** : हाती घेतलेली कामं मनासारखी होतील. कोणास जामीन राहू नका. विचाराने गुंतवणूक करा.
- **धनु** : नोकरीत जबाबदाऱ्या वाढतील. घरात शुभकार्य घडतील. अपेक्षित कामं पूर्ण होतील.
- **मकर** : देण्याघेण्याच्या व्यवहारात लक्ष घालावे. कलागुणांचा विकास होईल. सुसंधी लाभतील.
- **कुंभ** : प्राप्तीचं प्रमाण साधारण राहील. अनावश्यक खर्च टाळावा. संततीशी मतभेद संभवतात.
- **मीन** : जबाबदाऱ्यांची विभागणी करावी. ताण फार वाढवू नका. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.

## दिनविशेष

### १३ मार्च

- **१९१०** : पॅरिसहून लंडनला येताना स्वा.सावरकरांना अटक झाली.
- **१९६३** : नैपुण्य दाखवणाऱ्या खेळाडूला अर्जुन पुरस्कार देण्यास सुरूवात.
- **२०१३** : अर्जेंटिनाचे कार्डिनल जॉर्ज मारिओ बर्गोग्लियो यांची पोपपदी निवड.
- **२०१४** : दिल्लीतील सामूहिक बलात्कार प्रकरणातील चार आरोपींची मृत्युदंडाची शिक्षा उच्च न्यायालयाने कायम ठेवली.
- **२०१६** : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गणवेशात खाकी हाफ पँटऐवजी तपकिरी रंगाची फुल पँट सामील.

## आरोग्यमंत्र

## पायदुखीवरचे प्रभावी उपाय

अनेकांचे पाय आणि सांधे दुखतात. मध्यमवयाच्या महिला, अशक्त मुलं आणि मुली तसंच वृद्ध मंडळींना पाय दुखण्याचा त्रास होतो. यावर एक चमचा कच्चे तीळ व एक चमचा जवस भाजून चावून खावेत. एक ते दीड महिना हा उपाय केल्याने पाय दुखणं थांबतं. थंडीत पायावर उबदार पांघरूण घेतल्याने पायाचं दुखणं थांबतं. जुनी दुखणी, हाडाचं झालेलं ऑपरेशन व मुका मार त्रास देत असेल तर खालील उपाय करता येतील.



**साहित्यः** १०० ग्रॅम मेथी, ५० ग्रॅम ओवा, ५० ग्रॅम काळे जिरे, हे (एका व्यक्तीसाठीचं प्रमाण आहे.) यात फरक करू नये. प्रमाण वजन करूनच घ्यावं.

**कृती** : वरील तीनही घटक लोखंडाच्या कढईत सौम्य तापमानात (साधारण लालसर होईपर्यंत) वेगवेगळे भाजून घ्यावेत. नंतर तीनही वस्तू एकत्र करून मिक्सरमधून पावडर करावी. त्यात १०० ग्रॅम आवळा पावडर मिक्स करा. (आवळा पावडर भाजू नये) रात्री झोपताना एक चमचा (टी स्पून) पावडर एक कप कोमट पाण्याबरोबर घ्यावी. पाणी कोमट घेणं आवश्यक आहे. हे चूर्ण रोज घेतल्यामुळे शरीराच्या कानाकोपऱ्यात साचलेली घाण मलाद्वारे अथवा लघवीद्वारे बाहेर निघून जाते. हे चूर्ण रोज घेतल्यामुळे सुरकुतलेली त्वचा ताणली जाते. कांती सुधारते.

## सफर देशांची

## जगावेगळा 'मॉल्डोव्हा'

'मॉल्डोव्हा' हा युक्रेन आणि रोमानिया या दोन देशांच्या मध्ये वसलेला छोटा देश आहे. 'मॉल्डोव्हा प्रजासत्ताक' या नावाने तो ओळखला जातो. जुन्या काळात त्याला 'मॉल्डाव्हिया' म्हणत. 'मॉल्डोव्हन' ही इथली अधिकृत भाषा तर 'चिसिनाउ' ही या देशाची राजधानी. दुसऱ्या महायुद्धाआधी तो रोमानियाचा भाग होता. महायुद्धानंतर १९९१ पर्यंत हा 'सोव्हियत युनियन' म्हणजे आत्ताच्या रशियामध्ये होता. 'चिसिनाउ' हेच इथलं प्रमुख शहर आहे. देशातले बरेच उद्योग याच शहरात असून ते इथलं व्यावसायिक केंद्रही आहे. चिसिनाउ मॉल्डोव्हाच्या मधोमध वसलं आहे. 'बालानेस्टी हिल' हा देशातला सर्वात उंच भाग आहे. देशातली ७४ टक्के जमीन सुपीक असून इथे शेती होते तर १३.७ टक्के जमिनीवर जंगल आहे. या देशात चार अभयारण्य आहेत. 'रॉयल फॉरेस्ट' हे इथलं सर्वात मोठं अभयारण्य असून इथे ओकची झाडं पहायला मिळतात. सर्वात जुनं झाड ४५० वर्षांपूर्वीचं असल्याचं बोललं जातं. वेगवेगळ्या प्रजातींचे प्राणीही इथे पहायला मिळतात. 'क्रिकोव्हा' हे इथलं जमिनीच्या खाली वसलेलं शहर आहे.

## स्टाईल स्टेटमेंट

## ऑफिसमधली फॅशन जपण्यासाठी...

ऑफिसमध्ये काय घालायचं, हा प्रश्न महिलांना कायमच पडलेला असतो. कामाच्या ठिकाणी फार झगमगीत कपडे घालता येत नाहीत. फॉर्मल लूक राखावा लागतो. अशावेळी टिपिकल कुर्ते, सलवार कमीज, साडी, ट्राउझर-शर्ट काही काळ बाजूला ठेवावेसे वाटतात. ऑफिस लूकला ट्विस्ट देण्याच्या या काही टिप्स...

* वैविध्यपूर्ण कुर्ते खरेदी करा. प्लेन, प्रिंटेड, लाँग, फिटेड, लूज यातला प्रत्येक प्रकार तुमच्या वॉर्डरोबमध्ये असायला हवा. यामुळे तुम्हाला कूल लूक मिळेल. योग्य कॉम्बिनेशन करून मस्त ट्रेंडी राहात येईल.

* सलवार किंवा लेगिंगऐवजी पलाझो तसंच सिगारेट पँट ट्राय करता येईल. लांब कुर्त्यांवर हे बॉटम्स शोभून दिसतात. नक्षीकाम केलेले, स्ट्रेट कुर्तेही यावर घालता येतील.

* ऑफिसमध्ये फॉर्मल्स घालण्याची सक्ती नसेल तर जीन्स आणि शॉर्ट कुर्ती हे कॉम्बिनेशनही हिट आहे.

**(क्रमश:)**

## पंचांग

**शुक्रवार, १३ मार्च २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, फाल्गुन कृ. १०, चंद्रराशी : धनु, नक्षत्र : पूर्वाषाढा, योग : व्यतिपात, सूर्योदय ६.५१, सूर्यास्त ६.४६

## फॉरवर्ड्स

**क़ुछ तों बात हैं क़ी हस्ती मिटती नहीं हमारीं...**

**सदियों रहां हैं दुश्मन दौर-ए-ज़माना हमारा...!**

## फॅशन पॅशन

कोणत्याही रंगावर चालून जातील असे कपडे खरेदी करायला हवेत. यामुळे एक टी शर्ट वेगवेगळ्या बॉटम्सवर किंवा एका पँटवर वेगवेगळे शर्ट/टी शर्ट कॅरी करता येतील. न्यूट्रल रंगांमध्ये ही क्षमता असते. काळा, पांढरा रंग कशावरही चालून जातो.

* निळ्या रंगाच्या विविध शेड्स ऑल टाईम फेवरेट आहेत. हा रंग कोणत्याही रंगांसोबत खुलून दिसतो. बूट, ब्लेझर, शर्ट किंवा ट्राउजर, निळ्या रंगाचं काहीही तुम्ही घेऊ शकता. कॉंट्रास्ट कॉम्बिनेशन्सची सध्या बरीच चलती आहे. त्यामुळे निळ्या रंगाचे कपडे नक्की घ्या. **(क्रमश:)**

## करिअरवाटा

## शांततादूताची लक्षवेधी कारकीर्द

अलिकडच्या काळात जागतिक पातळीवर शांतता आणि सुव्यवस्थेचा प्रश्न सातत्यानं ऐरणीवर येत आहे. अशा स्थितीत जगात शांतता-सुव्यवस्था नांदावी तसंच जनतेला सुखा-समाधानानं जीवन जगता यावं या हेतूनं जवळपास सारीच राष्ट्र प्रयत्नशील आहेत. तरीही कोणत्या ना कोणत्या कारणानं शांतता आणि सुव्यवस्था धोक्यात येत आहे. विविध प्रकारची आंदोलनं, संघर्ष यामुळे वातावरण तर कलुषित होतंच. शिवाय त्यात जीवित आणि वित्त हानी मोठ्या प्रमाणावर होते. वाढत्या दहशतवादी-नक्षलवादी कारवाया, हिंसाचार या बाबी आटोक्यात कशा आणायच्या हा जगापुढील महत्त्वाचा प्रश्न आहे. या पार्श्वभूमीवर 'पीस अँड कॉंफ्लिक्ट स्टडीज' हा विषय महत्त्वाचा मानला जातो. यामध्ये सरकारी संस्थांद्वारे शांततेसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना हातभार लावण्याबरोबर राजकीय संशोधक तसेच पत्रकारितेच्या क्षेत्रातही कारकीर्द करता येते. या क्षेत्रातील वेतन संबंधित व्यक्तीचं पद, शिक्षण यावर अवलंबून असतं. असा अभ्यासक्रम द नेल्सन मंडेला सेंटर फॉर पीस अँड कॉंफ्लिक्ट रिझॉल्युशन, जामिया मिलिया इस्लामिया यासह अन्य काही संस्थांमध्ये उपलब्ध आहे. सिक्कीममधील मणिपाल विद्यापीठात एम.ए./पी.एच.डी. इन पीस अँड कॉंफ्लिक्ट स्टडीज अँड मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे.



## खेचाखेची

### हुंडा

आई, मी लग्नात हुंडा घेणार नाही...

**आई:** बाळा तुला कोणी मुलगी दिली तर तेच खूप आहे.
.
.
.
.
बाकी हुंडा वगैरे खुप लांबची गोष्ट आहे!

## वेगळं काही

मुलाखत घेणारी व्यक्ती उमेदवाराला वेगवेगळ्या पद्धतींनी जोखत असते. अनेकदा पूर्वग्रहदूषित विचारांमुळेही योग्य उमेदवाराची निवड होत नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी स्वीडनच्या 'फुरहात' या रोबोटिक्स कंपनीने 'तेनगाई' हा जगातला पहिला मुलाखत घेणारा रोबो तयार केला आहे. १६ इंच लांब असलेल्या या रोबोचं वजन फक्त ३.५ किलो आहे. 'तेनगाई'मध्ये 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चा वापर करण्यात आला आहे. हा रोबो उमेदवारांना नोकरी किंवा पदाशी संबंधित प्रश्न विचारतो. त्यांची क्षमता जाणून घेतो. उमेदवारांची उत्तरं लिखित स्वरूपात कंपनी व्यवस्थापनापर्यंत पोहोचवली जातात. निवड प्रक्रियेच्या पुढच्या टप्प्यासाठी होणारी निवड या उत्तरांवर ठरते.

## समुपदेशन

## विचारपूर्वक निर्णय घे

माझं लग्न विसाव्या वर्षी झालं. परिचित कुटुंबातील मुलगा असल्यानं वडीलांच्या सल्ल्यावरुन लग्न केलं. मात्र, १९ वर्षांच्या सहजीवनात मी समाधानी नाही. आमच्यात अनेक बाबतीत विसंवाद आहे. पती आत्मकेंद्री असून त्याच्याकडं ध्येयं नाहीत. तो प्रत्येक बाबतीत निरस आहे. त्यामुळंच की काय, त्याच्या मित्राचा सहवास मला भावतो. आम्ही एकमेकांकडं आकर्षित होत आहोत. तो विवाहित आहे. आम्ही आधीची बंधनं झुगारुन एकत्र राहण्यास तयार आहोत. पण, मला जनलज्जेचं भयही आहे. काय करू, माझं वागणं व्यभिचार आहे का?



– हे बघ, पतीशी बेबनाव, मतैक्य नसल्यामुळं परकेपणाची जाणीव बळावणं, एकमेकांप्रती प्रेम न उत्पन्न होणं या अनेक जोडप्यांना सतावणाऱ्या बाबी आहेत. पण, संसार तोडणं इतकं सोपं नाही. शिवाय तू अन्य एका विवाहित पुरुषाच्या प्रेमात अडकत आहेस. तुम्ही एकत्र राहण्याचा विचार केला, तर दोन संसार मोडणार आहेत. मुख्य म्हणजे तुम्हा दोघांना आधी घटस्फोट घेऊनच आधीच्या बंधनातून मुक्त व्हावं लागणार आहे. ही प्रक्रिया वेळखाऊ तसंच मनस्ताप देणारी आहे. इतक्या सगळ्या दिव्याला सामोरं जाण्याची तयारी असेल तरच पुढ्चा विचार कर.

## सुडोकू ७६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | | | ६ | | | ४ | ९ | १ |
| | ५ | | | ७ | | २ | | |
| | | २ | | ४ | ८ | | | |
| | २ | | | | | | | |
| ९ | १ | ६ | | ३ | | ७ | ४ | ५ |
| | | | | | | | १ | |
| | | | ७ | ५ | | ८ | | |
| | | ५ | | ९ | | | ३ | |
| २ | ७ | १ | | | ४ | | | ६ |

**टीप -**

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ७५चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ८ | ६ | ३ | ९ | ५ | १ | ७ | ४ |
| ७ | ३ | १ | ६ | ४ | ८ | ५ | २ | ९ |
| ४ | ९ | ५ | २ | ७ | १ | ३ | ६ | ८ |
| ६ | १ | ९ | ८ | ५ | ३ | २ | ४ | ७ |
| ५ | ४ | २ | १ | ६ | ७ | ९ | ८ | ३ |
| ८ | ७ | ३ | ९ | २ | ४ | ६ | ५ | १ |
| ९ | ५ | ७ | ४ | ३ | २ | ८ | १ | ६ |
| ३ | २ | ८ | ७ | १ | ६ | ४ | ९ | ५ |
| १ | ६ | ४ | ५ | ८ | ९ | ७ | ३ | २ |

## शब्दकोडे क्रमांक ७६

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ■ | ५ | ६ | | ७ | ■ | ८ | | ९ | १० |
| | ■ | ११ | | | १२ | ■ | | ■ | १३ | | | ■ | १४ | |
| १५ | १६ | | ■ | १७ | | १८ | ■ | १९ | | ■ | २० | २१ | | ■ |
| २२ | | ■ | २३ | ■ | २४ | | | ■ | २५ | २६ | ■ | २७ | | |
| ■ | २८ | २९ | | | ■ | | ■ | ३० | | | | ■ | | ■ |
| ३१ | | | | ■ | ३२ | ■ | ३२अ) | | ■ | | ■ | ३३ | | ३४ |
| | ■ | | ■ | ३५ | | | ■ | ३६ | ३७ | ■ | ३८ | | ■ | |
| | ■ | ३९ | | | | ■ | ४० | ■ | ४१ | ४२ | | ■ | ४३ | |
| ४४ | | | ■ | ४५ | | | | ४६ | ■ | ४७ | | ४८ | ■ | |
| | ■ | ४९ | ५० | ■ | | ■ | ५१ | | ५२ | ■ | ■ | ५३ | ५४ | ■ |
| ■ | ५५ | ■ | ५६ | ५७ | ■ | ५८ | ■ | ५९ | | ६० | ■ | ६१ | | ६२ |
| ६३ | | ■ | ६४ | | ६५ | | ६६ | | ■ | ६७ | ६८ | | ■ | |
| ६९ | | | ■ | ७० | | ■ | ७१ | | ७२ | ■ | ७३ | | ७४ | |
| ■ | | ■ | ७५ | | ■ | ७६ | | ■ | ७७ | | ■ | ७८ | | ■ |
| ७९ | | | | | | ■ | ८० | | | ■ | ८१ | ■ | ८२ | |

**आडवे शब्द :-**

१) श्रीविष्णुचा पहिला अवतार
५) बातमी
८) एकाच्या हातातून दुसऱ्याच्या हातात सत्ता जाणे
११) अरबट ****
१३) उपस्थित
१४) शाहीराजवळचे छोटे चर्मवाद्य
१५) शुभकार्यासाठी देवांची तात्पुरती स्थापना करणे
१७) धपाटा
१९) गुलामी
२०) जोराचा प्रहार
२२) रंग
२४) मीठ
२५) पुष्परस
२७) लचांड, त्रासदायक काम, भानगड
२८) संपत्ती
३०) केविलवाणी (स्थिती)
३१) कलाकार
३२अ) धमनी, नाडी
३३) कोर्टात अशीलाची बाजू मांडणारा
३५) नोकर
३६) संताप
३८) भूपती
३९) भेसळ
४१) स्तुतीस्तोत्र
४३) दिवस
४४) वाळवी
४५) प्रफुल्लित
४७) ग्रामप्रमुख
४९) भारतीय उत्तरसीमेवरील बलाढ्य राष्ट्र
५१) डाक
५३) हस्त
५६) महिना
५९) एक तारवाद्य
६१) मऊ
६३) पुरुष
६४) मातापिता
६७) उत्तराधिकारी
६९) बैलाच्या नाकात अडकविण्याची दोरी
७०) औषध
७१) जीभ, चव
७३) महोदय, श्रीयुत
७५) च्या जवळ
७६) हद्द
७६) हत्ती
७८) पुरुष
७९) पुन्हापुन्हा
८०) परमेश्वर
८१) अथवा, किंवा
८२) किंमत

**उभे शब्द :-**

१) शंकराचे एक नाव
२) धाक, दरारा
३) धातूचा धागा
४) खोडण्याचे साधन
६) मृत्तिका
७) रहस्याने भरलेले
८) कापडाचा एक प्रकार
९) ताबडतोब, तात्काळ
१०) कच्चे लिखाण (इं.), खरबरीत
१२) झोंबाझोंबी (इं.)
१६) मुळाक्षरे
१८) एक सुगंधी वनस्पती
२१) अस्थिर, हलणारी (संपत्ती)
२३) धैर्य
२६) धन्याची पत्नी
२९) लहान आकाराची तिखट मिरची
३०) विजयादशमी
३१) पळसाचा डिंक
३२) जवळचा (नातलग, मित्र)
३३) कमी, गणितातील उणे
३४) छोटासा
३५) वात्रट
३७) फिरता पहारा
३८) जंगली
४०) न बिघडणारा (रंग), कंटाळा न आणणारा
४२) चरबी
४६) तपासणी करणारा
४८) छोटा
५०) मुसलमानांची प्रार्थना पद्धत
५२) वेल
५४) होडी
५५) घराचा मागचा दरवाजा
५७) कायद्याप्रमाणे
५८) संध्याकाळ
६०) कणीदार पीठ
६२) एक पौराणिक पर्वत
६३) नवीन
६५) केव्हा (ग्रा.)
६६) नेमस्तपणाचे धोरण
६८) दारुचा एक प्रकार
७२) सुशिक्षित, शहाणा, सुंदर
७४) एक ऋतू
७५) पातक

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता | रां | ग | ण | ■ | अं | ■ | सा | म | दा | म | दं | ड | भे | द |
| ■ | ज | र | ■ | अं | ग | का | ठी | ■ | म | ज | ■ | ब | द | ल |
| प | ण | ■ | ना | क | ■ | ■ | बु | ड्ढा | ■ | ला | चा | र | ■ | द |
| द | वा | खा | ना | ■ | स | मृ | द्धी | ■ | ख | ■ | क | ■ | गा | ल |
| ■ | डी | र | ■ | रा | म | ■ | ना | का | स | मो | र | जा | णे | ■ |
| दा | ■ | ज | र | त | र | ■ | ठी | ■ | ख | र | ■ | य | ■ | ज |
| द | श | मी | ■ | ■ | स | म | ■ | र | स | ■ | ग | दा | रो | ळ |
| ■ | प | न | व | ती | ■ | र | म | ण | ■ | सं | वा | द | ■ | ज |
| प | थ | ■ | न | र | क | वा | स | ■ | प्र | हा | र | ■ | मा | ळी |
| हे | ■ | र | वि | ■ | ष्ट | ■ | ल | व | क | र | ■ | र | ज | त |
| ल | ■ | वि | हा | र | ■ | उ | त | ■ | ट | क | म | क | ■ | ■ |
| वा | रं | वा | र | ■ | वि | ना | ■ | आ | णे | ■ | न | म | स्का | र |
| न | ग | र | ■ | का | प | ड | ■ | म | ■ | द | ■ | पा | ■ | क्त |
| ■ | ना | ■ | भि | का | री | ■ | पो | र | ■ | मा | ■ | त | गा | दा |
| र | थ | या | त्रा | ■ | त | र | क | स | क | मा | न | ■ | ज | न |

# आयपीएलचे वेळापत्रक जाहीर

## || चिन्नास्वामी स्टेडियमवर होणार पहिला सामना || युद्धाचा फटका बसण्याचा अंदाज

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

इंडियन प्रीमिअर लीग २०२६ चे वेळापत्रक अखेर बुधवारी जाहीर करण्यात आले. आधी ठरल्याप्रमाणे स्पर्धेचा पहिला सामना व फायनल बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळवण्यात येणार आहे. २८ मार्चपासून सुरू होणाऱ्या आयपीएल २०२६ ला अवघी १७ दिवस शिल्लक राहिली आहेत आणि तरीही वेळापत्रक जाहीर होत नसल्याने, चाहत्यांमध्ये धाकधुक होती. पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाचा फटका आयपीएल २०२६ लाही बसण्याचा अंदाज व्यक्त केला जात होता. त्यात भारतातील काही राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका असल्याने २०२६ जाहीर होण्यास आधीच उशीर झाला होता.




बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी काही दिवसांपूर्वी सांगितले होते की, आसाम, बंगाल आणि तामिळनाडू सारख्या तीन किंवा चार राज्यांमध्ये निवडणुका होत असल्याने वेळापत्रक जाहीर होण्यास उशीर होत आहे. आम्ही निवडणूक अधिकाऱ्यांकडून घोषणेची वाट पाहत आहोत. आम्हाला एक-दोन दिवसांत निर्णय घ्यावा लागेल. त्यानंतर, आम्ही आयपीएल कसे पुढे जात आहोत हे तुम्हाला कळवू. त्यानुसार बुधवारी (दि.११) रोजी अखेर वेळापत्रकाची घोषणा झाली.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने मागील पर्वात जेतेपदाचा दुष्काळ संपवला. आरसीबीला १७ वर्षांत जेतेपदाने अनेकदा हुलकवाणी दिली होती, परंतु आयपीएल २०२५ मध्ये त्यांनी रजत पाटीदारच्या नेतृत्वाखाली फायनलमध्ये श्रेयस अय्यरच्या पंजाब किंग्सवर विजय मिळवून पहिले जेतेपद उंचावले. या जेतेपदाचे सेलिब्रेशन करण्यासाठी आरसीबीने बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर सोहळ्याचे आयोजन केले होते, परंतु तिथे झालेल्या चेंगराचेंगरीत ११ प्रेक्षकांना प्राण गमवावे लागले. त्यामुळे या स्टेडियमवर क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यास बंदी घातली गेली होती. पण, आता आरसीबीचे पाच सामने या स्टेडियमवर खेळवण्यास परवानगी मिळाली आणि उर्वरित ३ पहिल्या टप्प्यातील २० सामन्यांचे वेळापत्रक बीसीसीआयने जाहीर केले आहे. गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद यांच्यात सलामीचा सामना २८ मार्चला एम चिन्नास्वामी स्टेडियमवर होणार आहे.

मुंबई इंडियन्सची पहिली लढत २९ मार्चला वानखेडे स्टेडियमवर कोलकाता नाइट रायडर्स विरुद्ध होईल. आयपीएलचे अधिकृत वेळापत्रक ७ वाजता जाहीर केले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात अशा लढती होतील. २८ मार्च - रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू वि. सनरायझर्स हैदराबाद, बंगळुरू २९ मार्च - मुंबई इंडियन्स वि. कोलकाता नाइट रायडर्स, मुंबई ३० मार्च - राजस्थान रॉयल्स वि. चेन्नई सुपर किंग्स, गुवाहाटी मार्च - पंजाब किंग्स वि. गुजरात टायटन्स, मुल्लानपूर १ एप्रिल - लखनौ सुपर जायंट्स वि. दिल्ली कॅपिटल्स, लखनौ २ एप्रिल - कोलकाता नाइट रायडर्स वि. सनरायझर्स हैदराबाद, कोलकाता ३ एप्रिल - चेन्नई सुपर किंग्स वि. पंजाब किंग्स, चेन्नई ४ एप्रिल - दिल्ली कॅपिटल्स वि. मुंबई इंडियन्स, दिल्ली ४ एप्रिल - गुजरात टायटन्स वि. राजस्थान रॉयल्स, अहमदाबाद ५ एप्रिल - सनरायझर्स हैदराबाद वि. लखनौ सुपर जायंट्स, हैदराबाद ५ एप्रिल - रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू वि. चेन्नई सुपर किंग्स, बंगळुरू एप्रिल - कोलकाता नाइट रायडर्स वि. पंजाब किंग्स, कोलकाता ७ एप्रिल - राजस्थान रॉयल्स वि. मुंबई इंडियन्स, गुवाहाटी एप्रिल - दिल्ली कॅपिटल्स वि. गुजरात टायटन्स, दिल्ली ९ एप्रिल - कोलकाता नाइट रायडर्स वि. लखनौ सुपर जायंट्स, कोलकाता १० एप्रिल - राजस्थान रॉयल्स वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, गुवाहाटी एप्रिल - पंजाब किंग्स वि. सनरायझर्स हैदराबाद, मुल्लानपूर ११ एप्रिल - चेन्नई सुपर किंग्स वि. दिल्ली कॅपिटल्स, चेन्नई १२ एप्रिल - लखनौ सुपर जायंट्स वि. गुजरात टायटन्स, मुंबई १२ एप्रिल - मुंबई इंडियन्स वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, लखनौ.

# राहुल द्रविडला जीवनगौरव

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचा १५ मार्च रोजी वार्षिक पुरस्कार सोहळा दिल्ली येथे पार पडणार आहे. या २०२५-२६ वर्षाचा पुरस्कार सोहळा असेल. या सोहळ्यात भारतीय संघाचा दिग्गज फलंदाज आणि प्रशिक्षक राहुल द्रविड आकर्षण ठरेल. त्याच्या कारकिर्दीचा या सोहळ्यात गौरव करण्यात येणार आहे. त्याला जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. याशिवाय शुभमन गिललाही मोठा पुरस्कार मिळणार आहे.



राहुल द्रविड भारतीय संघातील १९९६ ते २०१२ दरम्यान प्रमुख फलंदाज होता. त्याने सचिन तेंडुलकर, सौरव गांगुली, व्हीव्हीएस लक्ष्मण यांच्यासोबत अनेकवर्षे भारतीय संघाच्या फलंदाजीची दबाबदारी समर्थपणे सांभाळली. त्याने भारतीय संघाचे नेतृत्वही केले, तसेच ज्यावेळी भारतीय संघाला यष्टीरक्षकाची गरज होती, त्यावेळी त्याने ती जबाबदारीही सांभाळली. त्याला भारतीय संघाचा 'द वॉल' म्हणूनही ओळख मिळाली. त्याने कसोटी आणि वनडे या दोन्ही प्रकारात १० हजारांहून अधिक धावा केल्या आहेत. द्रविडने ६०५ आंतरराष्ट्रीय डावात ४८ शतकांसह २४२०८ धावा केल्या.

राहुल २०१२ मध्ये निवृत्त झाल्यानंतर प्रशिक्षण क्षेत्रात उतरला. त्याने १९ वर्षांखालील भारतीय संघाला प्रशिक्षक म्हणून २०१८ साली वर्ल्ड कप जिंकून दिला, त्यानंतर २०२१ मध्ये त्याने भारताच्या राष्ट्रीय संघाच्या प्रशिक्षकपदाचीही जबाबदारी हाती घेतली होती.

राहुलच्या मार्गदर्शनाच भारतीय संघ २०२३ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप आणि २०२३ वनडे वर्ल्ड कपमध्ये उपविजेता ठरला, तर २०२४ मध्ये टी-२० वर्ल्ड कपचे विजेतेपद भारताने जिंकले. द्रविडच्या या मोठ्या योगदानामुळे आता त्याला प्रतिष्ठीत कर्नल सीके नायुडू जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

## मुंबई शहर 'जिल्हा पंच परीक्षा'

**मुंबई :** मुंबई शहर कबड्डी असो. च्या वतीने रविवार दि. २२ मार्च रोजी जिल्हा पंच परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. या पंच परीक्षेकरिता दि. १३ ते २१ मार्च या कालावधीत सायं. ७- ते ९- या वेळेत पंच उजळणी व मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हा असो. ला संलग्न असलेल्या संस्थेचा कोणताही सदस्य ही पंच परीक्षा देऊ शकतो. ज्या कोणास या परीक्षेस बसावायाचे असेल त्यांनी आपला प्रवेश अर्ज शुल्कासह भरून कार्यालयात जमा करावा. अधिक माहितीकरिता पंच सचिव सूर्यकांत देसाई - ९८६९००३२२८ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



## पुगांव संघाचा प्रथम क्रमांक



। खांब । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील खांब विभाग क्रिकेट असोसिएशन यांच्या मान्यतेने व देवकान्हे येथील यंगस्टार देवकान्हे यांच्या वतीने संपन्न करण्यात आलेल्या भव्यदिव्य स्वरूपातील क्रिकेट स्पर्धेत पुगांव संघाने अंतिम सामन्यात सर्वोत्तम खेळ करून विजेतेपद पटकावले आहे. माजी सरपंच ज्ञानदेव भोईर व नारायण कान्हेकर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी ज्ञानेश्वर भोईर जान्हवी भोईर उपस्थित होते.

या स्पर्धेत धाकेश्वर देवकान्हे या संघाने द्वितीय तर गावदेवी बाहे संघाने तृतीय क्रमांक पटकावला आहे. स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज म्हणून अविनाश कान्हेकर देवकान्हे, उत्कृष्ट गोलंदाज सचिन देवकर बाहे तर सामनावीर म्हणून तेजस भोईर देवकान्हे यांना बक्षिस वितरण कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले रोहिदास भोईर,अल्पेश कान्हेकर, रोहिदास सुटे आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी यंगस्टार देवकान्हे येथील सर्व क्रिकेट खेळाडू व गावातील क्रीडाप्रेमी नागरिकांनी मोलाचे सहकार्य केले.

## अवचितगड मेढा संघ अव्वल

**रोहा :** तालुक्यातील क्रीडाप्रेमींसाठी आयोजित करण्यात आलेली रोहा खो-खो प्रीमियर लीग २०२६ स्पर्धा मेढा येथील मैदानावर पार पडली. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत तालुक्यातील नामांकित संघांनी सहभाग घेत उत्कृष्ट सामने खेळले. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अवचितगड मेढा (रोहा) फायटर्स संघाने दमदार खेळ करत प्रथम क्रमांक पटकावला. एस.एन.एस. स्पोर्ट्स रोहा चॅलेंजर्स संघ द्वितीय, श्री भैरवनाथ यशवंतखार रोहा वॉरियर्स तृतीय तर ओम साई राम रोहा लिजेंड्स संघ चतुर्थ क्रमांकावर राहिला. स्पर्धेत उत्कृष्ट रक्षणासाठी प्रतीक जंगम, उत्कृष्ट आक्रमक म्हणून राज देशमुख, उदयोन्मुख खेळाडू म्हणून रुद्र मांडलेकर, उत्कृष्ट कर्णधार म्हणून ओंकार मालुसकर आणि सामनावीर म्हणून अक्षय मोरे यांचा सन्मान करण्यात आला.

## भारतीय महिला फुटबॉल स्पर्धेतून बाहेर

। सिडनी । वृत्तसंस्था ।

भारतीय महिला फुटबॉल आशियाई कपमधून बाहेर पडल्या आहेत. शेवटच्या गट सामन्यात भारताला चायनीज तैपेईविरुद्ध १-३ ने पराभव पत्करावा लागला. यासोबतच संघाचा स्पर्धेतील प्रवास संपला. या सामन्यात भारतासाठी विजय अत्यंत महत्त्वाचा होता. कारण पुढील फेरीत पोहोचण्यासाठी त्यांना किमान दोन गोलच्या फरकाने विजय मिळवायचा होता.

सिडनीमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात भारताने बराच काळ चेंडूवर नियंत्रण ठेवले आणि अनेक संधीही निर्माण केल्या, पण अंतिम टप्प्यात संघ गोल करण्यात अपयशी ठरला. यामुळे संघाला पराभव पत्करावा लागला आणि स्पर्धेतून बाहेर पडावे लागले.

पहिल्या हाफच्या अतिरिक्त वेळेत चायनीज तैपेईला पेनल्टी मिळाली होती.

वाय वाय सूचा शॉट पोस्टला लागून गोलकीपर पंथोईला लागून गोलमध्ये गेला. यामुळे तैपेईने २-१ अशी आघाडी घेतली. दुसऱ्या हाफमध्ये भारताने बरोबरी साधण्याचा प्रयत्न केला, पण ७७व्या मिनिटाला यू चिन चेनने तिसरा गोल करून सामना जवळपास निश्चित केला.

सामन्याच्या ८३व्या मिनिटाला गोलकीपर एलांगबाम पंथोई चानू एक हल्ला थांबवण्यासाठी पुढे सरसावल्या. याच दरम्यान त्यांची धडक कर्णधार स्वीटी देवीशी झाली. दोन्ही खेळाडू मैदानावर कोसळल्या आणि त्यांना स्ट्रेचरवरून बाहेर नेण्यात आले. पंथोईच्या चेहऱ्यावर सूज आली आहे, तर स्वीटी देवी काही काळ मैदानावर स्थिर पडून होती. नंतर दोन्ही खेळाडूंना तपासणीसाठी रुग्णालयात पाठवण्यात आले.

## श्री माणकेश्वर आमडोशी संघ विजेता

। नागोठणे । प्रतिनिधी ।

ग्रामीण क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने नागोठण्याजवळील वांगणी येथील श्री मरीआई क्रिकेट क्लब यांच्या वतीने ७ व ८ मार्च रोजी वांगणीतील श्री मरीआई क्रीडांगण, चामुटी शेतात आयोजित करण्यात आलेल्या भव्य ओव्हर आर्म टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामन्यात श्री माणकेश्वर आमडोशी संघाने एस. के. पी. कानसई संघाचा पराभव करून १० हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक व आकर्षक चषक पटकाविला. कानसई संघाला उपविजेतेपदाचे ७ हजार रुपये व चषकावर समाधान मानावे लागले. स्पर्धेत शिवतेज आमडोशी व जे. बी. सी. पळस यांना अनुक्रमे तृतीय व चतुर्थ क्रमांकाचे प्रत्येकी ४ हजार रुपयांचे बक्षीस व चषक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेतील मालिकावीर



ठरलेला आमडोशी संघाचा हरेश भोसले याला विनायक महादू तेलंगे पुरस्कृत १५ हजार रुपये किंमतीचा डायमंड देण्यात आला. तर उत्कृष्ट फलंदाज अजित ढाणे (कानसई), उत्कृष्ट गोलंदाज प्रथमेश दळवी (आमडोशी), सामनावीर निलेश खांडेकर (आमडोशी) उत्कृष्ट क्षेत्ररक्षक निषाद भालेकर (पळस) यांनाही सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेच्या निमित्ताने वांगणी येथील मरीआई क्रिकेट क्लबचे कमलाकर तेलंगे यांच्या विनंतीला मान देऊन खास करून उपस्थित राहिलेले आणि तरुणांचे आकर्षण असलेले रेवदंडा येथील बॉडी बिल्डर रोहन ठाकूर आणि श्रुती ठाकूर यांचा यावेळी मंडळाच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. या स्पर्धेदरम्यान संजय भोसले, हरिश्चंद्र तेलंगे, मोरेश्वर तेलंगे, कमलाकर तेलंगे, मधुकर तेलंगे, विनायक तेलंगे, कांचन ठाकूर, अंकुश तेलंगे, नरेंद्र भिसे, वैभव भिसे, दिलीप तेलंगे, विलास भिसे, राकेश भिसे, विकास ठाकूर, तेजस तेलंगे व ग्रामस्थ आवर्जून उपस्थित होते.

## निवडक

### आंबिवलीत मैत्री चषक स्पर्धेचे आयोजन




**पाताळगंगा :** मैत्री चषकांचे आयोजन मारुती ढवाळकर, यशवंत शिंदे यांच्या वतीने नाईट क्रिकेट सामन्यांचे आयोजन आंबिवलीत करण्यात आले होते. स्पर्धेत परिसरातील २७ नामवंत संघानी सहभाग नोंदविला, अतितटीच्या सामन्यात प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरला तो तळेगाव संघ, द्वितीय क्रमांक धामणी संघ तृतीय क्रमांक खरसुंडी संघ ठरला. स्पर्धेत सहा क्रमांक काढण्यात आले. सामन्यात अंतिम विजेत्यास एक लाख रुपये, द्वितीय क्रमांक पन्नास हजार तर तृतीय, चतुर्थ, पाच, सहा क्रमांकास पंचवीस हजार रुपये, व चषक देण्यांत आले. तृतीय क्रमांक खरसुंडी यांनी पटकाविला, चतुर्थ टाकेगांव, पाचवा होराळे, सहावा खरसुंडी संघाने जिंकले. विजेत्या संघास आकर्षक चषक,देण्यांत आले. स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज साईराज धामणी, कूलर व ट्रॉफी, गोलंदाज अक्षय धामणी कूलर व ट्रॉफी, मालिकावीर अभी कड़पे तळेगाव एलइडी टिव्ही व ट्रॉफी, सर्वोत्तम क्षेत्ररक्षक-राजू (वड़गांव) ट्रॉफी देण्यांत आली. सामन्याचे समालोचन प्रकाश पाटील, अशोक मालकर, संतोष चौधरी, समीर सोमणे, यश मालकर, सुरज हातमोडे यांनी केले. तर पंच म्हणून संदीप गायकवाड, राजेश भोईर, हरीश कराळे, गुणलेखक म्हणून रोहित पवार, रविंद्र पाटील, अतुल लबडे, सुरेश ढवाळकर, विजय काठावले यांनी काम पाहिले.

### नवतरुण संघ तिसऱ्या फेरीत

**ठाणे :** ठाणे जिल्हा कबड्डी असो. ने ॲडव्होकेट पूजा ठाकूर यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत किल्ले माऊली, नवतरुण, जय भारत यांनी महिलांत, तर छत्रपती शिवाजी, स्वामी विवेकानंद यांनी पुरुषांत तिसरी फेरी गाठली. कळवा, खारेगाव, ठाणे (प.) येथील खारलँड मैदान, सह्याद्री हायस्कुलच्या समोरील मैदानात सुरु झालेल्या महिलांच्या दुसऱ्या फेरीत किल्ले माऊली संघाने राहुल मंडळावर ५५-१८ अशी सहज मात केली. सुरुवातीलाच २ लोण देत किल्ले माऊलीने पूर्वार्धात २९-११ असे वर्चस्व राखले. दुसऱ्या चुरशीच्या सामन्यात नव तरुण मंडळाने शिवतेज संघाला २५-२४ असे चकवीत आगेकूच केली. महिलांच्या शेवटच्या सामन्यात जय भारतने स्व. राकेशदादा म्हात्रे संघाचा ४५-२० असा पराभव करीत तिसरी फेरी गाठली. पुरुषांच्या दुसऱ्या फेरीत छत्रपती शिवाजी महाराज संघाने नवरत्न मंडळाचा ३९-१३ असा पाडाव केला. वेदान्त नायक, ओमकार मोरे, तन्मय परब यांच्या चतुरस्त्र खेळाला याचे श्रेय जाते. नवरत्नचा देवराज बने बरा खेळला. दुसऱ्या सामन्यात स्वामी विवेकानंदने राज मंडळाचा प्रतिकार २८-१२ असा संपविला. पहिल्या डावात १४-०४ अशी विवेकानंद संघाकडे आघाडी होती. यश पाटील, कुणाल पानसरे या विजयात चमकले.



### जय हनुमान तळवली संघास विजेतेपद

**खांब :** रोहा तालुक्यातील कोलाड ग्रामीण क्रिकेट असोसिएशन अंतर्गत जय हनुमान तळवलीतर्फे क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन महेश वाघ, छाया वाघ, मार्शल डिसोजा, मारूती कोलाटकर, रामचंद्र मरवडे, मदन कोलाटकर, गणेश कोस्तेकर, संजय मरवडे, भगवान मरवडे यांच्या हस्ते करण्यात आला. जय हनुमान तळवली संघाने सर्वोत्तम खेळ करून विजेतेपदाचा बहुमान पटकावला. द्वितीय क्रमांक सोमजाई गोवे, तृतीय व चतुर्थ क्रमाक राम महादेववाडी व शिव शंभो गोवे संघांनी पटकावले. या स्पर्धेत मालिकावीर म्हणून निखिल वाफिलकर, उत्कृष्ट फलंदाज-विनायक जवके,उत्कृष्ट गोलंदाज- सिद्धेश शेडगे तर सर्वोत्तम क्षेत्ररक्षक समीर दहिंबेकर यांना तसेच विजेत्या संघांना सरपंच रवींद्र मरवडे, राम मरवडे, भगवान मरवडे, अरविंद भिलारे,मारूती बामणे आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. अंतिम सामन्यात प्रथम जय हनुमान तळवली संघाने फलंदाजी करीत असताना तीन षटकांच्या सामन्यात अठरा चेंडू ४० धावांची वादळी खेळी केली होती. सर्व स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी जय हनुमान तळवली संघाचे सर्व क्रिकेट खेळाडू व मंडळाच्या सर्व सभासदांनी मोलाचे सहकार्य केले.

## सहा सुवर्ण, चार रौप्यासह आठ कांस्यपदकांची कमाई | सोके कप ऑल इंडिया ओपन कराटे स्पर्धेत यश

# रायगडच्या कराटेपटूंकडून पदकांची लयलूट

। अलिबाग । प्रतिनिधी ।

गोशिन रीयू कराटे वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र फाउंडेशनच्या वतीने आयोजित ६ वी सोके कप ऑल इंडिया ओपन कराटे चॅम्पियनशिप २०२६ ही राष्ट्रीय स्पर्धा २२ फेब्रुवारी रोजी पनवेल येथील तालुका क्रीडा संकुलात उत्साहात पार पडली. या स्पर्धेचे आयोजन क्योशी राजू कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. स्पर्धेत महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आदी विविध राज्यांमधील सुमारे २५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.



रायगडगच्या खेळाडूंनी पदकांची लयलूट करीत सहा सुवर्ण, चार रौप्य, तर आठ कांस्यपदकांसह १८ पदकांची कमाई केली. या स्पर्धेत इंडियन ओकिनावा शोरीन रियू क्युडोकान कराटे-डो इंडिया संस्थेंतर्गत रायगड जिल्ह्याच्या संघानेही सहभाग घेत उल्लेखनीय कामगिरी केली. मुरुड आणि अलिबाग तालुक्यातील खेळाडूंनी रायगड संघाचे प्रतिनिधित्व करत काता आणि कुमिते या प्रकारांमध्ये उत्कृष्ट खेळ दाखवला. रायगडच्या खेळाडूंनी एकूण ६ सुवर्ण, ४ रौप्य आणि ८ कांस्य अशी एकूण १८ पदके पटकावत जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर उंचावले.

या स्पर्धेत सहभागी झालेले एकूण नऊ खेळाडू अलिबाग तालुक्यातील नागाव हायस्कूल, नागाव येथे प्रशिक्षण घेत आहेत. त्यामध्ये त्रिशूल पराग घरत (पालव) याने १ सुवर्ण व १ रौप्य, पूर्वी गणेश नाईक (नागाव) हिने १ सुवर्ण व १ कांस्य, चरण मनोज हरे (साखर आक्षी) याने १ रौप्य व १ कांस्य, तृष्णा जयेंद्र मयेकर (रायवाडी) हिने २ सुवर्ण, मेधांश मनीष पाटील (सहाण) याने १ सुवर्ण व १ कांस्य, दर्श मोरेश्वर चौलकर (साखर आक्षी) याने १ सुवर्ण व १ कांस्य पदक जिंकले. तसेच वीर संदेश गण (साखर आक्षी) याने १ रौप्य व १ कांस्य, स्मित रणधीर दांडेकर (साखर आक्षी) याने २ कांस्य आणि अद्वैत विजय वाघमारे (नागाव) याने १ रौप्य व १ कांस्य पदक मिळवले. या सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत रायगड जिल्ह्याचा दबदबा सिद्ध केला.

या खेळाडूंना कराटे प्रशिक्षक सिहान अरुण बोडके (मुख्य प्रशिक्षक भारत), रेंशी अरविंद गजानन भोपी (मुख्य प्रशिक्षक रायगड) आणि सेंसाय प्रसाद प्र. चौलकर (नवी मुंबई) यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सेंपाय राधा संदीप ढापरे, सेंपाय अनुश्री अरविंद भोपी, सेंपाय वेद संजय पाटील आणि सेंपाय दुर्वा निलेश नाईक यांचेही सहकार्य मिळाले. या यशाबद्दल विजेत्या खेळाडूंचे नागाव हायस्कूलचे संचालक मंडळ, मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी तसेच पालकवर्गाने अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## आयसीसी क्रिकेटची क्रमवारी जाहीर

। दुबई । वृत्तसंस्था ।

टी-२० वर्ल्ड कपनंतर आयसीसीने बुधवारी आपली ताजी क्रमवारी जाहीर केली आहे. यात सर्वाधिक बदल टी-२० क्रमवारीत झाले आहेत. भारतीय सलामीवीर अभिषेक शर्मा आणि ईशान किशन टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत टॉप-२ स्थानांवर आहेत. अभिषेक शर्मा ८७५ रेटिंग गुणांसह नंबर-१ स्थानावर कायम आहे. त्याने टी-२० वर्ल्ड कप फायनलमध्ये न्यूझीलंडविरुद्ध वेगवान अर्धशतक झळकावले होते. ईशान किशन ८७१ गुणांसह दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. त्याने स्पर्धेत ३१७ धावा केल्या. ईशानने दोन स्थानांची झेप घेतली.

८ मार्च रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये टी-२० वर्ल्ड कपचा अंतिम सामना खेळला गेला होता. यात भारताने न्यूझीलंडला ९६ धावांच्या फरकाने हरवून आपले विजेतेपद राखले होते. टॉप-१० टी-२० फलंदाजांच्या यादीत ४ भारतीय समाविष्ट आहेत. यामध्ये अभिषेक नंबर-१, ईशान नंबर-२, तिलक वर्मा नंबर-७ आणि सूर्यकुमार यादव नंबर-९ वर आहेत. तिलक वर्माला एका आणि सूर्याला दोन स्थानांचे नुकसान झाले आहे. न्यूझीलंडचा टिम सायफर्ट चार स्थानांनी वर चढून सहाव्या क्रमांकावर पोहोचला आहे, तर इंग्लंडचा जेकब बेथेल १७ स्थानांनी वर येऊन १६ व्या क्रमांकावर पोहोचला आहे.

गोलंदाजी क्रमवारीत अफगाणिस्तानचा फिरकीपटू राशिद खान ७५३ गुणांसह पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे. भारताचा वरुण चक्रवर्ती ७४० गुणांसह दुसऱ्या स्थानावर घसरला आहे. जसप्रीत बुमराह एक स्थान वर चढून सहाव्या क्रमांकावर पोहोचला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)